# शंका

भाऊ रानडे

राष्ट्र सेवा दल प्रकाशन

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १३७५

REFBK-0011499

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ... वि:
क्रमांक ... नों: दि:

# श
# ला
# का

• भाऊसाहेब रानडे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११४९१

राष्ट्र सेवा दल प्रकाशन

REFBK-0011499

प्रमुख विक्रेते : साधना प्रकाशन, ४३० – ३१ शनवार पेठ, पुणें २.

प्रकाशक
नारायण तावडे
कचेरी व्यवस्थापक
राष्ट्र सेवा दल
४१७ सरदार पटेल रोड
मुंबई ४.

©
भाऊसाहेब रानडे
प्रथमावृत्ति १९६१

मुखपृष्ठ : व्ही. एन्. ओक
किंमत : रुपये दोन फक्त

मुद्रक
ह. म. गद्रे
जनवाणी प्रेस,
४५, बुधवार पेठ,
पुणें २.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 32039 वि: 1 विंचवा
क्रमांक 2307 नों: दि: 27-7-58

# प्रस्तावना

कांहीं माणसें संपत्तीच्या जोरावर प्रतिष्ठा पावतात, कांहीं सत्तेच्या प्रकाशांत चमकतांना दिसतात, आणि कांहीं आपल्या सेवेमुळें पूजनीय बनतात. तिसऱ्या प्रकारच्या माणसांची संख्या अर्थांतच फार अल्प असते. पूज्य श्री. भाऊसाहेब रानडे यांची गणना तिसऱ्या प्रकारच्या लोकांत होते. 'पूज्य' हें विशेषण मीं बुद्धिपुरस्सर योजिलेलें आहे. एखाद्याच्याबद्दल गौरवानें लिहावयास बसलें म्हणजे साहजिकच स्तुतिवाचक विशेषणांची उधळपट्टी करण्याचा मोह अनावर होतो, परंतु तशांतला हा भाग नसून मीं तें विशेषण विचारपूर्वक वापरलें आहे. स्वातंत्र्य पूर्वकाळीं कदाचित् भाऊंच्या बाबतींत मी तें विशेषण वापरलें देखील नसतें. सबंध समाज जेव्हां एखाद्या उदात्त ध्येयासाठीं महान् प्रयत्न करावयास सज्ज होतो, खलप्रवृत्तीच्या विरुद्ध युद्ध करण्यासाठीं जनसागर खवळून उठतो त्यावेळीं सर्वसाधारणपणें सत्प्रवृत्तींचा उत्कर्ष झालेला पाहावयास मिळतो. सामान्य माणसेंदेखील त्या महान् सामाजिक प्रेरणेचीं साधनें होण्यांत धन्यता मानतात. अहंतेचा त्यांना त्याक्षणीं विसर पडतो आणि मामुली स्वार्थभावनेच्या अतीत होऊन मोठमोठीं कामें त्यांच्या हातून पार पडतात. परंतु एक ऐतिहासिक कार्य पूर्ण होऊन वातावरण संथ झालें म्हणजे पुन्हां पूर्ववत् रागलोभाचा अनुभव येऊं लागतो. पूज्य भाऊसाहेब रानडे यांचा जीवनक्रम या दोन्हीं प्रकारच्या अवस्थामध्यें अत्यंत जवळून पाहण्याची संधि मला मिळाली. त्यांचें बावनकशी सोनें अनुभवाच्या कसोटीवर सिद्ध झालेलें आहे.

आपल्या जीवनामध्यें त्यांनीं कठोर व्रताचें पालन केलें आहे. परंतु बहुसंख्य व्रती लोकांच्या ठिकाणीं ज्या विकृति निर्माण होतात तशा विकृति त्यांच्या जीवनांत नाहींत. जीं माणसें त्याग करतात तीं फार अहंकारी असतात.

या ना त्या स्वरूपांत त्यांना आपल्या त्यागाची किंमत हवी असते. कोणी सत्ता मागतो तर कोणी मानमरातबाची अपेक्षा करतो. भाऊदेखील एका वस्तूची अपेक्षा करतात. पण ती लौकिक गोष्टीपेक्षां सर्वस्वीं भिन्न आहे. त्यांना बंधुप्रेमाची तहान लागलेली आहे. प्रेम हवें असणारे लोकहि कमी नसतात, परंतु त्यांना एकतर्फी व्यवहार हवा असतो. तुम्ही जितकें प्रेम द्याल त्याहून अधिक ते तुम्हांला देतील; म्हणूनच 'राष्ट्रसेवा दलां'तील हजारों तरुणांना ते आई वडिलांच्या ठिकाणीं आहेत. जी गोष्ट आजपर्यंत इतक्या यशस्वी रीतीनें कोणीं करून दाखविलेली नाहीं, ती त्यांनीं केली आहे. तरुण मुलांमुलींचें कलापथक—आदर्श कलापथक—त्यांनीं गेलीं कित्येक वर्षें चालविलें आहे. भाऊ ब्रह्मचारी आहेत. लग्नकार्य करून त्यांनीं प्रपंच थाटलेला नाहीं. ते फकीर आहेत. जेथें जातील तें आपलेंच घर असें ते मानतात. आणि लोकांनाहि तसेंच वाटतें. म्हटलें तर सर्व त्यांचें आणि म्हटलें तर कांहींच नाहीं ! सामान्यतः ब्रह्मचारी म्हटलें म्हणजे चिडचिडे असावयाचे, पण भाऊ जातील तिथें आनंदाचे मळे पिकवतील. लहान मुलींपासून तो प्रौढ स्त्रियापर्यंत कोणालाहि भाऊंशीं वागतांना संकोच वाटत नाहीं अथवा भीतीदेखील वाटत नाहीं. इतकेंच काय परंतु आपल्या मुलींना कलापथकाबरोबर पाठविण्याबाबत त्यांचे पालक कधींहि खळखळ करीत नाहींत. कारण त्यांची खात्री पटलेली आहे कीं, भाऊंच्या पंखांखालीं आपलीं मुलें सुरक्षित आहेत.

भाऊंचें मन एखाद्या लहान मुलासारखें निर्मळ आणि निर्लेप असतें. ते रागावतील किंचित् चिडतील देखील, परंतु तेवढ्या वेळेपुरतें. मागाहून मनांत कांहीं शिल्लक राहावयाचें नाहीं. त्यांना रागावलेले मीं बघितलें आहे. आणि मी देखील कित्येकवेळीं त्यांच्याशीं भांडलों आहें, परंतु त्यामुळें त्यांच्या बद्दलच्या प्रेमादरांत मुळींच कमीपणा आलेला नाहीं, किंबहुना प्रत्येक वेळीं त्यांच्या मनाच्या मोठेपणाची साक्ष पटल्यामुळें माझा आदर वाढतच गेला आहे. पूज्य साने गुरुजी, सेनापति बापट आणि भाऊसाहेब रानडे यांचा पिंड कमी अधिक अंशानें एकाच प्रकारचा आहे. सेनापति बापट महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष झाले, तेव्हां भाऊसाहेब त्यांचे कार्यवाह बनले, हा कांहीं नुसता योगायोग नव्हे. परंतु सेनापति

बापट काय, किंवा भाऊ काय राजकारणी पुरुष नव्हते. सेनापति बापट आणि भाऊसाहेब रानडे एकमतानें अध्यक्ष व कार्यवाह झाले ही गोष्ट कित्येक राजकारणी मंडळींना मुळींच आवडली नाहीं. कांहींच्या मनांत ह्या घटनेनुळें जी आढी बसली ती अनेक वर्षे सुटूं शकली नाहीं. त्यामुळें भाऊंच्या असामान्य गुणांची कदर त्यांना करतां आली नाहीं व त्यांची सेवा जनतेच्या हिताच्या दृष्टीनें व्हावी इतकी फलद्रूप झाली नाहीं. अर्थात्, सेनापति बापट अगर भाऊसाहेब रानडे यांनीं प्रांतिक कॉंग्रेस कमिटीवर जीं पदें घेतलीं तीं प्रसिद्धीच्या अगर अधिकाराच्या लालसेनें घेतलीं असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. ही जबाबदारी स्वीकारावी अशी सर्वसाधारण लोकांची इच्छा दिसली, म्हणूनच त्यांनीं भाबडेपणानें तें मान्य केलें. त्यांना अधिकाराची अथवा प्रसिद्धीची हाव असती, तर इतर कांहीं मंडळींनीं केलें त्याप्रमाणें करून त्यांना ती सहज मिळवितां आली असती, परंतु भाऊसाहेबांना त्याची जरुरी वाटली नाहीं. तोंडपुजेपणा करून अथवा सत्तास्पर्धेचे डाव खेळून आपलें संपन्न जीवन त्यांना दरिद्री करावयाचें नव्हतें.

आज आपला देश स्वतंत्र झाला आहे परंतु जनमनाची पूर्वींची उभारी राहिलेली नाहीं. ध्येयवादाच्या उंच आकाशांत भराऱ्या मारण्याची ईर्ष्या आज फारच कमी दिसून येते. समाजांतील दुःख, दैन्य संपलेलें नाहीं. विषमता यत्किंचितहि कमी झालेली नाहीं, असंतोष वाढत आहे, वैषम्य पसरत आहे, परंतु समाज जीवनांतील तामसवृत्तीचें उच्चाटन करण्याचा कांहीं प्रयत्न नेटानें होत आहे, असें अनुभवास येत नाहीं, राजकीय सत्तेच्या जोरावर सर्व कांहीं करतां येईल हीं भावना बळावत असल्यानें जो तो सत्ता कशी हस्तगत करतां येईल याचा विचार करीत आहे. नवसमाज-रचना निर्माण करण्यासाठीं सत्तेचीहि आवश्यकता आहे, परंतु राज्ययंत्राचीं चक्रें झपाट्यानें फिरविण्याचें खरें सामर्थ्य जनतेमध्येंच आहे, जनतेकडूनच ती चालनाशक्ति प्राप्त करून घ्यावयाची आहे. म्हणून जनमनामध्यें नवचैतन्य निर्माण करावयास हवें. सर्वच राजकीय पक्ष तसें बोलून दाखवितात, जनतेचें उत्स्फूर्त सहकार्य मिळविलें पाहिजे असें म्हणतात, परंतु ही स्फूर्ति कशी निर्माण होईल, याचा विचार करीत नाहींत. शक्तीच्या जोरावर तें करूं म्हटल्यास

अशक्य आहे. किंबहुना, सत्तास्पर्धेच्या राजकारणांत जे लोक स्वतःला गुरफटून घेतात त्यांची स्थिति उत्तरोत्तर केविलवाणी होत जाते ! जनमनापासून ते दूर जातात. जनतेच्या सात्त्विक भावनेला आवाहन करण्याचें त्यांचें सामर्थ्य कमी होतें आणि मग राजदंडाचा उपयोग करण्याचा त्यांना अनावर मोह होतो.

परंतु राजदंडानें त्यांना अभिप्रेत असलेली सुधारणा होऊंच शकणार नाहीं. त्यासाठीं जनमनामध्यें आमूलाग्र क्रांति व्हावयास पाहिजे. मनुष्य ज्या वेळीं स्वतः धडपड करूं लागतो, त्यावेळींच त्याच्या विकासाला प्रारंभ होतो. आपल्याला जो अन्याय वाटतो, तो दुसऱ्या कोणींतरी दूर करावा अशी अपेक्षा करण्यांत अर्थ नाहीं. आपण स्वतः त्याविरुद्ध झगडण्यास तयार व्हावें लागतें. मोठमोठ्या पुढाऱ्यांनीं परकीय सरकारविरुद्ध झगडा केला. म्हणून कांहीं स्वातंत्र्य मिळालें नाही. बहुसंख्य लोकांनीं आपल्यापरीनें तो लढा सुरू केला म्हणूनच ती चळवळ प्रभावी झाली. महात्मा गांधींचा मोठेपणा यांत होता कीं प्रत्येकाला ज्यांत भाग घेतां येईल, असा लढा त्यांनीं निर्माण केला. आज आपल्या देशांत जी सामाजिक आणि आर्थिक विषमता आहे तिच्याविरुद्ध बहुसंख्या जनता ज्यावेळीं सात्त्विक बंड पुकारील त्यावेळींच आपलें ध्येय दृष्टिपथांत येईल. अस्पृश्यता कायद्यानें नष्ट केली म्हणून ती गेली नाहीं. अस्पृश्यता हा अन्याय आहे, त्याविरुद्ध आमचीं हृदयें सात्त्विक संतापानें पेटूं लागतील तेव्हांच तें पाप जाळून भस्म करण्याची शक्ति समाजामध्यें निर्माण होऊं शकेल. आपला देश गरीब आहे. तो संपन्न करावयाचा असेल, तर सामाजिक कर्तव्याच्या जाणिवेनें आम्ही जीव तोडून मेहनत करावयास लागलें पाहिजे. अभ्युदयाचा दरवाजा उघडण्याची शक्यता आहे. पण ही गोष्ट चुटकीसरशी होणार नाही. नदीचा ओघ सुरुवातीलाच मोठा आणि वेगवान् नसतो. अनेक लहान मोठे ओढे येऊन मिळतात तेव्हां ती सामर्थ्यशाली बनत जाते. सामाजिक क्रांतीचें देखील तसेंच आहे. कोणीतरी त्या कार्याला प्रारंभ करावा लागतो. धर्मचक्र प्रवर्तित करावें लागतें.

विधायक कार्याला वाहून घेतलेलीं, अन्यायाविरुद्ध सतत दंड थोपटून उभीं राहिलेलीं आणि 'अवघाची संसार सुखाचा करीन' या वृत्तीनें जगणारी थोर माणसें आम्हांला हवीं आहेत.


भाऊंचें मन ऐन उमेदीमधल्या तरुणासारखें आहे. वयाच्या मानानें जरेनें आपली पावलें त्यांच्या शरीरावर खूपच कमी उमटवलेलीं आहेत. त्यांचा उत्साह आणि उल्हास मुळींच कमी झालेला नाहीं. स्वस्थ बसणें हें तर त्यांना ठाऊकच नाहीं. उपकारापुरतेंच त्यांचें सर्व जीवन आहे. अहंताशून्य अहर्निश कार्याचा ते एक आदर्श आहे. पण त्यांच्या मनानें 'दलप्रमुख' पदावरून निवृत्त व्हावयाचें ठरवलें आहे. तरुण मंडळींनीं पुढें येऊन ही जबाबदारी स्वीकारावी, असा त्यांचा आग्रह आहे. त्यांची निवृत्ति ही अन्योन्य प्रवृत्तींचा आरंभच ठरेल. त्यांचें मार्गदर्शन आणि त्यांचा अनुभव 'सेवादला'स सतत मिळत राहाणारच आहे.

त्यांच्या धगधगत्या जीवनाची ऊब पुढल्या पिढ्यांना सतत मिळत राहावी यासाठीं त्यांच्या ' लेखनाचा संग्रह ' त्यांच्या वाढदिवशीं प्रसिद्ध करण्याचे मित्रांनीं योजलें. भाऊंविषयीं आपला आदर व्यक्त करण्याचा हा सर्वथा उचित मार्ग आहे. त्यांच्या त्या लेखसंग्रहाची निवड मोठ्या साक्षेपानें केलेली आहे. पुस्तकाचे दोन विभाग कल्पिलेले असून पहिल्या विभागांत त्यांच्या लेखांचा समावेश आहे. ह्या लेखांमध्यें त्यांनीं ज्या क्षेत्रांत तपस्या केली त्या क्षेत्राच्या विविध अंगांचें प्रतिबिंब स्वाभाविकपणेंच पडलें आहे. युवक संघटना आणि त्यांचें कार्य व कार्यक्रम या संबंधींचें हें सर्व लिखाण आहे. भाऊंची उगवत्या पिढ्यांसंबंधींची तळमळ शब्दाशब्दांतून व्यक्त होते. रसरसत्या मनाची आणि उत्साहानें ओसंडत्या शरीराची नवी पिढी पाहण्याचा एकच एक ध्यास त्यांना आहे. दलितांविषयींचा त्यांचा कळवळा सर्वच लेखांतून प्रकर्षानें दिसून येतो. अस्पृश्यता निवारण आणि स्त्रियांची उन्नति हे भाऊंमधला सारा जळजळीतपणा व्यक्त करणारे विषय. राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्रांतीचे ते कट्टर पुरस्कर्ते आहेत. परंतु त्यांतल्या त्यांत उपेक्षितांकडे त्यांचा झुकता कल स्वाभाविकतःच असल्यानें सामाजिक आणि शैक्षणिक क्रांतीसाठीं तर त्यांची तळमळ अधिकच तीव्र आहे. शिक्षणावरचा त्यांचा विश्वास पाहिला कीं, ते कसे हाडाचे शिक्षक आहेत तें दिसून येतें

युरोपच्या प्रवास पत्रांतून निवडक भाग संपादून त्याचा एक स्वतंत्र विभाग पुस्तकांत दिला आहे. भाऊंचा साक्षेप, गुणग्रहणाची त्यांची दृष्टि, भारतीय जीवनाच्या उन्नतीविषयींची तळमळ ह्या साऱ्या पत्रांतून ओतप्रोत भरलेली आहे. ही भावनाच त्यांना लिहावयाला प्रवृत्त करीत होती. 'साधनें'त प्रसिद्ध झालीं तेव्हांहि हीं पत्रें अनेकांना आवडलीं होतीं. भाऊंच्या जीवनांत उपचार असा नाहींच. मुलांच्या निर्व्याज वृत्तीनें त्यांनीं तें सर्व लिहिलें आहे.

भाऊंच्या लिखाणांचा हा संग्रह म्हणजे सेवकांना एक प्रकारची शिदोरीच आहे. ह्या संग्रहामुळें भाऊंचें निकट सांनिध्य सर्वांच्या निरंतर अनुभवास येईल. आजच्या आणि उद्यांच्या सेवकांना ही शिदोरी बहुत काळ पुरेल.

एस्. एम्. जोशी



दा. क. ११४५१

विभाग पहिला

# निवडक लेख

* महाराष्ट्र आणि क्रांतिप्रवृत्ति
* तरुण : आजचे व उद्यांचे
* युवकसंघटना
* शारीरिक शिक्षण
* सेवापथकासंबंधीं थोडें चिंतन
* अस्पृश्यता निवारण : विविध प्रयत्न
* सँटिआगोची दयामूर्ति

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32031 वि: १०
क्रमांक ९३८७ नों. दि: २२५८

# महाराष्ट्र आणि क्रांतिप्रवृत्ति

क्रांति हा शब्द उच्चारतांच आपल्यासमोर सामान्यतः राज्यक्रांतीचें चित्र उभें राहतें. हिंदुस्थानांत आजपर्यंत जी विशिष्ट परिस्थिति होती त्यामुळें तसें होणें अगदीं साहजिक होतें. परंतु आतां आपण क्रांति हा शब्द फार व्यापक अर्थानें वापरतों. आज आपण सर्वांगीण क्रांतीची कल्पना करूं शकतों. समाजांतील जुनीं जीवनमूल्यें बदलून त्या ठिकाणीं नवीन जीवनमूल्यांची स्थापना करणें याला आपण क्रांति मानतों. अशी सर्वांगीण मूल्य–परिवर्तन घडवून आणणारी क्रांति गेल्या सुमारें दोन हजार वर्षांत आपल्या देशांत झालेली नाहीं. आपल्या देशांत मिळालेल्या जीवन स्वास्थ्यामुळें आपल्या जीवनाची बैठक अशी झाली, कीं राज्याच्या उलथा-पालथींचा समाज-जीवनाची घडी बदलण्याइतपत परिणाम कधीं झाला नाहीं. ग्रामीण स्वयंपूर्णतेवर येथील जीवन आधारलेलें असल्यानें येथील समाजघडी बदलण्याचा प्रसंग कधीं आलाच नाहीं. राज्यांच्या मोठमोठ्या घडामोडी समाज-जीवनाच्या चौकटीला स्पर्शहि करूं शकल्या नाहींत. आपल्या देशांत सत्तांतरें कमीं झालीं नाहींत; परंतु तीं वरवरचीं होतीं.

राज्यक्रांत्यांप्रमाणें धर्मांमध्येंहि उलथापालथी येथें पुष्कळ झाल्या. शैव, वैष्णव, जैन, बौद्ध व शांकरीय अशा धार्मिक क्रांत्या होऊन नवीन धर्म-कल्पना लोकांपुढें मांडल्या गेल्या. अगदीं अलीकडे ब्राह्मो समाजीयांनींहि असा प्रयत्न केला. परंतु ह्या धर्मक्रांत्या धार्मिक श्रद्धेच्या बाबतींत परिणाम करूं शकल्या तरी समाजाची घडी मात्र त्यांच्यामुळें विसकटली नाहीं, ती तशीच चपखल राहिली. ह्या धर्मविचारांमुळें सारा समाज खालपासून

कधीं ढवळून निघाला नाहीं. अर्थात् याला थोडासा अपवाद बुद्धाचा दाखवितां येईल. महानुभावी, नाथपंथी व वारकरी या संप्रदायांनीं मनुष्य व ईश्वर यांच्यासंबंधीं नव्या कल्पना प्रसृत केल्या, नवे संकेत रूढ केले; तरीहि मनुष्यामनुष्यांतील म्हणजे समाजान्तर्गत संबंधांत आमूलाग्र बदल घडविण्याची आवश्यकता त्यांना तितक्या तीव्रतेनें त्या काळीं भासली नाहीं.

राज्यबदल झाला कीं बरेंचसें काम संपलें असेंच मानलें जाई. राज्यबदल झाल्यानंतर समाजमूल्यें बदलण्याचा प्रयत्न भारताच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासांत झालेला दिसत नाहीं. शिवाजी महाराजांनीं मोगलांचें जुलमी राज्य नाहींसें करून त्या ठिकाणीं मराठ्यांचें राज्य स्थापन केलें. परकीय सत्ता उलथून टाकली म्हणजे बाकी सारें आपोआप ठीक होईल अशी कल्पना असल्यानें मोंगलांच्या राज्यांना मराठ्यांनीं अगदीं तीव्र व कडवा विरोध केला तरीहि समाजांतलीं मूल्यें बदलण्याची गरज त्यांना भासली नाहीं. राज्यें बदलूनहि समाज-जीवनाचा सांगाडा मात्र तोच राहिला.

महाराष्ट्राचा पिंड जात्याच राजकीय आहे. त्यामुळें महाराष्ट्रीयांना राजकारणांत रस अधिक असतो. महाराष्ट्रांत यामुळेंच अनेक राजकीय उलथापालथी झालेल्या आपल्याला आढळून येतात. त्या राजकीय उलाढालींच्या काळांत लोकांनीं ऐहिक सुखांतच सर्वस्वीं मग्न होऊन राहूं नये म्हणून त्यांना पारमार्थिक जीवनदृष्टि प्राप्त करून देण्यासाठीं जे प्रयत्न झाले त्यांत महाराष्ट्रीय संतांची कामगिरी अर्थातच उल्लेखनीय आहे.

ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम यांची वैयक्तिक जीवनदृष्टि अत्यंत् विशाल स्वरूपाची आहे; ती मानवतेवर आधारलेली आहे. पण असें जरी असलें तरी समाज बदलणें, ही माणसाची धार्मिक विशेषतः सामाजिक व राजकीय जबाबदारी आहे, हें संतांच्या प्रयत्नांत अंतर्भूत झालें नव्हतें. रामदासांनीं राजकीय व धार्मिक उत्थापनांत सव्यसाचित्व प्रकट केलें. पण समाजांत वर्णाश्रमव्यवस्थेच्या गोंडस नांवाखालीं जातीय विषमता फैलावलेली होती, औदासीन्य, मालीन्य व अज्ञान यामुळें समाज पोखरलेला होता. त्यामुळें कोणीहि तांत्रिक वा मांत्रिक त्याला भुलवून आपल्या जाळ्यांत ओढूं शकत असे. अशा समाजास वर्णाश्रम स्वराज्याच्या चौकटींत बसवून सर्व प्रश्न कसे सुटणार ?

ब्रिटिश अमलापूर्वी आपल्या देशांत जीं अनेक राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक स्थित्यंतरें झालीं तीं सर्व विचारांत घेतलीं तरी त्यांत आजच्या तत्त्वज्ञानाचा उद्गम अगर विकास करणाऱ्या तत्त्वांचा आढळसुद्धां होत नव्हता असें म्हणावें लागेल.

इंग्रजी अमलानें हिंदुस्थानांतील ग्रामीण जीवन प्रथम सर्वस्वी उखडून काढलें व अवघ्या समाजास चिंताग्रस्त करून सोडलें. म्हणूनच विष्णुबुवा ब्रह्मचारी ते भाई डांगे यांच्या प्रपंचाचा परामर्श क्रांतिदर्शी स्वरूपाच्या निकषांवर पाहणें कर्तव्य होऊन बसतें. तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई, नरगुंदकर, वासुदेव बळवंत इत्यादींनीं इंग्रजी राज्य उलथवून पाडण्याचा धाडसी व कांहींसा संघटित प्रयत्न केला, तरी पूर्व प्रयत्नांत इंग्रजांपुढें आपला पराभव कां झाला, त्याचीं कारणें शोधून व त्यांचा निरास करून सर्व तऱ्हेची खबरदारी घेण्यांत आलेली नव्हती. त्यामुळें हे प्रयत्न अयशस्वी ठरणें अपरिहार्य होतें.

इंग्रजी राज्यांतील आधुनिक शिक्षण, भौतिक सुधारणा, इंग्रजांनीं प्रस्थापित केलेली राज्यव्यवस्था हीं सारीं जमेस धरून व आत्मसात करून आपल्या देशांतील राजकीय कोंडी फोडण्यासाठीं व नवी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठीं यानंतर प्रयत्न होणें अगदीं स्वाभाविक होते.

लोकहितवादींसारख्यांचे प्रयत्न क्रांतिकारी स्वरूपाचे नव्हते, पण बंगाल्यांतील राजा राममोहन राय व महाराष्ट्रांतील ज्योतिबा फुले हे पूर्वींच्या सर्व समाजसुधारकांपेक्षां सर्वथैव भिन्न होते. हिंदुधर्मांतील रूढीबंधनें, धर्मसंस्कार, आचार-विचार या सर्वांस महात्मा फुले यांनीं जबरदस्त धक्का दिला. देशांतील प्रचंड समाज अज्ञान, दारिद्य आणि परावलंबित्व या दुर्गुणांनीं जर्जर झाला होता. त्याचा उद्धार दुसऱ्या कोणावरहि विसंबून न ठेवतां या सर्व समाजास आत्मविश्वास व आत्मप्रत्यय आणून देण्याचा चंग त्यांनीं बांधला होता. ज्योतिबा फुले, राममोहन राय यांच्याप्रमाणें मोठे प्रज्ञावंत नसतील, पण समाजक्रांति करूं पाहणाऱ्याच्या अंगीं आवश्यक असलेला जोरकसपणा व कणखरपणा आणि खंबीर धैर्यशाली वृत्ति हे गुण उत्कटत्वानें त्यांच्या ठिकाणीं निःसंशय वसत होते. त्यांच्या ठायीं धर्मभेदातीत दृष्टि तर होतीच, पण मानवतावादी दृष्टीहि वास करीत होती.

ब्राह्मणांनीं प्रस्थापित केलेल्या धर्मरूढि, संस्कार इत्यादींचा उच्छेद करावा लागल्यामुळें कीं काय ब्राह्मणांबद्दलचा द्वेष त्यांच्यामध्यें अवशेष रूपानें राहिला असावा असें वाटतें.

इतके थोर गुण ज्यांच्या अंगीं वास करीत होते त्यांस परकीय राज्या-विषयीं चीड, तें राज्य संपुष्टांत आणावें अशा तऱ्हेची तळमळ व त्यासाठीं आपण आपला अवघा जनसमाज खवळून उठवला तर कालांतरानें इंग्रजी साम्राज्य पाळामुळांसकट उखडून काढतां येईल असा विश्वास नव्हता, याचें मात्र सखेदाश्चर्य वाटतें.

आज आपणांस जी क्रांति अभिप्रेत आहे ती राजकीय, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक अशी सर्वांगीण असावयास पाहिजे. त्यांतून अवघ्या समाजांत नवीन जीवनमूल्यें रुजावयास पाहिजेत. अशा क्रांतीचीं बीजें पेरण्यास आवश्यक असलेल्या थोर माणसांची खाण महाराष्ट्रास एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस लाभली. या थोर पुरुषांनीं आपलें कर्तृत्व महाराष्ट्रांतच नव्हे तर आसेतुहिमाचल सर्वत्र प्रचीतीस आणून दिलें. पण त्याच महाराष्ट्राचें मोठें दुर्भाग्य असें कीं या महान् धुरंधरांचें कर्तृत्व एकमेकांस पूरक, पोषक व साहाय्यक न होतां कमीजास्त प्रमाणांत विरोधीच झाल्याचें पहाणें नशिबीं आलें ! १८७० ते १९२० या पन्नास वर्षांत महाराष्ट्राची नौका आधीं राजकीय चळवळ कीं आधीं सामाजिक चळवळ, या वादाच्या खडकावर आदळण्याच्या स्थितींत सारखी हेलकावत होती. या झगड्यांत पहिल्या पक्षास टिळकांसारख्या खंद्या नेत्याचें नेतृत्व लाभल्यानें दुसरा पक्ष सर्वस्वीं हतबल, हतप्रभ अथवा परकीय सरकारावलंबी बनला. या झगड्यांत टिळक पक्षाला जरी यश लाभलें तरी नंतरच्या पिढ्यांना त्याचें समाधान कसें वाटणार ? लोकमान्यांनीं ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं झगडतांना देदीप्यमान तेज, छातीचा निधडेपणा व खडकापेक्षांहि खंबीरता दाखवली. त्या सर्वांवर कळस म्हणजे राजकीय निपुणताहि त्यांनीं दाखवली आणि त्यामुळें ते लोक-मान्यत्व पावले.

पण आज आपणांस ऐतिहासिक व सम्यक् दृष्टीनें आणि निर्विकारतेनें या परिस्थितीचें अवलोकन करावयास शिकलें पाहिजे. महाराष्ट्राच्या

राजकीय पिंडावर सरकारी नोकरी व देशसेवा या न्या. रानड्यांच्या समन्वयी वृत्तीची छाप पडूं शकली नाहीं. त्यामुळें रानड्यांची प्रचंड उद्यमशीलता, संघटना-चातुर्य, विशाल बुद्धिमत्ता व अविरत सेवा या गुणांची तत्कालीन पिढीस यावी तशी प्रतीति येऊं शकली नाहीं. त्यांच्यामागून आलेल्या टिळकांनीं हां हां म्हणतां त्यांना बाजूस सारून देशाच्या राजकीय क्रीडांगणावर आपलें प्रभुत्व गाजवण्यास प्रारंभ केला. लोकमान्य टिळकांनीं राजकीय प्रश्नांस केवळ प्राधान्य दिलें असतें तर आम्हांस आज त्या गोष्टीबद्दल तक्रार करण्याचें कारण राहिलें नसतें, पण त्यांनीं संमतिवयाच्या बिलास विरोध केला तो केवळ परकीय राजदंडाधारें अवतरणाऱ्या समाजसुधारणा कायद्यास नव्हे, याचें प्रत्यंतर त्यांनीं पंच हौद मिशन प्रकरणीं ब्रह्मवृंदांच्या बहिष्काराच्या भीतीनें प्रायश्चित घेतलें या गोष्टीवरून येतें ! राजकीय कार्याचें अग्रेसरत्व महाराष्ट्रीय समाजास पटवून देण्याची विशेष आवश्यकता नसतांना सर्व सामाजिक चळवळींवर व कार्यकर्त्यांवर त्यांनीं जो चौफेर हल्ला केला त्याऐवजीं केवळ तात्त्विक विरोध करून जरी त्यांनीं आपल्या लेखणीस आवर घातला असता तरी बरें झालें असतें. पण प्रतिपक्षीयांस चारी मुंड्या चीत करण्याच्या त्यांच्या महत्त्वाकांक्षेमुळें त्या बिचाऱ्यांची अशी दाणादाण उडून गेली कीं त्यांच्या वैयक्तिक अवहेलनेबरोबरच त्यांच्या वैचारिक भूमिकेचा सहानुभूतीनें विचार करण्याइतकीहि समतोल बुद्धि समाजांत शिल्लक राहिली नाहीं.

परंतु आज या समाजकार्यकर्त्यांबद्दल आपली सहानुभूति अधिकाधिक वाढते आहे. आदर वृद्धिंगत होतो आहे. त्यांचें सक्रिय अनुयायित्व करण्याची आकांक्षा दिवसेंदिवस बळावूं पहात आहे. लोकमान्यांच्या चारी मुंडे चीत करण्याच्या प्रवृत्तीबद्दल खेद मानतांना आपणांस हेंहि कबूल करावें लागेल, कीं या समाजकार्यकर्त्यांमध्यें आवश्यक त्या जोरकसपणाचाहि अभाव होता. टिळकांबरोबर दंड थोपटून कोणीं उभें राहिलें असेल तर ते एकटे आगरकरच ! टिळक व आगरकर यांचें विद्यालयीन सहजीवन व सार्वजनिक कार्यारंभींचें डोंगरीच्या किल्ल्यांतील कारावासाचें साहचर्य हें सुद्धां अल्पजीवी ठरलें ! टिळकांनीं आपणावर अखंड कारावास ओढवून घेतला व आगरकरांनीं लोकनिंदेची पराकोटि म्हणून जिवंतपणीं आपली प्रेतयात्रा पाहिली !

शंकराचार्य, शिवाजी, रामदास, टिळक आणि बुद्ध, तुकाराम, आगरकर हीं दोन भिन्न विचारधारांचीं प्रतीकें होत. वेदप्रामाण्य हें पहिल्या बुद्धीचें अधिष्ठान. तदंतर्गत भौतिक हव्यास व राजकीय बुभुक्षा हीं त्यांचीं बाह्यचिन्हें होत. तर निस्संग, विदेही, राष्ट्रभेदातीत व अत्यंत मुक्त विचारांची मानवतावादी बैठक हीं दुसऱ्या प्रवृत्तीचीं लक्षणें होत.

राजकीय क्षितिजावरील लोकमान्यांचा अस्त व महात्माजींचा उदय हा मोठा समयोचित होता. लोकमान्यांनीं जी राजकीय जागृति करून ठेवली तिचा पूर्ण फायदा महात्माजींना घेतां आला. प्रत्यक्ष राजकीय कार्यक्रमासह त्यांनीं शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक अशा सर्व बाजूंनीं समाजउभारणीचें कार्य हातीं घेतलें. कोणतीहि चळवळ खालपर्यंत पोंचवावयाची असेल तर ती हिंसक पद्धतीनें पोचूं शकणार नाहीं, ही क्रांतीची व्यावहारिक बाजू स्वा. सावरकरांपासून तों गोगट्यांपर्यंत सर्वांनीं लक्षांत घेऊन जर महात्माजींच्या चळवळीसंबंधीं गुणग्राहकता दाखविली असती तर आणखी काय हवें होतें ! अयशस्वी दहशतवादी राजकीय क्रांतिकारी बहुधा उर्वरित आयुष्यांत राजकीय प्रतिगामी वा सोवळे समाजसुधारक होण्याचा फार संभव असतो. निदान महाराष्ट्रांत तरी असा कटु अनुभव पाहाण्याची पाळी आली आणि महात्माजींच्या नैष्ठिक अहिंसावादाची व विधायक कार्याची टिंगल करण्यांत महाराष्ट्रीय प्रज्ञा खर्चीं पडूं लागल्याचें दुर्दैव ओढवलें.

समाजांतील जन्मजात श्रेष्ठकनिष्ठत्वाची भावना मुळासकट उपटून काढण्यासाठीं महात्माजींना अस्पृश्यतानिवारणाचें कार्य उत्कटत्वानें पुरस्कृत करावेसें वाटलें असल्यास नवल नाहीं. लोकमान्यांचे अनुयायी म्हणवून घेणाऱ्यांनीं राजकीय पार्श्वभूमीवर महात्माजींशीं झगडा सुरू केला. बरें, जुन्या समाजकार्यकर्त्यांनीं तरी गांधींचा कार्यक्रम तडफेनें हातीं घ्यावा, तर त्याऐवजीं त्यांच्या सत्याग्रह शास्त्रावर नैतिक व तात्त्विक अक्षेप घेऊन विरोध करण्यांतच त्यांनीं अधिकांश धमक खर्च केली. यामुळें महात्माजींच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, तत्त्वज्ञानविषयक व विधायक कार्यनिविष्ट भूमिकेचा पुरस्कार करण्याचें कार्य बहुंशीं निवोदित पिढीस स्वीकारावें लागलें.

आज महात्माजीहि आपलें कार्य करून दिवंगत झाले आहेत. आतां रशियाप्रणीत तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारे अथवा हिटलरी आर्यवादाचे उपासक याखेरीज सारे लोक लोकशाहीचे उपासक झाले आहेत. ब्रिटिश अमलांतील दहशतवादी क्रांतिकारकांची आतां ऐतिहासिक आवश्यकता राहिलेली नाहीं, ही गोष्ट लक्षांत घेऊन आज सर्वंकष क्रांति प्रस्थापित करूं पहाणाऱ्यांचें अवधान सामाजिक दृष्टिकोनाबाबत फुले, आगरकर, कर्वे इत्यादि समाजधुरीणांच्या भूमिकांचा कसून अभ्यास करण्याकडे लागणें क्रमप्राप्तच आहे. देशभक्तीचा सक्का काँग्रेस कार्यकर्त्यांपुरताच मर्यादित करणें हास्यास्पदच नव्हे तर तिरस्कारणीय ठरूं लागलें आहे. पण याहिपुढें जाऊन कोणत्याहि पक्षीय श्रेष्ठ कार्यकर्त्याइतकाच मान व आदर प्रज्ञावंत अर्थशास्त्रज्ञ अगर अन्य शास्त्रज्ञांस देण्याची व्यापक दृष्टि समाजांत दृग्गोचर होऊं लागली आहे.

नवसमाजनिर्मिति ही राजकीय, आर्थिक, वैज्ञानिक, सामाजिक अशा सर्वच क्षेत्रांतील क्रांतिकारी कार्यक्षमतेवर अवलंबून आहे, ही भावना अधिकाधिक प्रमाणांत विचारवंतांत मूळ धरूं लागली आहे. आर्थिकदृष्ट्या जन्मजात श्रेष्ठ-कनिष्ठत्व व त्यांचें अत्यंत हिडीस स्वरूप म्हणजे अस्पृश्यता, या विविध रोगांनीं आपला समाज जर्जर झाला आहे. उच्चनीच भाव हा जगांत सर्वत्र दिसून येतो. पण आपल्या देशांतील अस्पृश्यतेसारखी घाण जगतांत कोठेंहि नाहीं. ही जातीयता नष्ट करावयाची तर ती सौम्य उपायांनीं नष्ट होणार नाहीं, त्यासाठीं समाजांत अनिर्बंध बेटीव्यवहार झाले पाहिजेत, अशा खणखणीत शब्दांत अण्णासाहेब कर्वे वयाच्या ९३ व्या वर्षी आपलें मत व्यक्त करतात व त्यासाठीं तळमळीनें अविरत झटत असतात. ही क्रांतिकारी वृत्ति ! त्यांना जर राजकीय भूमिकेची मजबूत बैठक प्रथमपासून लाभली असती तर महाराष्ट्रांतील समाजसुधारणेचें कार्य. ते अधिक झपाट्यानें पुढें नेऊं शकले असते, असा विचार मनांत आल्याखेरीज रहात नाहीं. अशा तऱ्हेचें सव्यसाचित्व विठ्ठल रामजी शिंदे यांच्या ठायीं दिसून आलें. महाराष्ट्रांत एके काळीं अग्रभागीं असलेल्या क्रांतिकारकांपैकीं सेनापति बापट यांच्यामध्यें राजकीय पुरोगामित्व व पूर्वीचीच धगधगीत जाज्वल्यता इतक्या दीर्घकाल टिकून राहिली आहे. गीतेंत ज्या वर्ण

संकराची भीति घातली आहे तो वर्णसंकर हाच आजचा धर्म आहे, असें महर्षि कर्वे यांच्याप्रमाणेंच सेनापतींचेंहि मत आहे आपल्या समाजांतील जातीय वृत्तींचें निर्मूलन हिंदु समाजापुरतें मर्यादित न ठेवतां मानवतावादाच्या भूमिकेवरून विचारांत घेण्यास शिकलें पाहिजे.

क्रांतिप्रवृत्तीचें व्यक्त स्वरूप विध्वंसक नसावें, तें निश्चितपणें विधायक असावें, हें निदान आपल्या देशाच्या आजच्या स्थितींत तरी मान्य व्हावें. अशा प्रवृत्तीस सत्त्वशील चारित्र्याची जोड असेल तरच ती क्रांतिप्रवृत्ति समाजास आदर्शवत् वाटेल. क्रांतिकारकांजवळ जर ब्रह्म्याची सृजनशीलता, विष्णूची समदृष्टि व महेशाची विरक्त कठोरता असेल तरच ते पुनर्रचना, समाज-सुधारणा व राजकीय जागृति या तिन्हीं गोष्टी समर्थपणें करूं शकतील; तरच समाजांत सर्वांगीण क्रांति त्यांना घडवितां येईल. अशा विविध गुणांनीं नटलेले त्रिमूर्ति जसजसे वर्धिष्णु व जयिष्णु होतील, तसतसें समाजाचें स्वरूप अधिकाधिक मंगल होत जाईल.

* * *

# तरुण : आजचे व उद्यांचे

आपल्या देशांत समाजवादी समाजरचना स्थापन झाली पाहिजे, या बाबत देशांतील सर्व विचारवंतांचें एकमत आहे. परंतु त्या समाजवादी समाजाचें स्वरुप काय असावें, ह्याबाबत अद्याप पुष्कळच मतभिन्नता आहे. केंद्रित पद्धतीच्या समाजवादी समाजव्यवस्थेचा पुरस्कार कम्युनिस्ट करतात, तर प्रजासमाजवादी पक्षाचें असें म्हणणें आहे कीं, केंद्रीकरण लोकशाहीला विसंगत असल्यानें राजकीय सत्ता, उत्पादनतंत्र व अर्थव्यवस्था यांचें विकेंद्रीकरण झालें पाहिजे. कॉंग्रेसहि लोकशाही समाजवादाचाच पुरस्कार करते. कॉंग्रेसपक्ष सत्तारूढ आहे आणि त्याचीं सरकारी पावलें हुकूमशाही पद्धतीनेंच पडत आहेत कीं काय, असें वाटण्याला भरपूर जागा आहे. सत्ता आणि कायदे, म्हणजेच सरकारी यंत्रणा व संसदीय राजकारण यांच्या द्वारा संपूर्ण आणि यथार्थ लोकशाही समाजवाद प्रस्थापित होणें दुरापास्त आहे. समाजाची बाह्य व्यवस्था व त्याच्या घटकांचें अंतरंग बदलल्याशिवाय खऱ्या लोकशाही समाजवादाची स्थापना होणार नाहीं. अंतरंग बदलावयाचें म्हणजे बाह्य चौकटीच्या बदलाबरोबरच व्यक्तिमात्रांत नवीं मूल्यें रुजवावीं लागतील, नव्या प्रवृत्ति निर्माण कराव्या लागतील.

समाजवादी समाजाच्या निर्मितीचें हें प्रचंड कार्य करण्याची जबाबदारी आजच्या व उद्यांच्या तरुण पिढीवरच आहे. पण ही जबाबदारी पेलण्यासाठीं आवश्यक ती कार्यक्षमता व ध्येयवाद तिच्यांत कोणीं आणि कसा निर्माण करावयाचा ? त्यासाठीं तरुणांना योग्य तें शिक्षण कसें मिळणार ?

या दृष्टीनें सरकारकडून काय केलें जात आहे, त्याची चिकित्सा होणें आवश्यक आहे.

एन्. सी. सी., ए. सी. सी., डिफेन्स ॲकॅडमी किंवा पंचवार्षिक योजनेंतील श्रमशिबिरादि योजना आणि भारत सेवक समाज वा श्री. जगन्नाथराव भोसले यांच्या नेतृत्वाखालीं चाललेलें राष्ट्रीय शिस्त योजनेचें कार्य यांच्याकडे जरा बारकाईनें पाहिलें तर असें दिसून येतें कीं, सरकारी योजनेंत पैसे व कागदोपत्रीं आंखणी यांची जितकी फिकीर केली जाते तितकी या संघटनांसाठीं लागणाऱ्या योग्य कार्यकर्त्यांसंबंधीं दाखविली जात नाहीं. निमलष्करी शिक्षण देण्याची सरकारी योजना स्वागतार्ह असली तरी त्यांत सामील होणारांना व्हॉलेंटियर—स्वयंसेवक—संबोधणें तितकेंसें उचित नाहीं. स्वयंसेवक शब्दाला गेल्या तीस-चाळीस वर्षांत या देशांत एक विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे. तो 'स्वयं' व 'सेवक' या दोन्ही शब्दांतील संयोजकता व त्यामागें अभिप्रेत असलेल्या नैतिक गुणांच्या निर्मितीवर आधारलेला आहे. त्यामागील त्यागाची व स्वयंप्रेरणेची अभिजात वृत्ति जर ढिली झाली तर अभिप्रेत असलेल्या गुणांचाहि लोप होऊं लागेल. हीच भीति आज सरकारच्या योजनांतून दिसते. सामाजिक कार्यकर्ते तयार करण्यासाठीं ना. गोखले यांनीं 'भारत सेवक समाज' संस्था काढली. त्यावेळीं त्यांनीं उराशीं बाळगलेली निस्सीम सेवावृत्ति व त्यागबुद्धि कोणीकडे व सरकारनें त्याच नांवाचें अपहरण करून पंचवार्षिक योजनेंतील द्रव्याच्या बळावर काढलेली योजना कोणीकडे ?

नवीन जीवनमूल्यें व नवसंस्कार देण्याचें काम हीं कार्यें योग्य संपन्नता प्राप्त झालेल्या व्यक्तींच्या व संघटनांच्या मार्फत होणार आहेत, हें लक्षांत घेऊन अशा व्यक्तींना व संस्थांना द्रव्यसाहाय्य देण्याचें उदार धोरण सरकारनें दाखविणें आवश्यक आहे. कम्युनिस्ट पद्धतीनें कार्य झपाट्यानें झाल्यासारखें वाटतें, पण त्यांत व्यक्तीचें संस्करण होत नाहीं, तर व्यक्ति ही त्या यंत्रणेचा केवळ अंशभाग बनते. लोकशाही पद्धतीनें हें कार्य व्यापक प्रमाणावर करण्याची इच्छा असेल तर सरकारी प्रयत्नांबरोबरच जेथें ही शक्ति दिसेल तेथें तिला साहाय्य देण्याचें व त्या कार्याचें स्वागत करण्याचें

मोठेपण व दिलदारी सरकारनें दाखविली पाहिजे. स्वातंत्र्यप्राप्ति होऊन एवढा काल लोटला तरी आपल्या देशांत विविध राजकीय पक्षांमध्यें परस्परांविषयीं सहिष्णु वृत्ति दिसून येत नाहीं. त्यामुळें नवसमाजनिर्मितीचें कार्य फार बिकट झालें आहे. या अवस्थेंतहि डोळ्यांपुढें ध्रुवताऱ्याप्रमाणें स्वच्छ ध्येय व निर्मळ कार्यपद्धति ठेवावयाची तर ज्ञानयुक्त श्रद्धा व कार्यसातत्य आणि त्याग यांवर निर्भर राहून आपलें कार्य चालू ठेवलें पाहिजे.

आजच्या तरुणांत शिस्त नाहीं, उत्साह नाहीं, ध्येयवाद नाहीं इत्यादि आरोप कित्येक वेळेला जबाबदार व्यक्तींकडून वा संघटनांकडून केलेले आढळतात. मला ते अमान्य आहेत. एक तर हे आरोप करण्याइतकी व्यापक आंकडेवार माहिती आपण संकलित केलेली नाहीं, अगर संकलित करण्याची कांहीं योजनाहि आंखलेली नाहीं. म्हणून मी असे आरोप करण्यास तयार नाहीं. पण त्याहूनहि महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं, घटकाभर हे आरोप खरे आहेत असें मानलें तरी, त्याचें सारें खापर तरुण पिढीवर फोडणें हें अन्यायाचें आहे. किंबहुना, आत्मदोष दूर करण्याचें धोरण आपल्यापाशीं नाहीं असाच त्याचा अर्थ होईल. तरुण वर्ग जर गुणसंपन्न नसेल तर ज्यांच्यापासून सहवासानें, शिकवणीनें व आचार-निरीक्षणानें गुण व दोष तो ग्रहण करतों त्या पिढींतील जबाबदार व्यक्तींत, संघटनांत व सरकारी यंत्रणेंत कांहीं तरी दोष आहे, असें म्हणावें लागेल. तरुणांवर आरोप न करतां समाजांतील जाणत्यांनीं आत्मनिरीक्षणात्मक दृष्टि ठेवून तरुणांना कोणत्या मार्गानें, कोणत्या पद्धतीनें वा योजनेनें उस्फूर्त व कार्यप्रवण करतां येईल, याचा खोलवर विचार केला पाहिजे. 'येथें बोल नाहीं शिष्यासीं' हें समर्थसूत्र आपण ध्यानीं ठेवणें अत्यावश्यक आहे.

अडचणींचा व अननुकूल परिस्थितीचा पाढा वाचण्यापेक्षां आजच्या परिस्थितीचें निरीक्षण करून आपल्याला योग्य व युक्त वाटणाऱ्या उपायांचें अवलंबन करण्याचें धाडस व निष्ठा राष्ट्र-सेवा-दल आपल्या हृदयाशीं बाळगण्याचा प्रयत्न करीत आहे. आपली शक्ति अल्प असेल, कामाचा उठाव डोळ्यांत भरण्याजोगा कदाचित् नसेलहि, पण नवीन मूल्यें प्रस्थापित करण्याचा राष्ट्र-सेवा-दलाचा मार्ग आपण डोळस श्रद्धेनें

आक्रमूं या. टिळक, गांधी व विनोबा यांनीं नवीन दृष्टि, नवीन धोरण, नवीन कार्यपद्धति व नवीन तत्त्वज्ञान दिलें आहे. त्यांचा आपण सदैव विचार करून, त्यावर श्रद्धा ठेवून आपलें कार्य चिकाटीनें व निष्ठेनें करीत राहाणें हीच एक गोष्ट आपण आपल्या डोळ्यांपुढें निरंतर ठेवली पाहिजे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 32039 वि: रविवार
क्रमांक 2367 नों: दि: 21.2.57

# युवकसंघटना

समाज हा विविध हितसंबंधांच्या, विविध विचारांच्या, विविध परिस्थितींत राहणाऱ्या अशा लोकांचा समूह असतो. तो विस्कळित असतो. हितसंबंधांचा संघर्ष आला म्हणजे समाजामध्यें कलहहि माजतो. आपापले प्रश्न सोडवून घेण्याकरतां अशा वेळीं लोक प्रयत्न करतात. परंतु विस्कळित असलेल्या समाजाला किंवा समाजांतील विभागाला आपले प्रश्न सोडवून घेणें कठीण बनतें. इतकेंच नाहीं तर, कोणतेंहि काम कार्यक्षमतेनें करणेंहि कठीण बनतें. म्हणूनच समान हितसंबंधाचे लोक एकत्र येतात, आपली संघटना करतात आणि संघटनेच्या द्वारें आपलीं उद्दिष्टें साध्य करण्याचा प्रयत्न करतात. आपले प्रश्न सोडवून घेण्यासाठीं झटतात. समाजामध्यें शिक्षणाचा, संस्कृतीचा जसजसा प्रादुर्भाव झाला, जागृति झाली, तसतसा अंतःकलह वाढूं लागला. एकाचे हितसंबंध दुसऱ्या गटाच्या मार्गांत विघ्न होऊं लागले आणि अशा परिस्थितींत समान हितसंबंधी लोक आपापली संघटना उभारूं लागले, असा इतिहास आपल्याला आढळेल. अर्थात् , संघटना उभारण्याला कुणाशीं तरी तीव्र संघर्ष ठेवावाच लागतो, असें म्हणतां येणार नाहीं. कामगारवर्गाची संघटना करतांना कामगारांच्या हितसंबंधांच्या आड मालक वर्ग येत असतो म्हणून या दोन गटांतील संघर्षावर कामगार संघटनेची उभारणी झालेली असते. तसें युवकसंघटनेच्या बाबतींत आपल्याला म्हणतां येणार नाहीं.

कोणतीहि संघटना जितकी अधिक स्वयंस्फूर्त आणि स्वायत्त असेल तितकीच ती अधिक आत्मीयतेनें आणि म्हणूनच कार्यक्षमतेनें काम करील

हें स्पष्ट आहे. संघटना उभारण्याच्या मार्गांत बंधनें घालणें किंवा दबावानें त्या खची करण्याचा प्रयत्न करणें, लोकशाहीच्या दृष्टीनें केव्हांहि योग्य नाहीं. तरीहि संघटना उभारण्याच्या कामीं कांहीं मर्यादा मानल्या पाहिजेत. देशांतर्गत कोणतीहि संघटना त्या देशाच्या ध्येयाला विघातक असतां कामा नये. देशाची घटना ज्या मूलभूत तत्त्वांच्यावर आधारलेली असेल त्या तत्त्वांना विसंगत असें ध्येय बाळगून जर एखादी संघटना बांधली जात असेल तर त्या संघटनेला बंधन घालण्यास कोणतीच हरकत नाहीं. याबाबत देखील पुढें असें म्हटलें पाहिजे कीं, एखाद्या देशाचें ध्येय हें मानवतेच्या व्यापक ध्येयाशीं किंवा हिताशीं विसंगत असेल तर तें ध्येय बदलून घेण्या-करतां लोकांना संघटना करावी लागेल व त्या संघटनेला देशाच्या सरकारनें बंधनें घातलीं तरी मानवतेच्या हिताकरतां दक्ष असलेल्या लोकांनीं त्या संघटनेला साहाय्य करणें योग्यच ठरेल. परतंत्र देशांतील स्वातंत्र्यनिष्ठ संघटना अशाच प्रकारच्या असतात व त्याच अखेरीस देश स्वतंत्र करण्याच्या कामीं प्रयत्न करीत असतात.

संघटना विविध पायांवर उभारलेल्या असतात. एकाच उद्दिष्टाकरतां कार्यप्रवृत्त झालेल्या लोकांची संघटना होऊं शकते. निरनिराळे पक्ष किंवा सामाजिक स्वरूपाच्या संघटना यांत मोडतात. एकाच क्षेत्रांत व एकाच हितसंबंधीं लोकांची संघटना होते. उदा० कामगार संघटना, शेतकरी संघटना, विद्यार्थि-संघटना, स्त्रीसंघटना. संघटना या प्रादेशिक स्वरूपाच्याहि असूं शकतात. त्याचप्रमाणें विशिष्ट वयोमर्यादेंतील गटांच्याहि असतात. परंतु प्रादेशिक किंवा वयोमर्यादेंतील संघटनेला देखील कांहींतरी समान उद्दिष्ट किंवा ध्येय हें असावेंच लागतें.

युवकसंघटना ही विशिष्ट वयोमर्यादेंतील गटाची संघटना असते; तरीहि या संघटनेला कांहींतरी किमान उद्दिष्ट अवश्यक असतें, म्हणूनच त्याच वयोमर्यादेतहि निरनिराळ्या ध्येयांच्या अनेक संघटना आढळून येतात. हुकूमशाही देशांतच फक्त एकच युवकसंघटना राष्ट्रव्यापी असेल, परंतु लोकशाही देशांत अशा अनेक संघटना कित्येकदां परस्परांशीं मिळत्या जुळत्या उद्दिष्टांच्या, तर कित्येकदां संपूर्णपणें विरोधी उद्दिष्टांच्या आढळून

येतील. युवक हे देशाचे भावी आधारस्तंभ असतात. युवावस्था ही मनुष्याच्या जीवनांतील सर्वांत उत्साहपूर्ण आणि कार्यप्रवृत्त अशी अवस्था असते. सांहजिकच युवकसंघटना म्हणजे राष्ट्राची मोठी शक्ति असते. देशांतील युवकसंघटना जितक्या शुद्ध हेतूंवर आधारलेल्या असतील, जितक्या खंबीर, स्वायत्त आणि बलशाली असतील तितकें देशाचें भवितव्य उज्ज्वल आहे, असें विधान करण्यास कोणतीच हरकत नाहीं.

आतां आपणांस युवक संघटनांचा विचार करावयाचा आहे. मग प्रथम युवक कोणास म्हणावें हें स्पष्ट केलें पाहिजे. कांहीं देशांत युवक या मर्यादेंत १४ ते २५ या वयाची मंडळी धरली जातील, तर कांहीं ठिकाणीं १६ ते ३० ही वयोमर्यादाहि धरली जाईल. व्यापक पायावर आपण १४ ते ३५ ही वयोमर्यादा युवकांची धरूं या. युनेस्को व आंतर राष्ट्रीय समाजवादी युवकसंघटना हीच वयोमर्यादा मानतात. पण केवळ १४ ते ३५ या वयांतील सर्व युवकांची ती संघटना होईल असें मात्र नाहीं. वर म्हटल्याप्रमाणें संघटनेला कांहींतरी किमान उद्दिष्ट, कांहींतरी प्रमाणभूत तत्त्वें हीं असलींच पाहिजेत. तें उद्दिष्ट मानणारे किंवा त्या तत्त्वांवर श्रद्धा असणारे युवकच त्या विशिष्ट संघटनेंत सहभागी होऊं शकतात. राष्ट्र-सेवा-दल ही अशीच एक युवक संघटना आहे. देशांतील तरुणांना संघटित करून त्यांच्यावर शारीरिक, बौद्धिक आणि सांस्कृतिक शिक्षण-द्वारा संस्कार घडवणें व त्यांच्यामधून समाजवादी शीलाचे नागरिक तयार करणें, हें सेवादलाचें उद्दिष्ट आहे. केवळ विद्यार्थिवर्गापुरती मर्यादित अशी ही संघटना नाहीं. तरीहि शहरांत प्रामुख्यानें विद्यार्थि-वर्गच त्यांत सहभागी झालेला दिसेल. मात्र खेड्यामध्यें १३ वर्षांचा मुलगा विद्यार्थी असेल तर तो खेड्यांत राहूंच शकत नाहीं, कारण त्याची पुढील शिक्षणाची सोय तेथें नसते किंवा त्याचें शिक्षण संपलें असलें आणि तो युवक असला तरी तो एखाद्या व्यवसायांत शिरलेला असतो. म्हणून ‘ राष्ट्र-सेवा-दल ’ ही व्यापक अर्थानें ‘ युवक-संघटना ’ आहे असेंच म्हणावें लागेल.

युवकांना संघटित करण्याचीं कारणें काय ? त्यांचे हितसंबंध काय असतात ? समाजांतील दुसऱ्या एखाद्या गटाशीं त्यांचा संघर्ष असतो का ? ह्या प्रश्नांचा

विचार करणें आवश्यक आहे. शहरांतला युवक हा प्रामुख्यानें विद्यार्थी आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. मग विद्यार्थिवर्गावर संस्कार घडविणारे किंवा त्यांच्या हिताहिताबाबत दक्ष असणारे असे कोण कोण असतात? प्रत्येक मुलाचे किंवा मुलीचे पालक हे तर त्याच्यावर संस्कार घडवीत असतातच, किंवा त्यांच्या हिताहिताकडे पाहत असतातच; परंतु मागसलेल्या देशांत पालकांपेक्षांहि ही जबाबदारी शिक्षकांवर व शिक्षणसंस्थांवर अधिक येते. पालक कित्येकदां अज्ञानी असतो, म्हणून तो संस्कार घडविण्यास असमर्थ असतो किंवा कित्येकदां नकळत कुसंस्कारदेखील घडवीत असतो. तसेंच मुलाचें हिताहित कशांत आहे हेंहि तो दूरदृष्टीनें पाहूं शकत नाहीं. शिक्षकवर्ग त्या मानानें अधिक जागृत व विचारी असतो. मुलांवर संस्कार घडविण्याचें काम त्यानें बुद्ध्या पत्करलेलें असतें. म्हणून तरुणांचें चारित्र्य घडविण्याचें काम प्रामुख्यानें शिक्षक व शिक्षणसंस्था यांचें आहे. मग स्वतंत्र शिक्षणसंस्थांची आवश्यकता कां भासावी? राष्ट्र-सेवा-दलासारख्या संघटनेचेंच याबाबत उदाहरण घेऊं. भारत परकीयांच्या गुलामींत होता, त्या वेळीं शाळांतून राष्ट्रीय वातावरण मिळणें अशक्य होतें व राष्ट्राचें स्वातंत्र्य हा सर्वांपुढील महत्त्वाचा व सर्वप्रथम असा प्रश्न होता. तेव्हां स्वातंत्र्यलढ्याकारितां शिस्तबद्ध व कार्यक्षम सैनिक तयार करणें, या उद्दिष्टानें प्रेरित होऊन राष्ट्र-सेवा-दलाची उभारणी झाली. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सेवादलाची आवश्यकता काय, असा प्रश्न कांहींजण उपस्थित करतात. युवकांवर संस्कार घडविण्याचें कर्तव्य आणि जबाबदारी प्रामुख्यानें शिक्षणसंस्थांची असली तरी शिक्षण-संस्था आणि शिक्षक जोंपर्यंत हें कार्य व्यापक अर्थानें करण्यास अपात्र असतात, तोंपर्यंत स्वतंत्र संघटनाची आवश्यकता भासतेच. भारतांत परकीयांचा अंमल होता तोंपर्यंत शिक्षणसंस्थांतून राष्ट्रीय वातावरणाला तर बंदी होतीच, पण तरुणांनीं बाहेरील वातावरणांत स्वातंत्र्यआंदोलनाची स्फूर्ति घेऊं नये, स्वातंत्र्यआंदोलनास आवश्यक असा तेजस्वी बाणा त्यांच्यांत निर्माण तर होऊं नये, परंतु त्यांच्या तरुणसुलभ प्रवृत्तीला वाव मिळावा म्हणून स्काउट्स्सारखी संघटना निर्माण करण्यांत आली व तरुणांना त्या संघटनेंत आकर्षून घेण्याचा प्रयत्न झाला. भारतापुरतें तरी हें सत्य आहे. जोंपर्यंत राष्ट्र-सेवा-दल किंवा कॉंग्रेस सेवादलासारखी संघटना देशांत नव्हती

तोंपर्यंत तरुण अशा निमसरकारी संघटनेंत तरी जात किंवा एकदम क्रांतिकारी पक्षांत सामील होत. व्यापक मानवी हिताशीं विसंगत अशा जातीवादावर आधारलेली ‘राष्ट्रीय स्वयंसेवक संघ’ ही बलवत्तर होत होता व तो तरुणांना चुकीच्या मार्गानें खेंचण्याचा प्रयत्न करीत होती. सरकारी प्रेरणेनें जातीय दंगे होत आणि मुसलमानांचा वरचढपणा दिसून येई. त्यामुळें हिंदुत्व-निष्ठांना साहजिकच रा. स्व. संघाबद्दल नितांत प्रेम वाटे. त्यामुळें संघाची वाढ विशेष झाली. अशा परिस्थितींत जातिधर्मातीत पायावर तरुणांची संघटना करणें आवश्यक वाटलें व राष्ट्र सेवा दलाची स्थापना झाली. स्वातंत्र्यानंतर या संघटनेच्या उद्दिष्टांत बदल करावा लागला तरी या स्वतंत्र संघटनेची आवश्यकता तितकीच तीव्र राहिली. पुढारलेल्या देशांतूनहि अद्याप आपल्याला अभिप्रेत असलेलें व्यापक व आदर्श शिक्षण शाळा-कॉलेजांतून मिळत नाहीं. म्हणून स्वतंत्र युवकसंघटनांची आवश्यकता भासते. मग भारता-सारख्या मागसलेल्या देशांत ती भासली तर नवल नाहीं. आपल्याकडील शिक्षणसंस्थांत अद्याप निरोगी वातावरण मुळींच नाहीं. पुष्कळदा शिक्षणसंस्था म्हणजे कुणाच्या तरी हातांतील बाहुलें असतें. कुणाचा तरी धंदा बनलेलें असते. सरकारी शिक्षण संस्था सरकारच्या मिंध्या असतात. तर स्वतंत्र संस्था कित्येकदा सरकारच्या रोषास पात्र झालेल्या असतात. आपल्या सरकारलाहि अद्याप चारित्र्यसंपन्न व शीलवान शिक्षणाची दृष्टि नाहीं. शिक्षक तर या दृष्टिकोनांतून तयार झालेलेच नसतात. चाकोरींतील परीक्षा देऊन पास झालेला मनुष्य शिक्षक असतो. पण समाजाचें व्यापक ज्ञान त्याला नसतें. राष्ट्राच्या प्रश्नांची कल्पना त्याला नसते. कांहीं शिक्षक ध्येयवादी असले तरी अभ्यासक्रमाची चाकोरी, परीक्षांची यंत्रणा आणि इन्स्पेक्शनची शिस्त या कचाट्यांत तो इतका बांधलेला असतो कीं, त्यांतून डोकें वर काढून दुसरें कांहीं करणें त्याला जमत नाहीं. वर्गांत मुलांची संख्या तर वाजवीपेक्षां किती तरी जास्त असते. एवढीं मुलें संभाळतांनाच त्याच्या नाकीं नऊ येतात. त्यांतून देशाच्या गरीब परिस्थितींत त्याचें पगारमान इतकें कमी झालेलें असतें कीं, प्रपंचाचा गाडा ओढण्यासाठीं त्याला शिकवण्या किंवा आणखी कांहींतरी उद्योग करावा लागतो. अशा साऱ्या परिस्थितींत त्याचे हातून चारित्र्यसंपन्न, राष्ट्रनिष्ठ, आणि कार्यतत्पर असे

युवक निर्माण करण्याची आशा बाळगणें कितपत योग्य ठरेल ? ध्येयवादी आणि उत्साही शिक्षकांचा उपयोग युवकसंघटनेच्या कार्यांत पुकळ करून घेतां येईल, हें मात्र लक्षांत घेतलें पाहिजे. सरकार जितकें अधिक लोकशाहीवादी बनेल, देशांतील वातावरण जितकें अधिक निरोगी बनेल आणि शिक्षक जितकें अधिक योग्य असा दृष्टिकोन घेऊन तयार होतील, शाळा जितक्या खरोखरी पवित्र शिक्षण-मंदिरें बनतील; तितकी 'स्वतंत्र युवक संघटना' चालविण्याची एक तर आवश्यकता राहणार नाहीं किंवा अशा संघटना राहिल्याच तर त्यांचें उद्दिष्ट अगदींच निराळें असेल आणि मग त्या कुणाच्याहि डोळ्यांमध्यें खुपण्याची परिस्थिति राहणार नाहीं. निरोगी वातावरणांत त्या काम करतील, सरकारची मदत त्यांना मिळेल आणि त्याहि आपला वांटा देतील. त्यांचें कार्य व्यापक प्रगतीला पूरक ठरेल.

चालू परिस्थितींत जोंपर्यंत सरकारी कारभार आणि शिक्षणसंस्था वर उल्लेख केल्याप्रमाणें आदर्श नाहींत, तोंपर्यंत युवकसंघटना प्रभावी राहिल्याच पाहिजेत. एकदां युवकसंघटना चालविण्याचें महत्त्व मान्य केलें म्हणजे ती कशी चालवावी, कार्यक्रम कोणते घ्यावेत इत्यादि प्रश्नांचा विचार करणें ओघानेंच आलें. कुठल्यातरी दृष्टीनें एक आदर्श योजना तयार करून आमच्या कल्पना याच तरुणांना खऱ्या हितावह, अशा आग्रही वृत्तीनें आम्हीं वरून युवकसंघटना उभारण्याचे प्रयत्न केले तर कदाचित् ते तरुणांच्या सहजप्रवृत्तीला अस्वीकार्य होण्याचा संभव असतो. तरुणांची प्रवृत्ति व त्यांचें मानस लक्षांत घेऊन संघटनेची गरज त्यांनाच कशी भासेल, त्यांनाच अंतःप्रेरणा कशी निर्माण होईल, हें पाहून अत्यंत कुशलतेनें हा प्रश्न हाताळला पाहिजे. आमची दृष्टि व आमच्या कल्पना याच हितावह, हें कदाचित खरें असलें तरी त्या कल्पना किंवा ती दृष्टि आपल्यावर लादली जाते असें तरुणांना वाटतां कामा नये. तारुण्यावस्था ही मधली अवस्था असते. कांहीं संस्कार त्यांच्यावर अगोदरच झालेले असतात. त्यांचीं मतें कांहींशीं तयार झालेलीं असतात. कांहीं प्रेमयांवर त्यांची श्रद्धा बसलेली असते. अशा स्थितींत एकदम भिन्न असे संस्कार आपल्यावर लादून घ्यायला तरुण मन तयार नसतें. म्हणून आपल्याला अभिप्रेत असलेली दृष्टि त्यांनीं स्वीकारावी असें वाटत असेल तर तसें वातावरण प्रथम त्याच्याभोवतीं निर्माण केलें पाहिजे.

आपल्या तत्त्वांच्या विरोधी शक्तींचा प्रभाव त्यांच्यावर पडत असेल तर त्या शक्तींपेक्षां आपलें सामर्थ्य अधिक प्रभावी झालें पाहिजे. आणि मग तरुण आपल्याकडे आकर्षित होऊं लागले म्हणजे त्यांना दिशा दाखवावयाचें काम झालें पाहिजे. त्यांना आचारप्रवृत्त केलें पाहिजे. अंतःप्रेरणा आणि सभोंवतालची परिस्थिति या दोन गोष्टींनीं मुलांचें मन तयार होत असतें. पैकीं अंतःप्रेरणा ही आपल्या हातची गोष्ट नसते म्हणूनच आपला भर भोंवतालचें वातावरण तयार करण्यावर असला पाहिजे. अर्थात या अनुषंगानें असें म्हटलें पाहिजे कीं, ज्या वयांत मुलांचीं मनें अधिक संस्कारक्षम असतात त्या वयांतील मुलांची संघटनाहि त्या दृष्टीनें फार महत्त्वाची आहे. बालांची व कुमारांचीं मनें घडविणें अधिक सोपें असतें. म्हणूनच राष्ट्र-सेवा-दल ही केवळ युवक संघटना नाहीं, बालांपासूनच संस्कार घडविण्याचा प्रयत्न ही संघटना करीत असते. कुमार वयांत मुलां-मुलींची आपल्या शिक्षकांबद्दल किती भक्तीची भावना असते हें आपण पाहतों. त्या भावनेचा विनियोग आपण जरूर करून घेऊं शकतों. मात्र त्या भावनेचा दुरुपयोग करून घेऊं नये किंवा तेवढाच एक आपला आधार आहे असेंहि मानतां कामा नये. बाल किंवा कुमार वयांतहि कांहीं मुलें शिक्षकाच्या आदर्शाशीं जितकीं समरस होतात तितकीं सर्व मुलें समरस होऊं शकत नाहींत. कांहींचीं मनें शंकाग्रस्त असतात आणि कांहीं वेळां शिस्त मानण्यास चटकन तयार होणाऱ्या मुलांपेक्षां देखील अशीं शंकेखोर मुलें पुढें अधिक निष्ठावान बनलेलीं दिसतात. कारण अधिक विचारानंतर त्यांनीं शिस्त मान्य केलेली असते. बाल आणि कुमार वयांत संस्कार घडविण्याचें काम झालेलें नसलें किंवा अगदींच भिन्न संस्कार पक्के रुजले असले तर युवावस्थेंत मुलांवर आपल्याला हवे ते संस्कार करणें कठीण बनतें. १८ ते २० वयांतील मुलांमधील ' मी 'पणा जागृत झालेला असतो. त्याचें जग व्यापक बनलेलें असतें व कित्येकदां विशिष्ट संस्कारांची मर्यादा त्याला संकुचित वाटते आणि त्याच्या मनांत संघर्ष निर्माण होतो.

म्हणूनच युवकांच्या अंतःप्रवृत्ति समजून घेणें व त्या प्रवृत्तींना वाव मिळेल असे कार्यक्रम देऊन त्यांना आकर्षून घेणें, हें महत्त्वाचें कार्य आहे. हाच खरा युवकसंघटनेच्या यशस्वितेचा पाया आहे. निश्चित उद्देश व स्थिर भूमिका हेंच

आपलें भांडवल असतें. त्यांना धरूनच आपले मार्ग व कार्यक्रम ठरवले पाहिजेत.

या दृष्टिकोनांतून आजच्या परिस्थितीकडे पाहिलें पाहिजे. स्वातंत्र्यपूर्व काळांत परिस्थितीची प्रतिक्रिया म्हणून कीं काय पण स्वातंत्र्याची आकांक्षा तरुणांना स्फूर्तिप्रद होऊं शकली. स्वातंत्र्याकांक्षेसाठीं प्रसंगीं शिक्षणावर पाणी सोडण्यास, इतकेंच काय पण प्राणार्पण करण्यासहि तरुण तयार होत होते. आज स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र आपल्याला असें आढळून येतें, कीं सामाजिक व राष्ट्रीयदृष्ट्या तरुणवर्ग हा बेफिकिर बनला आहे. त्याला राष्ट्राच्या प्रश्नांबद्दल अनास्था आहे. सामाजिक दृष्टिकोन स्वीकारण्याचें महत्त्व त्याला वाटत नाहीं. उलट चरितार्थाचा हव्यास ( करियरिझम ) व व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा त्यांच्या जीवनांत श्रेष्ठ ठरली आहे. परीक्षेंत अधिक गुण मिळवावेत, हुशार म्हणून चमकावें व पुढें चांगली नौकरी मिळवून पैसा व तद्जन्य सुखें मिळवावींत, ही आकांक्षा चांगल्या तरुणांच्या जीवनाची प्रेरणा बनली आहे. विशिष्ट दिशेनें चरितार्थ सांभाळणें वाईट नाहीं. ती स्वाभाविक भावना आहे. पण भोंवतालची परिस्थिति विसरून आपल्या चरितार्थांतच इतिकर्तव्यता वाटणें हें सामाजिक दृष्ट्या इष्ट नाहीं. त्यामुळें हें व्यक्तिगत आकांक्षेनें ग्रासलेलें मन सामाजिक वा राष्ट्रीय हिताकडे खेचून आणणें हें आजचें प्रमुख काम आहे. प्रावीण्य मिळविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणें वाईट नाहीं, परंतु प्रावीण्य मिळविणें हीच जीवनाची एकमेव आकांक्षा होतां कामा नये. शिवाय वैयक्तिक प्रावीण्याची हाव ही जर सामाजिक हितसंबंधाला पूरक नसेल व दोहोंमध्यें संघर्ष निर्माण होत असेल तर मात्र वैयक्तिक प्रावीण्याची हाव ही केव्हांहि श्रेष्ठ मानतां येणार नाहीं.

आज तरुणांची वैयक्तिक आकांक्षा राष्ट्रीय व सामाजिक हिताकडे खेचून आणणें हें युवकसंघटनेचें मुख्य काम मानलें तर त्यासाठीं तरुणांना आकर्षून घेईल असा विविध कार्यक्रम देणें आवश्यक आहे. कारण तरुणांची प्रवृत्ति, त्यांची आवडनिवड विविध असते. त्यांच्या सुप्त आकांक्षांना व गुणांना विकसित होण्याची संधि मिळाली तरच त्यांना संघटनेंत रस वाटेल. केवळ उच्च ध्येयात्मक कार्यक्रम ठेवून भागणार नाहीं. तो कदाचित झेपणारहि नाहीं. साधारणपणें तरुणांना प्रत्यक्ष हिताचा व ताबडतोबीच्या

उपयोगाचा होईल असाहि तो कार्यक्रम असावा. जीवनाचें सर्वांगीण स्वरूप त्यांत समाविष्ट असावें. पुढील जीवनाची तयारी करण्याच्या दृष्टीनें ही कार्यक्रमाची आंखणी असावी व तो कार्यक्रम करतां करतां आपल्या दृष्टिकोनाचा त्यावर भर असावा. युरोपांतील युवकसंघटनांतून भावी कौटुंबिक जीवनाची तयारी, औद्योगिक शिक्षण व व्यवसाय यांच्या विविध अभ्यासक्रमांचें मार्गदर्शन हे सर्व विषय घेतले जातात. तरुणांना ते तांतडीच्या उपयोगाचे असतात. पत्रव्यवहारानें निरनिराळी माहितीहि दिली जाते. शारीरिक शिक्षणाची व खेळांची तर तरुणांना नैसर्गिक आवड असते आणि शाळेच्या शिक्षणाला पूरक असें शिक्षण या संघटनांतून द्यायचें म्हटलें म्हणजे शाळेंतून दमलींभागलेलीं मुलेंच आपल्या तासभर वांट्याला येतात. तेव्हां मैदानावरील मोकळ्या हवेंतच त्यांना संस्कार देणें योग्य ठरतें. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्र-सेवा-दल, स्काऊट्स्, गाइड्स् या सर्वांची कार्यपद्धति मैदानी कार्यक्रमद्वारा शिक्षण देण्याचीच आहे. खेळांतून व मैदानी कार्यक्रमांतून केवळ शरीरच निरोगी बनतें असें नाहीं तर मनहि निरोगी बनतें. बंधुभाव, खेळाडू वृत्ति, संघभावना ही खेळांतून निर्माण होते हें आपण पाहतोंच. शिवाय सहभागी असणाऱ्या प्रत्येकाला प्रत्यक्ष क्रिया करण्यास संधि मिळते. म्हणून मैदानी शिक्षण हें युवकसंघटनेचें प्रधान अंग असतें. पण या शिक्षणांतहि विविधता आवश्यक असते. व्यक्तिगत व सांघिक असे दोन्ही भाग त्यांत येतील. देशी, विदेशी, तरुणांना आवडतील व त्यांच्यामध्यें निरोगी स्पर्धावृत्ति निर्माण करतील अशा विविध शारीरिक कार्यक्रमांची निवड केली पाहिजे. बौद्धिक शिक्षण असा योग्य दृष्टिकोन देण्यासाठीं आवश्यकच असतें. निरनिराळ्या चालू विषयांवर माहिती देणें, नव्या नव्या शोधांचें ज्ञान देणें, सैद्धांतिक विषय मनोरंजक करून सांगणें, थोरांचीं चरित्रें वाचण्यास प्रवृत्त करणें हीं विविध अंगें तर आज आपण हाताळतोंच, पण त्या बरोबरच विविध तांत्रिक विषयांचें ज्ञान, निरनिराळीं शास्त्रें यांचीं अभ्यासमंडळेंहि आवश्यक आहेत. धाडसी वृत्तीची जोपासना होण्यास गिर्यारोहण या विषयाकडे त्यांचें चित्त वेधून घेणें इष्ट आहे. अलिकडे या विषयाचें पद्धतशीर शिक्षण देण्याची योजना झाली आहे. आपल्या संघटने-मार्फत सुद्धां तरुण पाठवून ते त्यांत सहभागी होतील असा प्रयत्न राष्ट्र-सेवा-

दलानें केला आहे. सध्यां ग्लाइडिंगचा कोर्स अतिशय कमी खर्चांत उपलब्ध झाला आहे. प्रत्येक पाठाला एक रुपया इतका अल्प खर्च असतो. साठ पाठ घेऊन शिक्षणक्रम पुरा करतां येतो. पुण्यास असा शिक्षणक्रम सुरू झाला आहे. या शिक्षणक्रमानंतर अल्प परिश्रमानें विमानोड्डाणाचा (फ्लाइंग लायसन्स) परवाना मिळूं शकतो. अशा अनेक कार्यक्रमांस हात घातला तरच विविध आवडीनिवडीच्या तरुणांना आपण संघटनेंत आणूं शकूं.

चित्रकला, गायन, नृत्य, नाट्य या द्वारें आपण ती ती आवड असणाऱ्या तरुणांमध्यें आत्मीयता निर्माण करूं शकूं. लोकरंजनांतून लोकशिक्षण सुलभ व प्रभावी होऊं शकतें हें आपण पहातोंच. तरुणांना शारीरिक, बौद्धिक, सांस्कृतिक शिक्षण देणाऱ्या विविध संस्था किंवा मंडळेंहि असूं शकतात. पण ज्यांना विशिष्ट ध्येयवादी दृष्टि त्यांना देणें आवश्यक वाटते त्यांनीं या विविध अंगांचा अवलंब एकाच संघटनेंत विविध शाखांद्वारा करणें आवश्यक असतें. योग्य दृष्टिकोनाचा धागा या विविध शिक्षणांना गुंफू शकतो व एक तऱ्हेचें सर्वांगीण व व्यापक असें स्वरूप संघटनेला येऊं शकतें. राष्ट्र-सेवा-दलानें अशाच तऱ्हेचा प्रयत्न केलेला आहे. याशिवाय राष्ट्राला ज्या कार्याची आज गरज असेल त्या कार्याकरतां युवकांना प्रवृत्त करणें व त्याहि कार्याचा समावेश शक्तीनुसार संघटनेंत करणें हितावह ठरतें. आज आपल्या देशाला स्वयंस्फूर्त, विनामोबदला सामुदायिक श्रमाची गरज आहे. योजना आंखल्या तरी त्यांना आवश्यक तो पैसा नसेल तर योजना पडून राहतात. म्हणूनच साने गुरुजींनीं फिरत्या सेवापथकाची कल्पना सेवादलाला दिली व सेवादलानें महाराष्ट्रांत सामुदायिक श्रमाचे प्रत्यक्ष प्रयोग प्रथम करून दाखवले. भू-समस्या हा समाजवादी समाजरचनेचा फार मोठा प्रश्न आहे व भू-दानासारखा त्यावर दुसरा श्रेष्ठ उपाय नाहीं. समाजवादी शील निर्मिण्याच्या दृष्टीनें भूदान आंदोलनाचा फार उपयोग होईल हें पाहतांच आपल्या शक्तीला अनुसरून भूदानपथक चालविण्याचेंहि काम सेवादलानें एक वर्ष केलें. पण या कामीं जितकी आस्था तरुणांच्यामध्यें व एकूण समाजांत दिसायला पाहिजे होती तितकी दिसली नाहीं हें सत्य आहे. ज्याप्रमाणें कम्युनिझम एका देशांत प्रस्थापित होऊं शकणार नाहीं, सबंध जगांत तो प्रस्थापित

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 32039 दि. 1/नोव्हें/५८
क्रमांक 9354 नों: दि: १४/११/५८

करावा लागेल असें कम्युनिस्ट मानतात त्याप्रमाणेंच भूदानानें एका देशांतील संपूर्ण भूमिसमस्या सुटूं शकणार नाहीं.

सामाजिक क्षेत्रांतील तरुणांची उदासीनता किंवा अनास्था ही मागसलेल्याच देशांत आढळते असें नाहीं, तर कित्येकदां पुढारलेल्या देशांतहि आढळून येते. पाश्चिमात्य राष्ट्रांतून क्वेकरसारख्या स्वतंत्र संघटना साऱ्या मानवतेच्या अंतिम हिताकरतां झटत आहेत. त्यांना कित्येकदां तरुणांचीच काय पण साऱ्या देशाची अनास्थाहि आड येते.

तरुणांतील आस्थेचा अभाव दूर करणें हें जितकें आवश्यक तितकेंच अवघड काम आहे. त्यासाठीं कार्यक्रमांची विविधता व आकर्षकता जशी आवश्यक आहे तसेंच कार्यपद्धतींतील कुशलता, नेतृत्व, संघटनेची जागा, साहित्य, आर्थिक बळ इ. गोष्टीहि पहाव्या लागतात.

कार्यपद्धतींतील कुशलता ही त्या त्या कार्यकर्त्यांच्या वैयक्तिक गुणांवर व अनेक कार्यकर्त्यांतील सहकार्यावर अवलंबून असते. तरुणांच्यामध्यें मिसळणें, त्यांचें मन जाणून घेणें, त्यांच्या अडीअडचणी समजून घेणें, त्यांच्याशीं कौटुंबिक नातें निर्माण करणें, वेळप्रसंगीं त्यांना आत्मीयतेनें मदत करणें या सर्व गोष्टी कार्यकर्ता कुशल असेल तर चांगल्या प्रकारें हाताळूं शकतो व मग तो त्या विशिष्ट गटामध्यें लोकप्रिय होतो. कधीं कधीं तर तो तरुणांचा आवडता नायक बनतो. संघटनेला कणखर व स्फूर्तिप्रद नेतृत्वाची फार गरज असते. नेता जितका चारित्र्यसंपन्न असेल तितका त्याचा प्रभाव युवकांवर अधिक झाल्याशिवाय राहणार नाहीं. नेत्यामध्येंच भोंदूपणा किंवा दिखाऊ प्रवृत्ति असेल तर संघटनेचा डोलारा पोकळच राहणार. 'आधीं केलें मग सांगितलें' हें सूत्र असलें पाहिजे, एवढेंच नव्हे तर आपण ज्या गोष्टी आचरणांत आणूं त्याच्या दशांशानें त्या इतरांनीं आणण्याइतकाच आग्रह आपण धरावा. परस्परांतील कौटुंबिक जिव्हाळा वाटतो हाच संघटनेचा खरा आत्मा असतो व हा जिव्हाळा वाढण्यासाठीं श्रेष्ठ नेत्यांची दृष्टि व आचार महत्त्वाचे आहेत. नेत्याच्या त्यागी वृत्तीचा प्रभाव तरुणांच्या मनावर केव्हां ना केव्हां तरी झाल्याशिवाय रहात नाहीं.

संघटनेच्या नेतृत्वाला महत्व असतेंच. पण हें नेतृत्व दबावाचें किंवा हुकूमशाहीचें होतां कामा नये. उलट तरुणांतच नेतृत्वशक्ति कशी निर्माण

करतां येईल हेंहि पाहिलें पाहिजे. कुमारवयापासूनच हें नेतृत्व निर्माण होऊं शकतें. मात्र तसा वाव संघटनेंत त्यांना मिळाला पाहिजे. ज्या विशिष्ट तरुणांमध्यें हें कसब असेल त्यांना तशी संधि देणें आवश्यक असतें. त्यांतून कार्यप्रवणता, त्यांचें मौलिक सामर्थ्य, त्यांचे सुप्त गुण यांचा विकास होत असतो. असें नेतृत्व निर्माण करण्यासाठीं युवकसंघटनेमधील गटागटांचें नेतृत्व त्या त्या क्षेत्रांतील एखाद्या समंजस व हुषार मुलाकडे वा मुलीकडे दिलें पाहिजे. स्वीडनमधील एक अनुभव या दृष्टीनें संस्मरणीय वाटला.

१८ ते २५ वयाच्या नाठाळ ( Delinquents ) तरुणांना मार्गदर्शन करण्याचें काम एका २५।३० वर्षांच्या तरुणीकडे सोंपविण्याचा प्रयोग पाहिला. ते सर्वजण एकाच खोलींत रहात. अशा चार-पांच खोल्यांचें एक वसतिगृह चालविलेलें पाहण्यांत आलें व हा प्रयोग यशस्वी झाल्याचें आढळून आलें. स्त्रियांविषयींचा आदर हा देशांतील तरुणांच्या रक्तांत स्वाभाविक भिनलेला असल्यानें हा प्रयोग यशस्वी होऊं शकला असला पाहिजे. प्रत्यक्ष दैनंदिन कार्यांतला त्यांचा नेता हा त्यांच्यापेक्षां वयानें, ज्ञानानें, अनुभवानें फार मोठा नसावाच. संघटनेंतील श्रेष्ठ नेतृत्व अशा मोठ्या मंडळींकडे असतेंच, परंतु त्या श्रेष्ठ नेतृत्वांत व प्रत्यक्ष सहभागी होणाऱ्या सभासदांत एक सांखळी निर्माण झाली पाहिजे. इतकेंहि करून सहभागी युवकांचें पूर्ण भवितव्य आपण घडवूं शकतोंच असें नाहीं. तें भवितव्य ज्याचें तोच घडवीत असतो. कारण त्याच्या अंतःप्रवृत्ति, पालकांचे विचार, समाजांतील ज्या इतर घटकांत तो वावरतो तो त्याचा परिसर व आपल्या संघटनेंतील संस्कार या सर्वांतून मिळून त्याचें व्यक्तिमत्त्व बनत असतें. त्यांच्यांतील नेतृत्वाला वाव द्यावा या उद्देशानेंच राष्ट्र-सेवा-दलाच्या कार्यांत शाखा व दस्तापद्धतीचा अंगिकार केलेला आहे. दस्तानायक व शाखानायक हे त्या त्या गटाचे नेते होत असतात. युवकांमधून गटांचे नेतेच आपण ज्या प्रकारें निर्माण करूं शकूं त्यावरहि संघटनेचें यश अवलंबून असतें. जीं जीं क्षेत्रें संघटनेचे विभाग म्हणून आपण अंगिकारूं त्या त्या क्षेत्रांत असें नेतृत्व तयार झालें पाहिजे.

परकीय सत्तेचें उच्चाटन करण्यासाठीं समाजांत जोम निर्माण करतां येईल असे प्रचारक निर्माण करणें ही १९०५ ते १९२० पर्यंतची देशाची

मुख्य गरज होती. पुढील पंचवीस वर्षांत ब्रिटिश सरकारशीं असहकार व तो साध्य होण्यासाठीं जातीय ऐक्य व विधायक कार्यकर्तृत्व हें मुख्य उद्दिष्ट होतें.

स्वातंत्र्योत्तर काळांतील गरजा सर्वस्वी भिन्न आहेत. नेपाळ, सिक्कीम, भूतानसारख्या धोक्यांत आलेल्या सीमाप्रदेशांत धाडसी इंजिनीअर्स, डॉक्टर, शिक्षक यांची आवश्यकता आहे; प्रचंड कारखाने व धरणें आहेत त्या ठिकाणीं सचोटीनें व कसोशीनें काम करणारे तज्ज्ञ विद्वान हवे आहेत; ॲटमिक एनर्जी, नॅशनल लॅबोरेटरीज अशा संशोधन क्षेत्रांत ज्ञान तपस्या करणाऱ्यांची गरज आहे. अमलप्रभा दास या आसाममधील गिरीप्रदेशांत कार्य करणाऱ्या त्यागी व कर्तृत्ववान तरुणींपासून स्त्रियांनीं स्फूर्ति घ्यावी. डॉ. प्रफुल्लचंद्र राय व डॉ. श्वाइट्झर अशांच्या दिव्य चरित्रांतून युवकांनीं जीवनसंदेश घ्यावा.

युवकसंघटनेला आवश्यक त्या आर्थिक प्रपंचाचा भार कसा उचलावयाचा हाहि गंभीर प्रश्न आहे. जागा, साहित्य, गणवेश, कार्यकर्त्यांचें वेतन, प्रवास, कचेरी या नाना गोष्टींना खर्चाची आवश्यकता असते. या खर्चाच्या उभारणींत प्रत्यक्ष युवकांचा कांहीं वाटा जरूर असावा, कारण त्यामुळें त्यांची आत्मीयता वाढते. युवक हा स्वतः मिळवता नसतो. त्यामुळें या वांट्याला मर्यादा राहणारच. या अनुषंगानें राष्ट्र सेवा दलानें एके काळीं भर दिलेल्या एका मुद्द्याचा उल्लेख करावयास हरकत नाहीं. सेवा-दलाच्या सैनिकांनीं आपला वार्षिक निधि द्यावाच, पण त्याशिवाय स्वकष्टार्जित निधि मिळवून त्यांनीं संघटनेला द्यावा, असें आवाहन संघटनेनें केलेलें होतें. श्रमाची लाज कधींच वाटतां कामा नये. त्यांतून संघटनेकरतां कराव्या लागणाऱ्या श्रमांत युवकांना आनंदहि वाटण्याची शक्यता आहे. परस्परांत निरोगी स्पर्धेचेंहि वातावरण तयार होणें इष्ट आहे. मात्र स्वकष्टार्जित निधीचें महत्त्व सांगतांना कोणत्या प्रकारचे कष्ट करून मुलांनीं पैसे मिळवावेत, याचें मार्गदर्शनहि नेत्यांनीं केलें पाहिजे.

प्रत्यक्ष युवकांचा वाटा आर्थिक प्रपंचांत कमी असतो, तेव्हां सहाजिकच अन्य मार्गांनीं निधि उभारण्याचे प्रयत्न करावे लागतात. छोट्यामोठ्या देणग्यांतूनहि हें काम करावें लागतें. त्याबरोबरच सरकारची मदत अशा स्वतंत्र युवक संघटनांना घेण्यासहि हरकत नाहीं. देशाचें भवितव्य उज्ज्वल व्हावें,

लोकशाही प्रवृत्तींना प्रोत्साहन मिळावें, लोकांच्या क्रियाशीलतेला वाव मिळावा असें वाटत असेल तर देशाच्या ध्येयधोरणाशीं विसंगत नसतील अशा निरनिराळ्या स्वतंत्र संघटनांना सरकारनें मदत देणें इष्ट आहे. मात्र ही मदत देतांना युवकसंघटनांना कोणत्याहि शर्ती घालणें योग्य होणार नाहीं. निदान युवकसंघटनांनीं अशी मदत स्वीकारतांना ती सशर्त स्वीकारूं नये. संघटनेचें स्वरूप जितकें स्वायत्त राखतां येईल तितकें चांगलें. मात्र उत्कृष्ट जागा मिळवणें, इमारत बांधणें, भरपूर व चांगलें साहित्य घेणें, कचेरी कार्यक्षमतेनें संभाळणें, संघटनेसाठीं चांगले पूर्ण वेळ सेवक मिळविणें हीं सर्व कामें खर्चाचीं असतात व केवळ ऐच्छिक देणग्यांवर हें सर्व भागवणें अतिशय कठीण जातें. म्हणून सरकारची मदत ही त्याज्य नाहीं. लोकशाहीवादी राज्यांतून सरकार केवळ आपल्याच पक्षाच्या अंकित असणाऱ्या संघटनांना अशी मदत देतें असें नाहीं तर सामान्यतः घटनेच्या आड न येणाऱ्या सर्व संघटनांना निःपक्षपातीपणानें मदत देत असतें. सर्व युवकसंघटनांचें एक फेडरेशन असतें व सदस्य संख्येच्या प्रमाणांत सरकारकडून मिळालेली मदत फेडरेशन मार्फत विभागली जाते. मात्र केवळ सरकारी मदतीवर अवलंबून राहणें संघटनेच्या दृष्टीनें केव्हांहि अनिष्टच असते. म्हणून सरकारी मदतीबरोबरच अन्य मार्गांनीं आपला निधि आपण उभा केला पाहिजे व सरकारी मदत सशर्त असेल तर ती न घेतांच काम चालविलें पाहिजे. आज भारतासारख्या देशांत यंत्रणा लोकशाहीची असली तरी खरा गाभा अद्याप लोकशाहीचा निर्माण झालेला नाहीं. खऱ्या लोकशाही तत्त्वांना पोषक असें निरोगी वातावरण नाहीं. पक्षोपपक्षांचीं मनें एकमेकांबद्दल द्वेषानें भरलेलीं आहेत. सरकार व जनता यांच्यामध्यें सामरस्य नाहीं. या दुजाभावाची जबाबदारी अधिक अंशानें सरकारवरच आहे, जनतेवर नाहीं. सरकार स्वपक्षीय संघटनांना जें साहाय्य करतें तें इतरांना करीत नाहीं. इतरांना शक्य तों वाव मिळूं नये ही वृत्ति अतिशय संकुचित आहे. अशा परिस्थितींत स्वतंत्र बाण्याच्या युवकसंघटनांना सरकारी मदत तर मिळत नाहींच, पण त्यांची शक्ति वाढत आहे, नि संघटना तरुणांमध्यें लोकप्रिय होत आहे असें दिसतांच तिला खच्ची करण्याकडे सत्ताधारी पक्षाचें लक्ष लागतें. हें अतिशय वाईट आहे. वातावरण

निरोगी व खेळाडू वृत्तीचें राहावें याची जबाबदारी अर्थात्च मुख्यतः प्रबल पक्षावर असली तरी विरोधी पक्षांवर व स्वतंत्र सामाजिक नेत्यांवरहि कांहीं अंशीं आहेच. जनतेंत ज्या प्रमाणांत समंजस व निरपेक्ष बुद्धीची जोपासना झाली असेल त्याच प्रमाणांत तिचें प्रतिबिंब सरकारी राज्यकारभारांत उमटणार हें मान्यच करावें लागेल.

युवकसंघटनांचा पाया राजकीय असावा कीं नाहीं, असा एक वादाचा मुद्दा नेहमीं उपस्थित होत असतो. सरकार जर खरोखरीनें जनतेचें प्रतिनिधित्व करूं लागलें व देशामध्यें खऱ्या लोकशाहीचें व निरोगी वातावरण निर्माण झालें तर राजकीय बैठकीची आवश्यकता तीव्रतेनें युवक-संघटनांना वाटणारच नाहीं. आंणि यदाकदाचित वाटलीच तरी त्यामध्यें कटुता व द्वेषभाव निर्माण होण्यासारखी परिस्थिती राहाणार नाहीं. भारतांत मात्र अद्याप लोकशाहीचें खरें वातावरण नाहीं. सरकार व जनता यांच्यामध्यें प्रेमाचा धागा निर्माण झालेला नाहीं. पैसा, दबाव, जातीय व इतर हीन दर्जाच्या आवाहनांचा प्रभाव या गोष्टींच राजकारणांत प्रामुख्यानें वावरत आहेत. त्यामुळें या ठिकाणीं युवकसंघटनांना राजकीय बैठक आवश्यक वाटते. अशी बैठक असण्यांत पाप मानण्याचें कारण नाहीं. मात्र राजकीय बैठक असणाऱ्या युवक संघटनांनीं युवकांच्यावर राजकारणाचें प्रभुत्व होणार नाहीं याबद्दल दक्षता बाळगली पाहिजे. विशिष्ट मर्यादेखालील मुलामुलींना तर प्रत्यक्ष राज-कारणापासून दूर ठेवलें पाहिजे. युवकांमधेंहि राजकीय कटुतेचा व गढूळ वातावरणाचा प्रभाव होणार नाहीं याची काळजी घेतली पाहिजे. युवकसंघटना ही शेवटीं एक प्रकारची शैक्षणिक संघटना असते. कारण संस्कार घडविण्याचें काम ती करीत असते. म्हणूनच राजकीय कर्तृत्वापेक्षा विधायक प्रवृत्तीला आवाहन हें त्यामध्यें अधिक महत्त्वाचें असतें. राकारणाचा अभ्यास केव्हांहि योग्यच आहे. विशिष्ट परिस्थितींत त्यांत प्रत्यक्ष भाग घेणेंहि अपरिहार्य बनतें.

राजकीय प्रवृत्ति सत्तावृत्ति जागृत करीत असते. सत्ता की सेवा, हाच युवकसंघटनेपुढील खरा संघर्ष आहे. सेवेसाठीं सत्ता, हें एक सत्तेचें आवरण असतें. लष्करी सामर्थ्यानें झगडणाऱ्या सर्व देशांत कमीजास्त प्रमाणांत

टोटॅलिटेरियन अथवा सर्वंकष लष्करशाही वृत्ति बळावत असते व त्या देशांतून युवकसंघटना ही त्या प्रमाणांत शासनाची बटीक बनते.

युवकसंघटना सरकारी दूषित प्रवृत्तीस आळा घालण्याचें व चांगलें वळण लावण्याचें श्रेष्ठ कार्यहि कांहीं पाश्चात्य देशांतून घडवीत असल्याचें उज्ज्वल उदाहरण आढळून येतें. पण आचार मात्र विधायक असावे हें अधिक इष्ट. अशा तऱ्हेनें सर्वच युवकसंघटनांनीं भर दिला तर भावी राजकारणाचा पायादेखील अधिक शुद्ध व विधायक होऊं शकेल.

अशा तऱ्हेनें युवकसंघटनांचें महत्त्व मोठें आहे. आज बहुतेक सर्व राष्ट्रांतून युवकसंघटना कमीअधिक प्रभावानें काम करीत आहेत. त्यांचा पाया निरनिराळा आहे. कार्यपद्धति निरनिराळी आहे. मागसलेल्या राष्ट्रांतील युवकसंघटनांचें भवितव्य, तेथील लोकशाहीचें वातावरण, सरकारची दृष्टि, नेत्यांचे विचार व राष्ट्राची आर्थिक व शैक्षणिक पातळी यांवर अवलंबून आहे. या गोष्टी जितक्या निकोप बनतील तितक्या प्रमाणावर युवक संघटना खऱ्याखुऱ्या कणखर बनतील व देशाचें भवितव्य घडवतील. लोकशाही दृष्टिकोनांतून व मानवहिताच्या अंतिम भावनेनें राष्ट्रें एकमेकांच्या जितकीं अधिक जवळ देतील तितकीं विश्वकुटुंबाची भावनाहि युवकसंघटनांच्या द्वारा निर्माण होईल.

* * *

# शारीरिक शिक्षण

मनुष्य प्राण्याला ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें जन्मजात प्राप्त झालेलीं असतात. सामान्यतः हात, पाय, नाक, डोळे हीं सर्वांनाच असतात. पण त्यांतील रेखीवपणा किंवा सौंदर्य हीं सममाणांत नसतात. शरीरसौंदर्य ही ईश्वराची देणगी आहे. " रूप लावण्य अभ्यासितां न ये" हें खरें आहे. तसेंच बुद्धि आणि मन यासंबंधींहि म्हणतां येईल. दहा माणसें घेतलीं तर ईश्वरानें सर्वांना बुद्धि दिलीं आहे. पण ती सम प्रमाणांत दिलेलीं नसते. ही विषमता जरी ईश्वराधीन असली तरी व्यासंगानें बुद्धीची तीव्रता व मनाची संस्कारक्षमता ही वाढवितां येईल. शरीर हें तर अधिकच मनुष्याधीन आहे. शरीराची ठेवण मनुष्यास बदलतां येणार नाहीं, पण शरीरांतील क्षमता कितीतरी प्रमाणांत वाढवितां येते.

शरीर, मन व बुद्धि यांची वाढ करण्यासाठीं मानवी प्राण्यानें जे यशस्वी प्रयत्न केलेले आहेत त्या प्रयत्नांसच आपणांस शिक्षण असें म्हणावें लागेल. शरीर, मन व बुद्धि यांची समप्रमाणांत, समतोलांत यथायोग्य रीत्या वाढ करणें, हें व्यापक शिक्षणाचें निश्चित उद्दिष्ट असावें. या मुद्यांतील शारीरिक शिक्षणाचा विचार प्रामुख्यानें या ठिकाणीं प्रस्तुत आहे.

खरें व व्यापक शिक्षण एकांगी असूं शकत नाहीं; निदान तसें असतां कामा नये. मानवी प्राण्यांतील हीं विविध अंगें हीं कांहीं सांचेबंद नाहींत. शारीरिक शिक्षणाचा विचार करतांना बुद्धीचा आणि मनाचा कप्पा हा कांहीं बंद ठेवलेला नसतो. बुद्धीचा वापर करून व मन संस्कारक्षम होईल अशा पद्धतीनें शारीरिक शिक्षण देतां देईल.

आतां प्रामुख्यानें यथासांग शारीरिक शिक्षण देतां येण्याचा शास्त्रोक्त, व्यावहारिक व यशस्वी मार्ग कोणता यासंबंधीं आपण विचार करूं या. शिक्षण देण्याची यंत्रणा एजन्सी— कोणती–वगैरे प्रश्नांचा उहापोह करावा लागेल, त्याचप्रमाणें मानवी आयुष्यांतील कोणत्या वयोमानांत विशेष भर देऊन हें उद्दिष्ट साधतां येईल, याचा विचार करावा लागेल.

वरील बाबींचा विचार करतांना प्रामुख्यानें भारतीय समाजाची मर्यादा घालूनच विचार केला पाहिजे. शिक्षणाचा साकल्यानें विचार करावयाचा झाला तर स्थूलमानानें दोन तऱ्हेच्या स्वरूपांसंबंधीं विचार करावा लागेल. त्यांतील एक स्वरूप हें चिरंतन असेल व दुसरें परिस्थितिजन्य असेल. त्याचाच अर्थ, एक उद्दिष्ट हें चिरकालिक स्वरूपाचें व दुसरें परिस्थितिनुरूप बदलणारें असें असणार. शारीरिक शिक्षणासंबंधींहि आपणाला असेंच म्हणतां येईल.

शरीर निकोप असावें, आरोग्ययुक्त असावें, हरेक प्रकारच्या शारीरिक व बौद्धिक अपेक्षा पूर्ण करण्यास कार्यक्षम असावें, हें कोणीहि मान्य करील. पण कार्यक्षमतेची कसोटी कोणती, साध्य काय, ह्याबाबत निश्चिती किंवा चिरकालिकता असूं शकणार नाहीं.

मानवी समाज अधिकाधिक संघटित होऊं लागला व त्याच्या उपजीविकेच्या साधनांत निसर्गापेक्षां उत्पादनशक्तीवर भर येऊं लागला तेव्हा त्यामध्यें बेताबेतानें प्रादेशिकता येऊं लागली. कोण कोणापेक्षां मोठा, कोण अधिक पराक्रमी, ह्याबाबत विजिगीषु वृत्ति निर्माण झाली तेव्हा मानवामध्यें संघर्ष सुरू झाले. या संघर्षाला बेताबेतानें संग्रामाचें स्वरूप येत चाललें. त्यामुळें समाजाचें अंतिम उद्दिष्ट युद्धप्रियता व यशस्विता हेंच होऊन बसूं लागलें. यामुळें राष्ट्रासाठीं झगडणारे वीर निर्माण करणें व त्या वीरांनीं आपल्याकडे यश खेंचून घेण्यासाठीं कार्यक्षमता संपादन करणें हा शारीरिक शिक्षणाचा प्रधान हेतू होऊन बसला. प्राचीन काळांत युद्धाचें स्वरूप प्राधान्यें करून शरीरसामर्थ्याच्या यशस्वितेवर अवलंबून असणारें असें होतें. पुढें युद्धें यशस्वी होण्यास शस्त्रांची आवश्यकता भासूं लागली व शस्त्रांप्रमाणेंच उत्पादनसाधनें व त्यांचा क्रय-विक्रय यांची भर पडून युद्ध हें केवळ तांत्रिक युद्धकुशलता ( स्ट्रॅटजी )

एवढ्यावर अवलंबून न राहतां तो प्रश्न आर्थिक व विज्ञानाचा विषय होऊन बसला. हें जरी खरें असलें तरी आज राष्ट्रांचे जे दोन मोठे गट पडले आहेत त्यांमध्यें शस्त्रसंभार अधिक यशस्वी कोणाचा हें दाखविण्यांत जितकी चढाओढ लागलेली आहे तितकीच चढाओढ ऑलिंपिकच्या सामन्यांमध्येंहि दिसून येते. म्हणजे युद्धाचें तंत्र व मंत्र बदलले तरी पायाभूत शारीरिक क्षमतेसंबंधींची आस्था कायमच आहे.

थोडक्यांत आजच्या प्रगत पाश्चात्य देशांत लहानपणापासून तो कुमार युवक व प्रौढ यांच्यापर्यंत शरीर आधुनिक युद्धशास्त्रास कोठेंहि कमी पडणार नाहीं, शरीराबरोबर मन व बुद्धि हींहि तितकीच युद्धप्रसंगास तोंड देण्यास लायक असेल, या दृष्टीनेंच समाजनेत्यांचा विचार चालू असतो. तात्पर्य, शरीरसंपदेचा निकष युद्धानुकूलता व युद्ध यशस्विता हा असावा असें दिसतें.

जागतिक युद्धस्पर्धा ही मानवी जीवनाचें यशोमंदिर असूं शकेल का, असावें का, असणें इष्ट आहे का, ह्यासंबंधीं गंभीरपणें विचार करण्याची पाळी येऊन ठेपली आहे असें वाटतें. मानवी आकांक्षांतील संघर्ष युद्धाहून वेगळ्या तऱ्हेनें सोडविण्याचे मार्ग चोखाळले पाहिजेत, असा भारताचा नवा विचार जगापुढें मांडण्याला संधि प्राप्त झाली आहे. हा विचार साध्य होणें न होणें हें कांहीं केवळ भारतीय विचारसरणीवर अवलंबून रहाणार नाहीं. पण शारीरिक शिक्षणासंबंधीं विचार करीत असतांना तो उद्देश स्थूलमानानें गृहीत धरून व मान्य करून विचार करावयाचा आहे.

भारतास दीर्घकालानंतर नुकतेंच कुठें राष्ट्रीय स्वातंत्र्य प्राप्त झालें आहे. दीर्घकालीन दास्याचा जनमानसावर फारच घोर दुष्परिणाम होत असतो. शिक्षणानें आमची पिढी बुद्धीनें तेजस्वी, मनानें खंबीर व शरीरानें धष्टपुष्ट आणि म्हणून सर्व दृष्टीनें कर्तव्यदक्ष व्हावी असें परकीय सरकारास वाटणें शक्य तरी कसें आहे? सबब त्यांनीं दिलेलें शिक्षण अत्यंत अपुरें, समतोल नसलेलें असें असणें अपरिहार्य होतें. ही अनुचित परिस्थिति आमूलाग्र पालटून, साकल्यानें विचार करून नवीन जोमानें, नवीन पद्धतीनें, नवीन आकांक्षांनीं प्रेरित होऊन नवी शिक्षणपद्धति आपल्याला कार्यान्वित करावी लागेल.

भारताला ज्या तऱ्हेची राज्यव्यवस्था व नवीन समाजव्यवस्था अभिप्रेत आहे, ती यशस्वी रीत्या साध्य करून घ्यावयाची तर परक्यांनीं अवलंबिलेल्या शिक्षण पद्धतीपेक्षां सर्वस्वीं भिन्न पद्धतीनें आपल्याला शिक्षणाचा नव्यानें विचार करावा लागणार आहे.

शिक्षणाचीं सूत्रें, तज्जन्य कार्यपद्धति व त्याची क्रमवार सिद्धता, या गोष्टी यथासांग पार पडाव्या म्हणून लोकशाहीवर आधारलेल्या सरकारला या गोष्टी पार पाडतांना जनतेच्या उत्स्फूर्त सहकार्याची अपेक्षा आहे. कायदे-बाजीच्या जोरावर या गोष्टी साध्य करून घेतां येणार नाहींत.

शिक्षण प्रामुख्येंकरून सरकारच्या हातीं असणार. त्याची योजना, त्याच्या सर्वांगीण योजनेंत आर्थिक व इतर प्रश्नांचा अंतर्भाव अवश्य झाला पाहिजे. शिक्षण सार्वत्रिक व मोफत व्हावें, निदान प्राथमिक व दुय्यम स्वरूपाचें शिक्षण मोफत व्हावें असें सरकारी तिसऱ्या योजनेनें संकल्पिलें आहे. या शिक्षणाच्या उद्दिष्टांत शारीरिक शिक्षण हें अंगभूत किंबहुना पायाभूत असावें आणि असलें पाहिजे हें धोरण मान्य होऊन तें ज्या प्रमाणांत कृतीमध्यें अवतरेल त्या प्रमाणांत कुमार, युवक अवस्थेंतील मुलांमुलींना शारीरिक शिक्षण संपादण्याची यथासांग व्यवस्था उपलब्ध होईल.

वरील दृष्टि यथायोग्य रीत्या साध्य करण्याची क्षमता सरकारी योजनांत दिसून येत नाहीं, असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. माध्यमिक शिक्षण आवश्यक, सार्वत्रिक व मोफत होणार असेल तेव्हां होवो, पण तें ज्या प्रमाणांत उपलब्ध झालें आहे त्या प्रमाणांत किंवा उच्च शिक्षणांत ज्या मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च होत आहे त्याहि ठिकाणीं शारीरिक शिक्षणाचा अंतर्भाव योग्य रीत्या सार्वत्रिक, मोफत व आवश्यक व्हावा असें मानलें गेल्याचें मुळींच आढळून येत नाहीं.

शिक्षणाची व्याप्ति वाढत असतांना शिक्षणाची गुणात्मकता वाढते आहे कीं नाहीं हें दक्षतेनें पाहाण्याची व कृतींत आणण्याची दृष्टि, शिक्षणशास्त्र ज्यांचें हातीं आहे त्या शिल्पकारांनीं दाखविली आहे असें म्हणतां येणार नाहीं.

शिक्षणांत अविभाज्य रीत्या शारीरिक शिक्षणाचा अंतर्भाव झाला पाहिजे. शिक्षणांत, परीक्षेसाठीं विविध विषयांना जें प्राधान्य दिलेलें असतें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 32031 वि: ...
क्रमांक 1365 नोंः दिः 21458



त्यापेक्षां रतीभरहि कमी नाही इतकें महत्त्व शारीरिक शिक्षणाला मिळालें पाहिजे. विशेषतः माध्यमिक शाळांत जे वेगवेगळे विषय प्रवेश परीक्षेपर्यंत आवश्यक मानले जातात त्यांतील एक विषय शारीरिक शिक्षण हा आवश्यक म्हणून मानला पाहिजे. इतिहास, भूगोल कीं नागरिकशास्त्र यांबाबत पुढील वर्गांत पर्याय असतो. अंकगणित कीं भूमिति कीं बीजगणित याबद्दलहि पर्याय असेल. मातृभाषा, संस्कृत कीं हिन्दी याबद्दलहि पर्याय असेल परंतु शारीरिक शिक्षणास पर्याय नसावा.

हें सूत्र जर शिक्षणाधिकारी, शिक्षणखातें, किंवा कॉर्पोरेशन्स वगैरे ज्या यंत्रणा आहेत त्यांनीं मान्य केलें व शाळा काढण्यास परवानगी देतांना शारीरिक शिक्षण देण्याची, सर्व विद्यार्थ्यांना आवश्यक म्हणून शारीरिक शिक्षण देण्यासाठीं यथोचित शिक्षक, क्रीडांगणें व त्यासाठीं लागणारीं साधनें हीं उपलब्ध करून देण्याची आवश्यकता मानून त्याबाबत कमतरता अगर वैगुण्य असल्यास शाळा काढण्यास परवानगी नाकारणें हा उपाय व बडगा वापरणें कदाचित सुलभ असलें तरी अयुक्त आहे. उलटपक्षीं वरील सर्व अनुकूल परिस्थिति शाळांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आपल्या शिरावर आहे असें सरकारी खात्यांनीं – मग ती शाळा सरकारची असो, बोर्डाची असो वा कॉर्पोरेशनची असो – त्या सर्वांनीं ही जबाबदारी पार पाडणें आपलें पवित्र कर्तव्य आहे असें मानलें पाहिजे. निदान दहा ते एकवीस वर्षांपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व मुलांमुलींनीं आवश्यक अशा शारीरिक शिक्षणाची सोय झाली पाहिजे, ती साध्य करण्यासाठीं कोणते उपाय योजावे, कोणती पद्धति स्वीकारावी हें आतां पाहिलें पाहिजे.

स्थूलसानानें विचार करतां वयाच्या आठ-दहा वर्षांपर्यंत मुलां-मुलींना स्वैरपणें खेळतां बागडतां येईल, त्यांच्या इच्छेनुरूप कांहीं खेळ खेळतां येतील, कांहीं गाणीं म्हणतां येतील, कांहीं नृत्यें करतां येतील, लेझीम, टिपऱ्या यासारखे खेळ खेळतां येतील; अशा विविध मार्गांची त्यांना सोय करून द्यावी. त्यामुळें त्यांच्या शरीराची आवश्यक ती वाढ होऊन त्यांना चित्ताची प्रसन्नता लाभली असल्यास त्या शरीराची जोपासना होईल, त्यांच्यामध्यें चापल्य येईल व अल्प प्रमाणांत आवश्यक असणारा काटकपणाहि येईल. हौशी शिक्षकांच्या देखरेखीखालीं ऋतुमानाप्रमाणें

लहानमोठ्या सहली काढाव्या. शाळेभोंवतालच्या बागेंत मातींत खेळत-खेळत काम करावें. बागेला पाणी देऊन बागेंत वाढणारीं फुलें वा भाजीपाला पाहून त्यांचा आनंद उफाळेल व त्याबरोबरच शरीरास नकळत पुष्टी मिळेल आणि अल्प प्रमाणांत कष्ट करण्याची तमा तीं मुलें बाळगणार नाहींत.

वरील परिच्छेदावरून हें सहज ध्यानीं येईल कीं प्राथमिक शिक्षणाच्या अवस्थेमध्यें विद्यार्थ्यांचें वय सुमारें नऊ ते दहा असावें असें आम्ही मानलें आहे. मुलांच्या या बाल्यावस्थेंत शारीरिक शिक्षणाची सक्ती हें स्वरूप नसावें, हें व्यापक शिक्षणाचें श्रेष्ठ सूत्र अनुस्यूत आहे. आपल्या पूर्वजांनीं शिक्षणाच्याबाबतींत अतिशय खोल विचार व नितांत दृष्टि राखून शिक्षणासंबंधीं विचार केला आहे. आठ-नऊ वर्षांचें वय हें नेमकें व्रतबंधाचें वय. व्रतबंध म्हणजे व्रतें स्वीकारण्याची कल्पना मुलांनीं बेताबेतानें स्वीकारावी हाच अर्थ आहे. या पुढील काळांतसुद्धां त्यांना ज्या संवयी लागाव्यात अशी आपली अपेक्षा असणार तीसुद्धां सक्तीनें नव्हे, तर त्यांनीं व्रतांचा स्वीकार करावा, अशी अपेक्षा आहे; असें त्यांतील मूलगामी धोरण आहे.

आज आपल्या शिक्षणाच्या धोरणांत मुख्य अपेक्षा व दृष्टि ही नोकरी किंवा करियर (Career) यांवर अधिष्ठित आहे. विशिष्ट वयांत विशिष्ट शिक्षणक्रमासाठीं प्रवेश मिळाला तरच तो शिक्षणक्रम लाभणार व नंतर भल्या मोठ्या पगाराची विशिष्ट नोकरी उपलब्ध होणार, हा विचार विशेष शिक्षित व प्रगत (?) समाजाच्या डोळ्यांपुढें राहिला असल्यानें पांचव्या किंवा सहाव्या वर्षीं मूल दुसऱ्या यत्तेंत गेलें पाहिजे व पंधराव्या वर्षीं त्यानें प्रवेश परीक्षेंत उत्तीर्ण झालें पाहिजे, ही सर्वश्रेष्ठ कर्तबगारी व बहाद्दुरी असें मानलें जातें. अगदीं अलीकडे विद्यापीठांतून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांच्या अल्प वयामुळें ज्या कांहीं शैक्षणिक आपत्ती निर्माण होऊं शकतात त्यांची कल्पना आल्यानें प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्याचें वय सतराच्या वर असावें ही दृष्टी मान्य व्हावी असे प्रयत्न सुरू झाले आहेत, ही आशादायी घटना होय. आमच्या मतें हा विचार ताबडतोबीनें कृतींत येणें आवश्यक आहे. पाश्चात्य देशांतील मुलें आपल्या मुलांपेक्षां कितीतरी उफाड्याची असतात. तरीसुद्धां हें वय सतरा वर्षांचें असावें हें त्यांनीं मान्य केलें आहे. या शालान्त समयीं तो मुलगा पांच फूट सात–आठ इंच इतक्या उंचीचा

असण्याचा संभव असतो. त्या उलट आपल्यांतील प्रगत (?) समाजाचा पंधरा वर्षांचा मुलगा प्रवेश परीक्षा चांगल्या रीतीनें उत्तीर्ण होणारा पण बहुधा पांच फूट उंचीचा व सुमारें ९० ते १०० भारी वजनाचा जवान (!) पाहिला म्हणजे आपली परिस्थिति किती खेदजनक आहे हें सहज ध्यानीं येईल. मिलिटरी ॲकॅडेमीनें अशा जवानांचा अव्हेर केला असल्यामुळें ही दृष्टी थोडी पालटूं लागली आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु युनिव्हर्सिटीनें जर अशा जवानांस कोठेंच प्रवेश मिळूं शकत नाहीं असें दाखवून दिलें तर परिस्थिति झपाट्यानें पालटूं शकेल.

विद्यार्थ्यास कमी उंचीमुळें, कमी वजनामुळें अगर कमी शारीरिक कुवतीमुळें युनिव्हर्सिटीनें प्रवेशास नकार दिला म्हणजे आम्हांस मोठी धन्यता वाटेल असा गैरसमज कोणीहि करून घेण्याचें कारण नाहीं. " येथें बोल नाहीं शिष्यासी " असें आमचें सामान्य धोरण असणार. विद्यार्थी कमकुवत असूं शकणारच नाहीं अशा तऱ्हेचें शैक्षणिक धोरण मान्य झालें पाहिजे, हा तर आमचा आग्रह. शालान्त परीक्षेचे वेळीं तो किमान सोळापेक्षां अधिक वयाचा असेल, सुदृढ असेल, तेजस्वी असेल व हिंमतवान असेल अशा तऱ्हेचें शारीरिक शिक्षण दहा ते सतरा या त्याच्या माध्यमिक शिक्षणाच्या वयांत देण्याची निरपवाद सोय आपण केली पाहिजे, हा आमचा आग्रह आहे. या शारीरिक शिक्षणाचें स्वरूप काय, पद्धति कोणती, तें कोणी द्यावें हा तपशीलवार विचार आतां आपणांस करावयाचा आहे.

शाळांमधून वेगवेगळ्या विषयांचा शिक्षण देण्याचा आराखडा तयार असतो व तो आराखडा पार पाडण्यासाठीं जें वेळापत्रक ठरलें असेल त्याबरहुकुम कोणाहि शिक्षकांस चालावें लागतें. बव्हंशीं अशा स्वरूपाची शारीरिक शिक्षणाची योजना आंखलेली असली पाहिजे. आज अशा तऱ्हेची आंखणी मुळींच आढळत नाहीं. किंबहुना शारीरिक शिक्षण देण्यास आपण बांधलेलों आहोंत ही भावनाच शाळाचालकांच्या मनांत नसते. महत्त्वाचा विषय शिकविण्यास आवश्यक तज्ज्ञ शिक्षकांना शाळेच्या बाजारांत जशी मागणी असते तसेच शारीरिक शिक्षक उपलब्ध होतील अशा शिक्षणाची योजना, ही एक आवश्यक बाब. शारीरिक शिक्षणासाठीं

आवश्यक क्रीडांगण ही दुसरी महत्त्वाची बाब व आवश्यक त्या शिक्षण साधनांचा पुरवठा ही तिसरी महत्त्वाची बाब. हीं कशी उपलब्ध होणार हा विचार करूं या.

शारीरिक शिक्षण देण्यास युक्त शिक्षक कसे तयार करतां येतील, ते किती प्रमाणांत व किती संख्येनें लागतील यासंबंधींचा विचार करूं. जितके विद्यार्थी असतील त्या विद्यार्थ्यांच्या चाळीस विद्यार्थ्यांमागें एक–हें बौद्धिक शिक्षणास जसें प्रमाण मानलें जातें हेंच प्रमाण शारीरिक शिक्षणासाठीं मानलें जावें. कोणी तरी एक शिक्षक–कांदिवलीचे नऊ महिने शिक्षण घेऊन किंवा नॅशनल ॲकेडमीचें तीन महिन्यांचें शिक्षण घेऊन आलेल्या एका मॅट्रिक्युलेट शिक्षकाच्या स्वाधीन सबंध शाळेंतील मुलांच्या शारीरिक शिक्षणाची जबाबदारी सोपविणें सर्वथैव अनुचित होय. आजच्या अडचणी लक्षांत घेतां सुद्धां असें म्हणतां येईल कीं, शारीरिक शिक्षणांत किमान प्रगति केलेल्या व पुरेसें लक्ष दिलेल्या तरुणास प्रवेश परीक्षेस किमान एक वर्षाचें योजनाबद्ध शिक्षण दिलें जाईल अशी व्यवस्था केली पाहिजे. शाळेंतील त्याचा दर्जा इतर विषय शिकविणाऱ्या शिक्षकांपेक्षां यत्किंचितहि कमी मानला जाऊं नये. हें धोरण शिक्षणशास्त्रज्ञांनीं व शिक्षणखात्यानें अद्याप मान्यच केलेलें नाहीं. कॉलेजमध्यें वेगवेगळ्या विषयांचें शिक्षण घेऊन विद्यार्थी पदवीधर होतो तितक्या मुदतीचे योजनाबद्ध शिक्षणक्रम देऊन शारीरिक शिक्षणाचा विद्यार्थी पदवीधर झाला पाहिजे. त्यानंतर पदव्युत्तर शिक्षणाची ( Post-graduate ) जशी व्यवस्था केलेली असते तशी पदवीधर शारीरिक शिक्षकासहि शिक्षण देण्याची योजना हवी. किंबहुना, संशोधनात्मक कार्यानंतर जशी डॉक्टरेट लाभते तशी शारीरिक शिक्षणाची डॉक्टरेटहि असेल. तात्पर्य शारीरिक शिक्षणाचा पदवीधर अगर डॉक्टर हा कोणत्याहि विषयाच्या पदवीधर अगर डॉक्टरपेक्षां यत्किंचितहि कमी दर्जाचा मानण्याचा संभवच उद्भवतां कामा नये. अशा तऱ्हेची व्यवस्था झाल्यास शारीरिक शिक्षणाची उपेक्षा, कमतरता व अज्ञान या गोष्टी यथाकाल नाहींशा होतील. अशा तऱ्हेचा शारीरिक शिक्षण पदवीधर व डॉक्टर हा शाळांचा मुख्याध्यापकहि असेल अगर कॉलेजीसमध्यें प्रिन्सिपॉलहि असेल. अशा तऱ्हेचे शारीरिक शिक्षणाचे मूलगामी बदल घडवून आणण्याचें धोरण आपणास आंखावें लागेल.

शहरांत ज्या दाट वस्तीनें लोक रहातात ती पद्धति अनेक दृष्टींनीं गैर आहे. ती नवीन टाउनप्लॅनिंगच्या उपक्रमानें केव्हां बदलणार असेल तीं बदलो; परंतु माध्यमिक शाळांच्या सर्व विद्यार्थ्यांना थोड्या आगें-मागें का होईना परंतु यथोचित व्यायाम घेण्याची सोय होऊं शकते, अशा तऱ्हेचें क्रीडांगण शाळांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी नगरपालिकेवर आहे, एज्युकेशन बोर्डावर आहे, सरकारी शाळाखात्यावर आहे, सबंध देशाच्या पांच-पांच वर्षांच्या योजना आंखणारांवर आहे, हे जेव्हां मान्य होईल तो सुदिन. एक इंचसुद्धां क्रीडांगणासाठीं जागा नसलेल्या शाळांना मान्यता मिळूं शकते ! हें बदलण्यासाठीं कूर्मगतीनें कांहीं प्रयत्न चालू आहेत. पण तेवढ्यानें मुळींच भागणार नाहीं. अलीकडे शहरांतून बागांची योजना आंखण्याचें चांगलें धोरण आंखलेलें दिसून येतें. पण त्याहिपेक्षां अधिक तांतडीची आवश्यकता क्रीडांगणाची आहे. पन्नास हजार वस्तीचें एक शहर जर आपण मानलें तर त्यामध्यें सुमारें दहा हजार मुलें मुली आठ ते चोवीस वयाच्या असणार. या दहा हजारांना यथोचित रीतीनें खेळासाठीं व व्यायामासाठीं समावेश होऊं शकेल एवढीं क्रीडांगणें त्या शहरानें उपलब्ध करून दिलीं पाहिजेत. मुंबईच्या तीस लाख वस्तीस अशा तऱ्हेनें सहा लाख मुलां-मुलींसाठीं किंवा तरुण तरुणींसाठीं म्हणा, पुरेशीं क्रीडांगणें आंखण्याची योजना प्रगत मानलेल्या मुंबईसारख्या शहरानें साध्य करून देण्याची पुण्याई साध्य करून घ्यावी. आज मुंबई शहरांत सहा लाखांऐवजीं जेमतेम दहा-बारा हजार विद्यार्थ्यांची सोय होईल यापेक्षां अधिक क्रीडांगणें मुंबई शहरांत आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. म्हणजे मुंबई शहरांत आवश्यक क्रीडांगणांच्या दोन शतांश प्रमाणांत क्रीडांगणें उपलब्ध आहेत. याबाबत ‘ दिल्ली बहोत दूर है ’ ही म्हण फारच अपुरी पडेल, ‘ चन्द्र बहोत दूर है ’ असें म्हणावें लागेल. बृहन्मुंबईची योजना, बृहत् पुणें शहराची योजना ज्या ज्या ‘ बृहत् ’ शहरांच्या योजना आंखल्या जातील त्या शहरांच्या आंखणीमध्यें क्रीडांगण या विषयास महत्वाचें स्थान दिलें जाणें जरूर आहे. तरुणांपुढें बोलतांना देशाचें भवितव्य तुमच्या हातीं आहे असें सर्वजण घोषित करीत असतात. पण ती घोषणा साध्य होण्या-बाबतची जबाबदारी प्राधान्यें करून आपली आहे, या गोष्टीचा सोयीस्कर

विसर पडूं देऊं नये. कित्येक वेळां या दृष्टीनें असें मनांत येतें कीं नेहरूंना मुलांविषयीं अत्यंत प्रेम आहे तर मुंबईसारख्या शहरांत माध्यमिक शाळांतील एक लाख विद्यार्थ्यांनीं प्रचंड मैदानावर जमून नेहरूचाचांपुढें खेळण्याच्या मैदानांची मागणी एकमुखानें मांडावी. त्या विषयींची सविस्तर योजना व आराखडा पंडितजींकडे अगोदर सादर व्हावा—त्या विद्यार्थ्यांचें शिष्टमंडळ जरूरीनुरूप योग्य त्या ठिकाणीं व योग्य प्रसंगीं नेहरूंच्या भेटीस न्यावें. त्या मंडळानें आपली युक्त मागणी अत्यंत नम्रपणें पंडित नेहरूंपुढें मांडावी, विद्यार्थ्यांनीं वडिलांजवळ जर आपला हट्ट मांडला नाहीं तर तो त्यांनीं कोठें मांडायचा ?

एका आठ-दहा हजार वस्तीच्या लहान गांवांत जाण्याचा योग आला. माध्यमिक शाळेच्या मागेंच सहसा दिसून न येणारें एक विस्तृत क्रीडांगण नजरेस पडल्यानें मोठा आनंद झाला. पण त्याचवेळीं सायंकाळच्या सहाच्या सुमारास तें सर्व क्रीडांगण निर्जीव, निर्विद्यार्थी होते. एकहि मुलगा अगर मुलगी तेथें नसल्याचें पाहून अतिशय दुःख झालें. शाळेंतील शिक्षक महाभाग त्यावेळीं कोणत्या महदुद्योगांत गुंतले असतील हें एक हरी जाणें किंवा ते शिक्षकच जाणोत ! एकहि विद्यार्थी नसण्याची ही परिस्थिति त्याच दिवशीं कांहीं कारणांमुळें घडली होती कीं ती रोजचीच अवस्था आहे, हेंहि मी आजूबाजूच्या लोकांस विचारून पाहिलें; तो नित्याचाच प्रकार आहे असें कळलें. धन्य ती शाळा, धन्य ते शिक्षक, धन्य ती नगरपालिका—आणि शेवट—धन्य ते पालक ! समाजांतील ही सार्वत्रिक उदासीनता, अज्ञान व निष्क्रियता घालविणें हें काम किती दुर्घट आहे हें यावरून सहज ध्यानीं येईल.

शारीरिक शिक्षणाची योजना ही ऋतुमानावर अवलंबून असणार. पावसाळा, हिंवाळा व उन्हाळा हे वर्षांतील मुख्य तीन विभाग. शिक्षणक्रमांतलें उद्दिष्टहि या ठिकाणीं नमूद करणें जरूर आहे. कारण उद्दिष्टानुरूप तें साध्य करून देणारा शिक्षणक्रम असणार. दहा ते सोळा हें वयोमान आपण माध्यमिक शिक्षणाचें मानलें आहे. शरीरवाढ सर्वांगीण व यथोचित व्हावी या दृष्टीनें या वयासाठीं शिक्षणक्रम आंखला पाहिजे. आपला देश गरीब आहे, शेतीप्रधान आहे. शेतीचा विकास करण्यासाठीं जमीनसुधारणा

फार मोठ्या प्रमाणांत घडवून आणण्याची तळमळ थोडीतरी या वयांत निर्माण झाली पाहिजे. तसें काम करण्यास शरीर कणखर झालें पाहिजे. ऐंशी टक्के विद्यार्थी शहरापासून दूर असलेल्या भागांत राहणारे असतील, पन्नास टक्के विद्यार्थ्यांचे पालक शेतीशीं संबंधित असणार, ही गोष्ट प्रामुख्यानें ध्यानीं घेतली पाहिजे. तरुण वयांत स्पर्धेची हौस असते. ती डावलून चालणार नाहीं. पण ती केवळ खेळांत, धांवण्यांत, उड्या मारण्यांतच मर्यादित होण्याचें कारण नाहीं. या गोष्टींस उत्तेजन दिलें जाईलच. पण त्याचबरोबर झपाट्यानें माती कशी भरतां येईल, ती पाटी उचलावी कशी, न्यावी कशी, मुरमाड जागेवर लहानशीं कुदळ चालवावी कशी, कोणता गट जलद माती वाहून नेतो, खड्डा भरून काढतो अगर अधिक खणून दाखवितो याच्याहि स्पर्धा लावतां येतील. शेतकींत मुलें कामास लागलीं असतांना शेंगा अगर जोंधळा टोचण्याचें काम पद्धतशीर व सुबक रीतीनें कोणता मुलांचा गट करून दाखवितो, भाताच्या पेरणींत झपाझप लावणी करणें व भात कापणीच्या वेळीं स्वतःचा हात न कापून घेतां सपासप भात कोणता गट कापूं शकतो हे स्पर्धेचे विषय होऊं शकणार नाहींत असें थोडेंच आहे ? पण ‘ योजकस्तत्रदुर्लभः ’...

खेड्यांतील शाळाचालकांनीं वेळोवेळीं भेटण्याचा आणि चर्चा करण्याचा योग आला तेव्हां त्यांना असें सुचविण्याचा प्रयत्न केला व पालकांना असें विनविण्याचा प्रयत्न केला कीं ज्यावेळीं विशेष तांतडीनें शेतकऱ्यांना शेतीचीं कामें ठरवावयाचीं असतात त्यावेळीं शेतकऱ्यांना आपल्या मुलांची मदत व सहकार्य मिळावें म्हणून शाळाचालकांनीं शाळा बंद न ठेवतां त्या त्या आठवड्या पंधरवड्यांत शेतीवरील काम हाच शाळेचा अभ्यासक्रम आहे असें मानावें. अशी सूचना केली असतां, ही गोष्ट शिक्षकांना युक्त व आवश्यक वाटेल असा पालकांना विश्वास वाटला नाहीं. यदाकदाचित एखाद्या शाळाचालकास ही गोष्ट पटली तरी तो भितो शिक्षणखात्याच्या बडग्याला. आमचें म्हणणें पालकांनीं विद्यार्थ्यांच्या सहकार्यासाठीं अर्ज करावा. शाळाचालकांस पटल्यास त्यावर त्यांनीं मान्यतेची सही द्यावी; म्हणजे या संयुक्त मागणीचें लोण प्रथम शिक्षण खात्याकडे व नंतर विधानसभेपर्यंत नेऊन भिडवितां येईल. पण खालून

अद्याप अशी मागणीच येत नाहीं. ग्रामीण विद्यापीठ म्हणून निघालेल्या विद्यापीठांमार्फत व विद्यापीठांच्या ग्रामीण परिसरांत ज्या शाळा निघाल्या तेथें जाण्याचा योग आला. सर्व शाळा भातशेतीच्या भागांतल्या. पालक नव्वद टक्के भातशेतींत काम करणारे, दिवसभर राबणारे. पण अशा परिसरांतील शाळेचा व त्या शाळेंतील मुलांचा म्हणजे पोटच्या गोळ्यांचा भातशेतीच्या कामाशीं सुतराम् संबंध नाहीं ! असें असूनहि शिक्षण जीवन-स्पर्शी झालें पाहिजे, ही घोषणा ग्रामीण विद्यापीठांपासून तो दिल्ली–मुंबईच्या विद्यापीठांच्या व्यासपीठांवरून चालूच आहे ! विद्यापीठांतील उक्ति आणि कृति यांचा मेळ केव्हां बसणार ? शाळांतील शिक्षणक्रमांत शिक्षणाचें एक अंग व शारीरिक शिक्षणाचा एक महत्त्वाचा भाग समजून हा कार्यभाग झाला पाहिजे.

शरीरपोषण, शरीरसंवर्धन, आरोग्यरक्षण व यथाकाल स्नायुसंवर्धन या सर्व गोष्टींना पूरक अशा तऱ्हेची व्यायाम व खेळांची पद्धति अनुसरली गेली पाहिजे. पौर्वात्य व पाश्चात्य हा अभिमान वा दुरभिमान नको. जें जें चांगलें तें तें ग्रहण करावें. पण प्रथम आपल्यांतलें चांगलें काय आहे तें पहावें. आपल्या पूर्वपरंपरेंतील आसनांच्या पद्धतीपासून तों अगदीं अलीकडील तालबद्ध स्वीडिश कवायतीपर्यंत ( रिदमिक स्वीडिश ड्रील ) सर्वांचा विचारपूर्वक अवलंब केला जावा. कोणतीहि एकांगी दृष्टी नको. एका नमस्कारांत सर्व कांहीं आलें हा अभिनिवेश नको किंवा स्वीडिश ड्रिल म्हणजे स्वीडिश ड्रिल; त्यांत सर्व आलें, असाहि गैरसमज नको. व्यायामसुद्धा उत्पादकच असला पाहिजे, खेळात निरर्थक वेळ कशाला, असा दुराग्रहहि नकोच नको. सर्व दृष्टींनीं विचार केला तरी असें दिसून येईल कीं, वयाच्या तेरा चौदाव्या वर्षापासून जोर बैठकांची पद्धति व त्यास मलखांबाची जोड ही अनेक देशांतील तत्सम व्यायामपद्धतींपेक्षां अधिक उपयुक्त आहे. म्हणून हा व्यायाम, अनुकूल ऋतूमध्यें, म्हणजे हिंवाळ्यांत घ्यावा. त्यास सर्वांगसुंदर व्यायामाची जोड देण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. अकरा-बाराव्या वर्षांत नमस्कार घालावे. त्यांतील जेवढा भाग जमेल तेवढाच भाग ग्रहण करून संपूर्ण पद्धतीचा जास्त आग्रह न धरतां नमस्कार घालावे. पावसाळ्यांत बाहेर खेळतां येत नाहीं ही गोष्ट लक्षांत घेऊन

११४४५

पावसाळ्यांत त्यावर भर द्यावा. हिवाळ्यांत दिवस लहान; शाळा सुटल्यानंतर मुलींनीं, विशेषतः बारा वर्षांपर्यंतच्या मुलींनीं, दिवस बुडण्यांच्या आंत घरीं यावें अशीं पालकांची अपेक्षा असते. ती ध्यानीं घेऊन धावण्यांचा व्यायाम व अल्प वेळांत बरा व्यायाम देणारे धावण्याचे खेळ यांचा अंतर्भाव हिवाळ्यांत करावा. उन्हाळ्याच्या दिवसांत शाळा सुटल्यानंतर सुमारें तासभर विद्यार्थ्यांना वेळ मिळूं शकतो. नवीन खेळांचें पायाभूत शिक्षण—लंगडी, हूतूतू, खो खो, आट्यापाट्या इत्यादींचे—इयत्तावार शिक्षणक्रम आंखून तें यावेळीं देतां येईल. साधनयुक्त बचाव व चढाव म्हणजे लाठी, काठी, बोथाटी, बनेटी, भाला, दांडपट्टा यांचाहि शारीरिक शिक्षणांत समावेश असला पाहिजे. यांपैकीं लाठी व फरीगदगा यांचें बरेंचसें शिक्षण चौदा ते सोळा या वर्षांत देतां येण्यासारखें आहे. तेंहि या उन्हाळ्याच्या दिवसांत देतां येईल. दांडपट्ट्याचा अंतर्भाव कॉलेज–शिक्षणक्रमांत करणें अधिक युक्त ठरेल.

भारतीय व्यायामपद्धतींतील व्यायाम प्रकारांचा कुस्ती हा राजा होय ! हिरे-माणकांचें दुकान काढणारास जसें फार मोठ्या प्रमाणांत आर्थिक भांडवल लागतें त्याप्रमाणेंच कुस्तीचें शिक्षण घेण्याची क्षमता अंगीं येण्यापूर्वीं शरीराची सर्वांगीण कमाई कांहीं प्रमाणांत तरी व्हावी लागते. मलखांबाचा उल्लेख केलाच आहे. मलखांबाच्या बहुतेक उड्या तेरा ते सोळा या तीन-चार वर्षांत शिकवितां येतील. त्यांचाहि शिक्षणक्रम इयत्तावर वर्षावर्षांचा आंखून देतां येईल. मलखांब हा कुस्तीच्या पायाभूत शिक्षणाचें अंग होय. कुस्तींत जे डावपेंच शिकवायचे असतात तेच मलखांबावर शिकवावयाचे. शेतीव्यवसायांत अंतर्भूत होणारे टिकाव फावड्याचें काम करून दंड, मनगट व पट भरण्यास साह्य होतें. कुस्तीचा प्रारंभिक व्यायाम म्हणून त्यांचा उपयोग होईल.

चौदा वर्षांपर्यंत मुलें व मुली यांच्या व्यायामपद्धतींत, व्यायाम प्रकारांत आणि शिक्षणक्रमांत विशेष फरक करण्याचें कारण नाहीं. पण त्यानंतर मात्र विशेष विचारपूर्वक त्यांच्या भिन्न स्वरूपाच्या शरीरवाढीच्या दृष्टीनें विचार करावा लागेल. शेतीविषयक कामांत सतरा वर्षेंपर्यंत त्यांना थोडे कमी श्रम पडतील एवढें धोरण राखलें म्हणजे पुरे.

व्यायामप्रकारांतील सहली हा एक स्वतंत्र विषय मानतां येण्यासारखा आहे. प्राथमिक शिक्षणांतील आठ-नऊ-दहा या वयांत मुलांना सहलींची खूपच गंमत वाटत असते. प्रथम मैल, दोन मैलांच्या सहलीपासून सुरुवात करून दहाव्या वर्षापर्यंत हें अंतर वाढवीत दहा मैलांपर्यंत न्यायला हरकत नाहीं. मुक्कामाच्या जागीं जातांना झालेल्या परिश्रमाचा विसर पडेल अशा गमतीनें त्यांची योजना केली पाहिजे. दहा वर्षांपर्यंतच्या मुलां-मुलींना सकाळच्या किंवा दुपारच्या चार-पांच तासांत मिळून दहा मैल चालतां येईल असा आत्मविश्वास सर्वांस प्राप्त व्हावा. लहान-लहान टेकड्यांवर, हिरवळींतून व जलाशयांतून त्यांनीं हरणासारखें बागडावें, निसर्गाशीं एकरूप व्हावें. थोड्या पावसाची दिक्कत बाळगूं नये, थोडें ऊन पडलें म्हणून कोमेजूं नये व जी लहान शिदोरी बरोबर घेतली असेल त्यावर संतोष मानावा. मुलांची निरीक्षणशक्ति झाडें, पानें, फुलें यांचीं नांवें व त्यांची ओळख, पक्षांचीं घरटीं व वेगवेगळ्या ऋतुमानांतील किडा-मुंगी, जीव-जंतू, बेडूक, साप आणि विशेषतः पक्षी यांच्याशीं त्यांचा आपलेपणाचा संबंध जोडावा. आपल्या प्रवासाचें आणि प्रवासांतील गंमतींचें सुमारें दहा मिनिटांचें प्रवासवर्णन त्यांना सांगतां येईल अशा तऱ्हेची त्यांना बोलण्याची संवयहि यांतून लावतां येईल.

दहा वर्षांनंतरच्या सहा-सात वर्षांत सहलींतून बऱ्याच अधिक गुणांची वाढ व जोपासना करतां येईल. आपण राहतों त्या पंचक्रोशींतील गांवें, दशक्रोशींतील गांवें, नद्या, ओढे, शेतीचा व्यवसाय, बांध, लिफ्ट इरिगेशन, जलाशयांचा उपयोग, ह्याकडे त्यांचें लक्ष वेधतां येईल. वारे कसे वाहतात, ढग कसें येतात, पावसाचा उपयोग शेतीला कसा केला गेला आहे व केला नसल्यास तो कसा करून घेतां येईल, ही विचक्षणा त्यांच्या ठिकाणीं निर्माण करतां येईल. थोडक्यांत आधुनिक पद्धतीच्या भूगोलाचें ज्ञान त्यांना करून देतां येईल. केव्हां केव्हां जिल्ह्यांतील वा नजीकच्या जिल्ह्यांतील प्रेक्षणीय स्थळें पाहाण्यासाठीं त्यांना नेतां येईल, पण त्यांत रेल्वे वा मोटर यांत बसण्यावर भर असूं नये. चौदा वर्षांच्या मुलांमुलींस सकाळीं निघून कुठें तरी रम्य ठिकाणीं मुक्काम करून शिदोरीवर भरपूर ताव मारून सूरपारंबीसारखे कांहीं गंमतीचे खेळ खेळतां येतील. विश्रांतीच्या वेळीं पांच-दहा मिनिटें

बोलण्याची संवय लावणें व करमणुकीच्या कार्यक्रमांस भरपूर वाव देऊन संकोचवृत्ति संकोच पावावी असें करतां येईल. सायंकाळीं घरीं येई पावेतों जातां येतांची मिळून वीस मैलांची चाल झालेली असेल. पण घरीं येतां येतां कोण पुढें जातो हें पाहण्याइतकीं त्यांच्या पायांत रग राहिलेली असेल. चौदा वर्षाअखेर वीस मैल चालून येणें म्हणजे कांहीं विशेष नाहीं, असा त्यांना आत्मविश्वास आला असेल. या वयांत त्यांचा चित्रकलेंत थोडासा प्रवेश झाला असेल. कागद व ब्रश आणि रंग थोडासा नासून आपली मनांत साठविलेलीं दृश्यें कागदावर ( उतरविण्याचा ) ते प्रयत्न करतील व शिक्षक त्यांना अवश्य तें मार्गदर्शन करतील विश्रांतीच्या वेळीं एखाद्यास काव्यहि स्फुरेल. तो तें टिपून ठेवील व शिक्षकांना दाखवील. बऱ्याच जणांना आपल्या सहलींवर वीस पंचवीस ओळींचा निबंध लिहितां येईल. वरील तीनहि प्रकार काव्य, चित्र व लेख हे त्यांच्या शालेय हस्तलिखितांचें खाद्य होय. याच वयांत बॉय स्काऊट पद्धतीचे सहलींतील प्रात्यक्षिकाचे धडे त्यांना देतां येतील. तीन दगड मांडून थोडासा स्वयंपाकाचा उद्योग, लहानसें खोपट उभारणें, शुश्रुषेंतील प्रथमोपचार वगैरे गोष्टींची माहिती देतां येईल.

याच वयांत पोहण्याचें शिक्षण योग्य ती खबरदारी घेऊन व जरूरीनुरूप भोपळे आदि साहित्य वापरून देण्याची व्यवस्था व्हावी. पुण्यासारख्या ठिकाणीं बॉय स्काऊट ज्या पद्धतीनें बारा ते चौदा या वयाच्या सर्व मुलांमुलींना आम्हीं पोहावयास शिकविलें आहे असें अभिमानानें सांगतात तसें सांगण्याचें सद्‌भाग्य लाभावें. कांहीं सहली हेतुपुरस्सर ज्या ठिकाणीं पोहण्याची सोय असेल अशा ठिकाणीं न्याव्यात.

चौदा ते सोळा या वयांत आपल्या प्रांतांतील किमानपक्षीं पांच-सात जिल्ह्यांतील जीं ऐतिहासिक स्थळें असतील त्या ठिकाणीं जाणें हें लक्ष्य असावें. जे शिक्षक घेऊन जाणार असतील त्यांनीं त्या त्या ठिकाणची गॅझेटियर्स, तीर्थ-यात्रा, प्रवासवर्णनें व अनेक लेखांतून जी माहिती आली ती स्वत: नीट समजून घ्यावी; आणि नंतर प्रत्यक्ष त्या ठिकाणीं जाऊन त्यांचीं निश्चित स्थळें दाखवावींत. ऐतिहासिक घटनांचें अचूक वर्णन देतां यावें. संबंधित थोर व्यक्तींचा निर्देश करतां यावा, वेगवेगळ्या जिल्ह्यांतील

बोलभाषेंतील बदल, भिन्न चालीरीती, भिन्न पेहेराव यांकडे विद्यार्थ्यांचें लक्ष वेधावें. सहलीस येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या प्रत्येक शिक्षकाकडे पंधरा-वीसपेक्षां अधिक नसावी. आपल्या पूर्वजांच्या थोर कामागिरीबद्दल योग्य अभिमान जागृत व्हावा. लोकरीतींत दिसणाऱ्या कांहीं दोषांचा केवळ निर्देश करावा व तेथील परिस्थिति बहुधा त्या दोषांस कारणीभूत झाली असेल हें हळूवारपणें समजावून द्यावें. दोषांबद्दल घृणा नको. अंगीं सामर्थ्य असेल तर सहानुभूति उत्पन्न व्हावी, हा उद्देश. सोळा ते सतरा या वयांत एका दमांत, पंचवीस मैल चालण्याची हिंमत आलीच पाहिजे. शिक्षण हें सापेक्ष आहे, साचेबंद नाहीं, हें वर केलेल्या सहलींसंबंधींच्या चर्चेवरून सूज्ञांच्या सहज ध्यानीं येईल, या सहलींतून शेती, उद्योगधंदे, भूगोलविषयक माहिती, तीर्थ-क्षेत्रें, लोकांच्या चालीरीति, पूर्वेतिहास, बोलण्याची-लिहिण्याची शक्ति, निरीक्षण शक्ति इ० विविध गुणसंपदा प्राप्त करून घ्यायची आहे.

आतांपर्यंत केलेला उहापोह हा सर्वस्वीं देशी व्यायाम पद्धतींतील भिन्न भिन्न प्रकारांचा योजनाबद्ध आराखडा कसा करतां येईल यासंबंधीं झाला. पाश्चात्यांच्या खेळांचा विचार आपण केला नाहीं. क्रिकेट हा ब्रिटिश राष्ट्र-कुलांतील सर्वश्रेष्ठ खेळ. एक दोन शतकें पाश्चात्यांनीं येथें राज्य केल्यामुळें इंग्रजांनीं आपल्या अत्यंत आवडत्या खेळास भरपूर वाव दिला. त्या खेळाची मोठी छाप आपल्या सुशिक्षितांवर पडली आहे. त्या खेळांत विशेष मोहिनी आहे. खेळाडू खेळत असतांना हजारों प्रेक्षकांचे डोळे आपल्यावर खिळून राहिले आहेत याचा खेळाडूला स्वाभाविकच अभिमान वाटतो. बॅटिंग व बोलिंगचें कौशल्य इतकें विराट स्वरूपाचें आहे कीं सबंध जन्म त्यांत कौशल्य संपादनासाठीं घातला तरीसुद्धां 'आतां मला कांहीं बॅटिंगमध्यें शिकण्यासारखें राहिलें नाहीं' असें रणजितसिंग किंवा डॉन ब्रॅडमनहि म्हणूं शकणार नाहीं. तीच तऱ्हा बोलिंगविषयीं आहे. तेव्हां कौशल्यांतील अपार वाव हा त्यांतील एक अतुल गुण आहे. वेळ फार मोडतो, स्वतः खेळाडूचा व हजारों प्रेक्षकांचा. साम्राज्य विस्तार केलेल्या लोकांना आपला वेळ चांगल्या रीतीनें कसा घालवावा—ऐदी ऐषआरामांत आणि व्यसनांत नव्हे—हें या खेळानें फार चांगलें दाखवून दिलें आहे. आपण त्या साम्राज्यांतून मुक्त झालों आहों. मिळालेल्या स्वातंत्र्याचा विधायक कर्तृत्वशक्तीसाठीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम 32031 दि. 1 डिसेंबर 55
क्रमांक 2305 नों: दि: 21458


उपयोग करावा ही चिंता आमच्या तरुणांच्या मनांत उद्‌भुत व्हावयास हवी. पण क्रिकेटवर बहिष्कार घाला, असें म्हणून कांहींच साधणार नाहीं. उपरिर्निदिष्ट भिन्न भिन्न प्राकरांविषयीं आमच्या मुलांमध्यें ज्या प्रमाणांत प्रेम व आस्था उत्पन्न होईल त्या प्रमाणांतच क्रिकेटला पर्याय आपण देऊं शकूं. नुसत्या देशी खेळांचा पर्याय होऊं शकणार नाहीं. हुतुतूचा खेळ हजार पांचशेंपेक्षां अधिक लोकांना नीट समजून पहातां येणें शक्य नाहीं. तें क्रीडांगण केवढेंसें ! अधिक लोकांची नजर तेथें कशी स्थिरावणार ? बव्हंशी तीच अडचण खोखोची. आठ मिनिटांत डाव तर खलास होणार व एल. बी. डब्ल्यू. ज्याप्रमाणें अम्पायरनें सांगितल्याखेरीज प्रेक्षकांना समजत नाहीं त्याचप्रमाणें खोखोचा गडी नियम सांभाळून मारला कीं नाहीं हेंहि पंचांनीं सांगितल्यावांचून प्रेक्षकांना कळत नाहीं. खोखोसारखा जलद गतीचा खेळ–नऊ लोकांनीं एका गड्याचा पाठलाग करून त्यास बाद करावयाचें–यामुळें खेळणारास जीव मुठींत घेऊन, विलक्षण चापल्यानें व कौशल्यानें जसें खेळावें लागतें त्याला जगांतील खेळांत तोड नसावी. पाट्यांचा खेळ तर तज्ज्ञ पंच मिळत नाहींत म्हणून महाराष्ट्रांतून बाद झाला ! आपल्या खेळांचें व क्रिकेटसारख्या साम्राज्यशाही खेळाचें हें थोडक्यांत विवेचन झालें. झेप टाकून कॅच केल्याचे फोटो आम्हाला मोठ्या ऐटीनें दाखविण्यांत येतात. खोखोची झेप किंवा आट्यापाट्यांतील पट्टून जाणें हें अवगत असणारांस ‘ कॅच ’च्या झेलचें फारसें कौतुक करण्याचें कारण नाहीं. आपल्या देशांतील क्रिकेटर्स खोखो, आट्यापाट्याचे खेळ खेळले असतील तर त्यांच्या ‘ कॅच ’चे फोटो जास्त सरस येऊं शकतील.

फुटबॉल, हॉकी हे खेळ अधिक जोरकस व वीरश्रीचे होत. वेळहि फार जात नाहीं व पैसाहि जास्त खर्च करावयास नको. भरपूर क्रीडांगणांची योजना होईल तसतसा या खेळांना अधिकाधिक वाव देतां येईल. व्हॉलीबॉल, बास्केटबॉल व मुलींच्यासाठीं थ्रोबॉल हे तर आपण शाळांमधून मान्य केलेच आहेत व त्यांना अधिकाधिक वाव मिळणें रास्त होईल. टेबल टेनिसचें मात्र अवास्तव महत्त्व वाढत चाललें आहे. गरीब शाळांतून त्याला वाव नसतो याबद्दल वाईट वाटण्याचें कारण नाहीं. शहरांतून मुलींनीं त्यांत भाग घेतला तर तो समजण्यासारखा आहे. पण युवकांच्या अंगांतील रग शमण्यासारखें

त्यांत कांहींच नाहीं, म्हणून युवकांनीं त्याची उपेक्षा केली तर कांहीं वाईट नाहीं. करमणुकीखातर युवकांनीं पत्ते खेळण्यापेक्षां टेबलटेनिस खेळणें अधिक बरें. बॅडमिंग्टनच्या खेळास बरेच चापल्य व धमक लागते. चांगली दमछाक होऊं शकते. बॅटी फार महाग नसत्या व फुलांची किंमत यापेक्षां कमी असती तर यापेक्षांहि अधिक प्रमाणांत त्याचा प्रसार होऊं शकला असता.

माध्यमिक शिक्षणांत शारीरिक शिक्षणाच्या दृष्टीनें ज्या विविध पद्धतींचा व प्रकारांचा विचार केला ते सारे खेळ व व्यायामपद्धति यांचा सार्वत्रिक व आवश्यक म्हणून अवलंब व्हावा. नव्यानेंच विषयाची माहिती अशी पुढील चार-पांच वर्षांत करून देण्याची पाळी येऊं नये. आंखून दिलेला शिक्षणक्रम योजनाबद्ध रीत्या पार पाडण्याची जबाबदारी शिक्षकांवर, शाळा-चालकांवर राहील. विद्यार्थी अकल्पित कारणानें किंवा सांसर्गिक रोगानें आजारी पडला तर त्याचा अवश्य विचार व्हावा. आजारी विद्यार्थ्यांच्या गणित वा इतिहास या विषयांतील अपयशाचा ज्या तऱ्हेनें विचार केला जातो तसाच शारीरिक क्षमतेमधील अपुरेपणाचा विचार करावा काय, हा प्रश्न आहे. पंगु, व्यंगयुक्त अशा मुलांसाठीं होतील तितके सर्व प्रयत्न करूनहि त्यांची शारीरिक प्रगति होत नाहीं म्हणून त्यांच्या इतर शिक्षणांत आडकाठी येऊं नये, अशा तऱ्हेचें समजुतदार, पण निग्रही धोरण असावें. सर्व मुलां-मुलींची शारीरिक तपासणी कसोशीनें वर्षांतून दोनदां करून घ्यावी. नाक, कान, घसा, प्लीव्हा, पचन क्रिया यथायोग्य रीत्या चालली आहे याची खात्री करून घ्यावी. किमान ४ मैल धांवतां येणें माध्यमिक शिक्षणक्रमांत साध्य व्हावें. क्रमवार किमान लांब उडी उंच उडी किती आली पाहिजे हेंहि ठरवून देतां येईल.

सतरा ते एकवीस या वयांतील महाविद्यालयीन शिक्षणक्रमांत विशेषेंकरून नवीन विषय न हाताळतां विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडीनुसार विशेष वाव दिला जावा. एखाद्या विषयाची पारंगतता प्राप्त करून घेण्यास संधी आपल्या आवडीनुरूप या ठिकाणीं मिळावी.

ॲथलेटिक्सचा उहापोह या ठिकाणींच प्रस्तुत ठरावा. ॲथलेटिक्सचे व जिम्नॅस्टिक्स म्हणजे सिंगलबार, डबलबार, रोमनरिंग वगैरेंचें शास्त्रशुद्ध शिक्षण ही पाश्चात्यांची देणगी आहे. या बाबतींत तज्ज्ञ शिक्षक ही सर्वप्रमुख

…गत्याहि विषयाची पारंगतता ही सहाजिकच तज्ज्ञांच्या मार्गदर्शनां… …ां सर्वथैव अशक्य आहे. आवश्यक ते 'कोच' मिळण्याची …आण्चाईत आहे. शाळांतून शारीरिक शिक्षण देण्यास पारंगत …क मिळण्याची पंचाईत, तर उच्च शिक्षणाच्या काळांतील विविध …ारंगतता प्राप्त करून देणारे उत्तम कोच मिळण्याची पंचाईत! कोच तयार करणारी शिक्षणसंस्था नुकती कुठें केन्द्र सरकारनें सुरू केली आहे. कांहीं प्रमाणांत मद्रासच्या वाय्. एम्. सी. ए.नें हें काम केलें आहे. पाश्चात्य कोचेस् दहा-दहा वर्षांच्या शिक्षणक्रमानें तयार होत असतात. कॉलेजमधील प्रथम लेक्चरर व नंतर प्रोफेसर ही ग्रेड जशी दिली जाते तशीच ग्रेड या कोचला मिळाली पाहिजे. इतका हा कोच आपल्या विषयांत श्रेष्ठ दर्जाचा असला पाहिजे व ही नेमणूक कायम स्वरूपाची असावयास पाहिजे. असे कोच तयार होतील तेव्हां होवोत, तूर्त जे बऱ्यापैकीं कोच मिळतील त्यांना चांगला दर्जा देऊन त्यांच्याकरवीं ॲथलेटिक्सचें शास्त्रीय शिक्षण मिळालें तर दहाव्या वर्षापासून योजनाबद्ध शिक्षण मिळून पुढें चार-सहा वर्षें तज्ज्ञ कोचच्या मार्गदर्शनाखालीं स्पेशलायझेशन होऊं शकेल. ऑलिंपिकमध्यें आज भारतास हॉकीखेरीज इतर खेळांत एकहि गुण मिळत नाहीं. असें भविष्यकाळांत होऊं नये यासाठीं योजनाबद्ध तयारी केली पाहिजे.

ऑलिंपिकसाठीं तयारी करणें हें आमच्या युवकांच्या शिक्षणाचें ध्येय नाहीं, परंतु ज्यांच्या मनांत अशी हौस व महत्त्वाकांक्षा असेल त्यांना भरपूर वाव देऊन भारताची इभ्रत त्या ठिकाणीं वाढेल असें यशहि संपादन करतां आलें पाहिजे. भारतीय पद्धतींत अग्रेसर भाग कुस्तीचा होय. पारतंत्र्यांत भारतास ऑलिंपिक सामन्यांत सामन्याच्या नियामक मंडळांत वगैरे स्थानच नव्हतें. एवढा मोठा देश म्हणून कोणीतरी सरकारच्या कृपेनें तेथें प्रतिनिधित्व करीत असे. जागतिक पटावर भारतास नुकतें कुठें मानाचें स्थान मिळूं लागलें आहे. भारतीय युवकांनीं आपल्या कर्तृत्वानें व यशानें ऑलिंपिकमध्यें मानाची जागा मिळविली म्हणजे मग भारतानें उठविलेला आवाज ऑलिंपिकमध्यें आदरपूर्वक विचारांत घेतला जाईल. भारतीय कुस्तीचें कौशल्य जगांत कोठेंहि नाहीं. परंतु कुस्तीचें नियम वगैरे ऑलिंपिकमध्यें ठरवतांना आमच्या विचारसरणीस वाव नाहीं.

तथापि त्यांचे असतील ते नियम स्वीकारूनसुद्धां आमच्या म हीं वाईट खेळणें पद्धतींत वाकबगार होणें कठीण जाईलसें वाटत नाहीं. त. चांगली

कुस्तीसंबंधीं हा व्यापक विचार झाला. शिक्षणक्रमाच्या दृष्ट। पेक्षां झाला. मागें सूचित केल्याप्रमाणें जोर व इतर पद्धतींनीं आणि वि मलखांबाच्या दोन–तीन वर्षांच्या शास्त्रोक्त शिक्षणानें तयार झालेल्या युवकांस पुढील पांच-सहा वर्षांची विशेष व्यासंगपूर्ण तपश्चर्या केल्यास पंचविशीच्या सुमारास म्हणजे कुस्तींत एक तप म्हणजे १२ वर्षें घालविल्या-नंतर कुस्तीवीर होतां येईल. पेशानें पेहेलवान व शिक्षणक्रमांतून तयार होणारा कुस्तीवीर यांच्या शिक्षणपद्धतींत मूलभूत फरक असे. पेशा पेहेलवानाचा सारा दिवस मेहनत–कुस्ती–खुराक–निद्रा या चक्राकार चतुःसूत्रींत गुरफटलेला असतो. शिक्षणसंपन्न युवक अशा मार्गांचा अवलंब करूं शकत नाहीं. त्यानें करणें आवश्यकहि नाहीं. आमच्या शारीरिक शिक्षणाचा–कुस्ती व ॲथलेटिक्स सकट–हा निकष राहील कीं, त्याचें शरीर कणखर, जोरकस, चपल व तल्लख असावें. व्यायामानें त्याची बौद्धिक व्यासंग करण्याची शक्तीहि वाढावी. मांद्य, मालिन्य व एकांगीपणा उत्पन्न करणारा व्यायाम विद्यार्थ्यांस शिकवतांच उपयोगी नाहीं. योग्य प्रमाणांत व्यायाम घेतल्यानें अधिक झोंप लागते व डोळ्यांवर सुस्ती येते ही कल्पना खरी नाहीं. व्यायामाचा अगर परिश्रमाचा अतिरेक झाला असेल तेव्हांच ही सुस्ती व मांद्य येईल. प्रासंगिक रीत्या व्यायाम, खेळ अगर शेतांतील परिश्रमाचा अतिरेक झाला तरी त्यालाहि तरुणानें डरूं नये, परंतु अतिरेक हा स्वभावजन्य होतां कामा नये. तो विद्या–अर्थी आहे, तो विद्या संपन्न होणारा आहे. त्यासाठीं त्यास दीर्घ बौद्धिक परिश्रम करावे लागणार आहेत, हें गृहीत धरलेलेंच आहे. पण तें त्याचें कार्य करतांना शारीरिक उणेपणामुळें व्यत्यय येतां कामा नये. हा शारीरिक शिक्षणाविषयींचा उचित दृष्टिकोन आहे.

कोचेसबाबत, खरें म्हणायचें तर कोचेसच्या अभावीं, महाविद्यालयीन व आंतरमहाविद्यालयीन सामन्यामध्यें जो एक गैरप्रकार आढळतो त्याचा निर्देश या ठिकाणीं करणें आवश्यक आहे. विद्यालयीन व विश्वविद्यालयीन सामने राज्याराज्यांतून व भारतीय पातळीवर होत असतात. कोच नेमण्याची

व्यवस्था नसतांना महाविद्यालयांतर्फें भिन्न भिन्न स्पर्धांसाठीं पाठविले जातात. एखादा चमकदार विद्यार्थी बाहेर सार्वजनिक आवश्यक तें ज्ञान व प्रावीण्य संपादन करून आलेला असतो व तो पहिल्या नंबरचें बक्षिस पटकावतो. 'आपला विद्यार्थी' म्हणून महाविद्यालय त्याच्या यशाचें श्रेय संपादन करतें. वास्तविक महाविद्यालयास असें श्रेय घेण्याचा काडीचाहि अधिकार नाहीं. ही फुकव्या यशाची प्रथा महाविद्यालयांनीं बंद करणेंच त्यांना अधिक शोभेल. ही अनिष्ट प्रथा बंद व्हावी म्हणून वास्तविक युनिव्हर्सिटीनें असा दंडक घालणें जरूर आहे कीं, महाविद्यालयानें ज्या विषयांचें शिक्षण देण्यास योग्य कोच नेमला असेल त्याच विषयांसाठीं होणाऱ्या स्पर्धेत त्या महाविद्यालयातर्फें खेळाडू पाठवितां येतील. असा दंडक घातल्यानें महाविद्यालयांना अधिकाधिक कोच नेमण्याची आवश्यकता भासेल व विद्यार्थ्यांच्या कौशल्यांत व पारंगततेंत महत्त्वाची भर पडल्यानें एकूण स्पर्धांचा दर्जा निश्चितच वाढेल.

असा सार्वत्रिक, क्रमवार, बारा वर्षांच्या योजनाबद्ध शिक्षणक्रमाचा आराखडा सरकारनें स्वीकारून तो कधीं काळीं, पुढील पंधरा-वीस वर्षांत कार्यान्वित केला तर भारतीय तरुणांचें भाग्य निश्चितच उजळेल. पण तें अल्पांशापलीकडे कृतींत आलेलें नाहीं तोंपर्यंत व्यायाम-शिक्षण प्रसाराच्या तळमळीनें व ध्येयनिष्ठेनें ज्यांनीं कार्य अंगिकारलें असेल त्या शारीरिक शिक्षण संस्थांना हरेक प्रकारें त्यांच्या अडचणी दूर करण्यास मदत करून त्यांचें म्हणजे आपलेंच कार्य सुकर व्हावें म्हणून सरकारनें आर्थिक मदत करावी. योग्य क्रीडांगणें मिळवून देण्यास साह्य करावें. त्यांनीं लायक शिक्षक नेमले आहेतसें पाहून त्यांना मान्यता द्यावी. त्यांचा गौरव करावा. त्याचबरोबर व्यायामसंस्थांच्या चालकांनींहि शाळाकॉलेजच्या कार्यक्रमाव्यतिरिक्तच्या वेळांत सकाळसंध्याकाळ विद्यार्थ्यांच्या सोयीनुरूप त्यांना शास्त्रोक्त शिक्षण देण्याची सोय करावी. या संस्थाचालकांच्या दीर्घ परिश्रमानें व सातत्यानें प्राप्त झालेल्या अनुभवाच्या जोरावर पारंगत मंडळींचा जो संच जमला असेल त्यांच्यासाठीं ज्या विशिष्ट प्रकारच्या तात्त्विक, व्यावहारिक अगर मानसशास्त्रीय शिक्षणाची त्यांच्यात उणीव राहिली असेल ती दूर करण्यासाठीं सरकारनें स्वखर्चानें व्यवस्था करावी.

सर्वांगीण तज्ज्ञ व गुणसंपन्न शारीरिक शिक्षण तज्ज्ञ तयार केलीं वाईट अशा प्रकारें सरकारला मिळवतां येईल. अशा संस्थांमार्फत अधि खेळणें पारंगत मंडळी तयार होण्याचा गाडा हा सतत चालू ठेवतां चांगली भरीव काम करणाऱ्या सार्वजनिक संस्थांना सरकारविषयीं व सरकारले त्या सार्वजनिक संस्थांविषयीं आत्मीयता वाटली पाहिजे. हा परस्पर प्रेमाचा व लाभाचा संबंध लोकशाहीस भूषणभूत होईल.

* * *

# सेवापथकांसंबंधीं थोडेसें चिंतन

व्याख्यान व लेखन या द्वारां जागृति करून परकीय सत्तेविषयीं अप्रीति उत्पन्न करणारे प्रचारक निर्माण करण्याचें कार्य स्वराज्यासाठीं झगडा करण्याच्या पहिल्या कालखंडांत आम्हांला करावें लागलें. इंग्रजी साम्राज्यावर पहिल्या महायुद्धाचें महान् संकट आलें व गेलें; पण देशांतील वरील जागृतीमुळें स्वराज्यप्राप्ति कांहीं झाली नाहीं. गांधीजींनीं जो असहकारी सत्याग्रही लढा देण्याचें ठरविलें, त्यासाठीं त्यांनीं प्रामुख्येंकरून आश्रमाची कल्पना पुढें मांडली. चरखा हा स्वराज्यप्राप्तीच्या चळवळींतील मध्यबिंदू कल्पून, चरख्याच्या संपूर्ण शिक्षणापासून तों भंगीकामापर्यंत सर्व तऱ्हेचीं कामें स्वावलंबनानें करावयास शिकवून नवजीवन निर्माण करणारे आश्रम जागोजागीं त्यांनीं स्थापिलें. तेथील ध्येयवादी शिक्षण व विधायक कार्य हें आजहि आदर्शवत्, अत्यंत महत्त्वाचें मार्गदर्शक असें ठरलें आहे. पण ही देशव्यापी चळवळ होऊं शकली नाहीं.

स्वराज्यप्राप्तीनंतर विधायक कार्यकर्त्यांपुढें खेड्यांचा पुनरुद्धार हें महान् कार्य ठाकलें आहे. स्वराज्यानें सर्व प्रश्न सुटतील अशी जी पुढाऱ्यांनीं कल्पना दिली होती तिचा अर्थ लोकांनीं अशा सोयीस्कर रीतीनें लावून घेतला आहे कीं आतां आपलें सरकार आलें आहे, तें सर्व कांहीं करील व त्यानें सर्व कांहीं केलें पाहिजे ! लोकांतील ही निष्क्रियता हें महान् संकट आहे. आपलेंच सरकार आहे याचा खरा अर्थ एवढाच कीं, आपणांस जें कार्य करावयाचें असेल तें करण्यास संधि लाभली आहे. म्हणून आपलीं

कामें आपणच केलीं पाहिजेत, हा आजच्या चळवळीचा महामंत्र वाईट महात्माजींचा चरखा व जयप्रकाशजींची कुदळ हें त्यांचें मूर्त स्वरूप खेळणें

हा महामंत्र आपल्याला खेडोपाडीं पोंचवावयाचा आहे. लोकांना मोठ्या प्रमाणावर कामाला लावून त्यांच्यांत स्वावलंबन व एकजूट उत्पन्न करूं त्यांच्यावरील आजची जबाबदारी पटविणें हें अत्यंत महत्त्वाचें लोकशिक्षण-कार्य आहे. हें साधण्यासाठीं पू. साने गुरुजींच्या आदेशानुसार सेवापथकाची योजना निघाली. ही कल्पना नवीन होती. ज्याला आपण 'मोबाइल वर्कर्स स्क्वाड' म्हणूं अशा पथकाच्या कार्याला पूर्वपरंपरा नव्हती. सेवापथकांत दलप्रमुखांच्या आवाहनावरून जीं माणसें सामील झालीं त्यांच्या मगदुरावर सेवापथकाच्या कार्याचें स्वरूप बऱ्याच अंशीं अवलंबून असणें स्वाभाविक आहे. सेवापथकाच्या डोळ्यांपुढील कार्य व तें करणारीं हातीं असलेलीं माणसें यांचा विचार करतां सेवापथकानें प्रामुख्येंकरून रस्त्याचें काम (व्हिलेज अप्रोच रोडस्) हातीं घेतलें. हें काम करीत असतां रस्त्यापेक्षां अधिक निकडीचीं व महत्त्वाचीं कामें आम्ही कां हातीं घेतलीं नाहींत, असें जागोजागचे कांहीं लोक आम्हांला विचारीत असत. अधिक धान्य पिकविणें ही आजची अधिक अगत्याची निकड आहे; तें काम किंवा त्याला पोषक असें काम आम्ही कां हातीं घेतलें नाहीं ? अशा कामास तज्ज्ञ कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे व त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकांच्या इच्छे-अनिच्छेचा फार मोठा प्रश्न त्यांत अंतर्भूत होतो. उलटपक्षीं रस्त्याची मागणी ही एक-मुखी असूं शकते. शिवाय सरकारनें याबाबत आंखून ठेवलेल्या अनेक योजना धूळ खात पडल्या होत्या, त्या हातीं घेणें सुलभ होतें.

पावसाळ्यानंतरच्या दिवसांत केलेलें रस्त्याचें हें काम जुजबी स्वरूपाचें होणार नाहीं का, असें आम्हांस कांहींजण विचारीत. आम्ही प्रथमपासून अशी खबरदारी घेतली होती कीं, सरकारनें वा स्थानिक स्वराज्य संस्थांनीं योजलेलीं कामेंच हातीं घ्यावीं. तीं सरकारी अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानें चालवल्यामुळें त्यांची पुढील जबाबदारी बहुतांशीं सरकारनें स्वीकारली. चिंचवडजवळील रस्त्यास पांचशें रुपये, ठाण्याजवळील वागबीळ रस्त्यास पांच हजार रुपये सरकारकडून मिळाल्यानें त्या त्या रस्त्यांना कायम स्वरूप प्राप्त झालें आहे. लोकांच्या श्रमानें व जनतेच्या आर्थिक व इतर साहाय्यानें

कारी योजनेपेक्षां कितीतरी कमी खर्चांत पार पडलीं, ही ार्थिक बचत होय.

ीजाग बंधारे घालून पावसाचें पाणी अडवणें व त्यामुळें जमिनीस पुरवून उत्पन्नांत भर घालतां येणें हें एक उपयुक्त व आवश्यक कार्य ्रत आहे. जर सेवापथकांत अधिक तज्ञ माणसें सामील होतील व सरकारी साहाय्य अधिकाधिक लाभेल तर बंधाऱ्यांचें काम हातीं घेणें शक्य होईल असें वाटतें.

सेवापथकानें रस्त्याचें काम हातीं घेतांना केवळ रस्ते करणें एवढाच उद्देश कांहीं मनांत बाळगला नव्हता. या निमित्तानें आम्हांला लोकांचें हृद्गत जाणून घ्यावयाचें होतें. लोकशाही समाजवादाच्या कल्पना आम्ही अंतःकरणांत बाळगून आहोंत, त्या आम्हांला त्यांच्यापुढें त्यांच्या मग-दुरानुरूप मांडतां आल्या. लोकांत व्याख्यानें ऐकून घेण्याची प्रवृत्ति आजकाल शिल्लक राहिली आहेसें मुळींच वाटत नाहीं. अशा परिस्थितींत आम्ही या निमित्तानें त्यांच्यामध्यें अहोरात्र वावरलों, मिसळलों व त्यांचें थोडेंबहुत प्रेम संपादन केलें. दीर्घकालीन अज्ञानामुळें समाजांत जे दोष निर्माण झाले आहेत ते घालवून नव समाजनिर्मिति करण्याचें कार्य अतिशय दुर्घट आहे. या कामांत आम्हांला यश मिळालें का? आम्हांला असें वाटतें कीं 'अप्रोच रोड्स्'मुळें आम्हांला जनतेंत 'ॲप्रोच' लाभत आहे.

रस्त्याच्या कामाच्या निमित्तानें आम्ही जें समाजकार्य आरंभिलें आहे त्यास कायम स्वरूप आणण्याच्या दृष्टीनें आम्ही काय उपाययोजना चालविली आहे, असा प्रश्न आम्हांस कांहीं कांहीं सूज्ञ पृच्छक करीत असतात. हें काम साध्य होण्यास जेथें आमचे निकटचे संबंध निर्माण झाले आहेत असें वाटतें तेथें आमचीं माणसें कायम करतां आलीं पाहिजेत. यासाठीं लायक तरुणांनीं व विशेषतः तरुणींनीं हें काम आपलें जीवितकार्य म्हणून कांहीं वर्षें चालवलें पाहिजे.

सेवापथकाच्या रस्त्याच्या कामांत मुलींची आवश्यकता काय, असा प्रश्न चांगल्या चांगल्या लोकांनींसुद्धां केलेला पाहून आश्चर्य वाटलें! आम्हांला कांहीं नुसते रस्ते दुरुस्त करावयाचे नव्हते; नवीन रस्ते, नव्या चाली

पाडावयाच्या होत्या. हें समाजपरिवर्तनाचें काम शिक्षणानें 'ईं वाईट घडवावें लागेल, कायदेबाजीनें ती पूर्णतः साधणार नाहीं, अश्खेळणें श्रद्धा आहे. समाजाची ठेवण प्रामुख्यानें स्त्रियांच्या चालीरीती, पली विचार यांवर अवलंबून असते. पुरुषवर्ग राजकीय व सामाजिक दृ तात्त्विक व कांहीं अंशीं व्यावहारिक दृष्ट्या, कितीहि क्रांतिवादी वा क्रांतिक। झाला तरीहि स्त्री-वर्ग हा जर अडाणी, प्रतिगामी अतएव क्रांतिविरोधी असेल तर सामाजिक व शैक्षणिक क्रांति घडून येणें सर्वथैव अशक्य आहे. राजकारणांत पुष्कळ वर्षें पडलेल्या पुरुषांनींसुद्धां आपल्या कौटुंबिक मत-परिवर्तनाच्या कार्याकडे डोळेझांक केली असल्यानें देशाच्या सामाजिक क्रांतीच्या गाड्याचें चाक रुतून बसलें आहे! खानदेशमधील तासखेड केंद्रावरील कामाच्या समारोप समारंभप्रसंगीं सेवापथकांतील आमच्या मुलीनें याच मुद्यावर कडाडून हल्ला चढविला. त्याचा सुपरिणाम वडजईच्या अप्पासाहेब देवरे यांच्यावर असा झाला कीं त्यांनीं जाहीर रीत्या अशी कबुली दिली कीं मी जोंपर्यंत पत्नीस समानतेनें वागवल्याचें सिद्ध करणार नाहीं, तोंपर्यंत सभेंत जाहीर भाषण करणार नाहीं!

खानदेशांतील देशमुख–पाटलांच्या स्त्रियांत आणि ठाणें जिल्ह्यांतील आगरी समाजांतील स्त्रियांत आमच्या मुलींना महदंतर दिसून आलें. देशमुख–पाटलांच्या स्त्रिया पडद्यांत राहणाऱ्या, तर आगरी बाया जंगलांत वा शेतांत राबणाऱ्या, बाजारांत माल विकायला जाणाऱ्या 'राबुन राबुनशान जिंदगी सरली.' हें आमचें दलगीत सर्व महाराष्ट्रभर पसरलें आहे. वागबीळमधील स्त्रियांनीं त्या गीतांतील शब्दाशब्दाचा अर्थ कुतूहलानें समजून घेतला व धुळ्याजवळील वडजई केंद्रावरील एका बारा वर्षांच्या मुलीनें हें गाणें शिकवितांना आपलें कान अपवित्र होऊं नयेत म्हणून आपल्या दोन्ही कानांत बोटें घालून घेतलीं! या मुलींत उत्पन्न झालेली वरील दलगीतासंबंधींची घृणा व आगरी मुलीला त्याबद्दल वाटत असलेलें प्रेम व कुतूहल हा विलक्षण फरक कशामुळें? त्यांच्या जीवनांतील फरकामुळें. रस्त्यावर पडलेलें शेणसुद्धां उंबरठा ओलांडून आम्ही आणणार नाहीं, हें सांगण्यांत देशमुख–पाटलांच्या स्त्रिया भूषण मानीत आहेत. हा खोटा अभिमान, हा परंपरागत रोग नाहींसा करावयाचा आहे. साहजिकच

द्रावरील स्त्रिया पहिल्या दिवसापासून हरएक कामांत पुढाकार
ा; तर खानदेशांतील पडदा पाळणाऱ्या स्त्रियांना एक दिवस
र आणून त्यांच्याकडून पाटीभर माती टाकावयास लावण्याच्या
गिरीसाठीं आमच्या मुलींना जणूं दिव्य करून दाखवावें लागलें !

रस्त्याचें काम करीत असतांना स्थानिक स्त्री-पुरुषांकडून आम्हाला विरोध, औदासीन्य, कुतूहल, सहकार्य व आत्मीयता या विविध भावनांचा अनुभव घेतां येत असे. आम्ही सरकारी माणसें असलों पाहिजे, सरकारचा पगार घेऊनच आम्ही काम करीत असूं, अशी त्यांची ठाम समजूत असे. त्यांचा तरी काय दोष ? त्यांना समाजांत सर्वत्र काय दिसत आहे ? जिकडे तिकडे रेशनच्या दुकानापासून तों इस्पितळांपर्यंत पैसे चारल्यावांचून काम होत नाहीं, असा कटु अनुभव येत नाहीं का ? तेव्हां पथकांतील पुरुष काय मजुरी घेतात, असा प्रश्न विचारला जाई. पण मुली सकाळीं उठून आमच्या-बरोबर कामावर जाऊन काय करीत असतील, हा त्यांच्यापुढें मोठा प्रश्न पडला व त्यांनीं असा निष्कर्ष काढला कीं या मुली मुकादम असल्या पाहिजेत ! एके ठिकाणीं मात्र याच्या अगदीं उलट प्रकार आढळून आला. आम्हीं दहा वाजतां उन्हांतून कामावरून परत येत असतांना एका हरिजन बाईनें आमच्याबरोबर मुलींना पाहून कळवळ्यानें विचारलें, " तुम्ही कामावर जातां तें जातां, या चांगल्या मुलींना कशाला नेतां ? त्यांच्या हातांना कुठली बरं संवय असणार ! आम्ही जन्मभर कष्ट उपसतों तें पुरे कीं ! या देवाघरच्या माणसांना कशाला कष्ट ? कुण्या मेल्या देवानं महाराचा जन्म घातला असेल त्याचं तळपट होवो ! " हा भेद देवानें केला नसून माणसानें केला आहे अशा आमच्या सांगण्यानें त्या आर्त स्वराचें समाधान कसें होणार ? " What man has made of man ! " या टेनिसनच्या ओळीची मीं आमच्या मुलींना आठवण करून दिली.

सेवापथकाचें काम राजकीय दृष्ट्या पक्षातीत भूमिकेवरून चालावें, अशी प्रेमळ पण आग्रहाची सूचना प्रसिद्ध कामगार पुढारी एस्. एम्. जोशी यांनीं दिली होती. आम्हीं हातीं घेतलेलीं कामें सार्वजनिक हिताचीं होतीं. त्यांत सर्व लोकांनीं भाग घ्यावा व सहकार्य करावें, अशीहि आमची इच्छा होती. म्हणून आम्हीहि या दृष्टीनें विचार करूं लागलों होतोंच. पण कुठल्याहि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

केन्द्रावर राजकीय पक्षभेदामुळें औदासीन्य, असहकार अगर्ही वाईट होण्याचा प्रश्न उद्भवलाच नाहीं. विरोध अगर औदासीन्य होतें तें खेळणें व आळसामुळें उत्पन्न झालेलें होतें. फक्त नेरळ व खानदेशमधील वली या दोनच ठिकाणीं विरोधाचे प्रसंग, राजकीय कारणांमुळें आले. नेरळ येथील समितीच्या स्त्रियांनीं तर पहिल्यापासूनच तळ्यच्या कामांत सहकार्य दिलें व पुरुषवर्गहि पुढें पुढें कामावर येऊं लागला; कटुता अशी कोठेंच उत्पन्न झाली नाहीं. पण कोचूर येथें बिकट समस्या निर्माण झाली व एस्. एम्.ना उपोषण करण्याची पाळी आली. पण अखेर तो प्रश्न सुटला व सार्‍यांचें सहकार्य लाभलें. यापुढें या बाबतींत, निवडणुकीचा काळ समीप येत असल्यानें, गुंतागुंतीचे बरेच प्रश्न उद्‌भवण्याचा पुष्कळ संभव आहे. त्यांचा दूरवर विचार करून अंतर्मुख होऊन आम्हीं जरूर व योग्य तें धोरण आंखलें पाहिजे.

तुम्ही निवडणुकांत मतें मागण्यासाठीं हें सेवापथक काढलें आहे, असा एक आक्षेप येतो. राष्ट्र-सेवा-दलानें विधायक कार्य नव्यानें घेतलेलें नाहीं. आमच्या हातून प्रासंगिक स्वरूपानें जें विधायक कार्य होत असे तें साने गुरुजींच्या अखेरच्या आदेशानेंच आम्ही सेवापथकद्वारां नेटानें पुढें रेटण्याचा प्रयत्न करीत आहों. निवडणुकीचे विचार आमच्या मनांत येतच नाहींत, असें म्हणणें सत्यापलापाचें होईल. पण देशांतील निवडणुका हा कांहीं निरंतरचा प्रश्न नव्हे, निदान राष्ट्र-सेवा-दलाच्या दृष्टीनें तर नाहींच नाहीं. राष्ट्र-सेवा-दलाची राजकीय आघाडी प्रजा समाजवादी पक्ष ही आहे. त्यासाठीं आम्हीं मतें मागणार नाहीं असें आम्ही कधींच म्हटलें नाहीं. उलट समाजवादाची प्रतिष्ठापना लोकशाही मार्गानें झाली पाहिजे, असा आमचा आग्रह व निष्ठा असल्यामुळें निवडणुकीच्या प्रश्नाबाबत आम्ही उदासीन राहूं शकत नाहीं. सर्वत्र जसें मत मागण्यास जाऊं तसें जेथें सेवा घडली आहे तेथेंहि वेळ येईल तेव्हां जाऊं, पण मत दिलें नाहीं तर रुष्ट न होण्याइतकी समतोल वृत्ति राखण्याचें धोरण आमच्या हातून पार पडावें असा आम्ही निग्रह पाळला पाहिजे. मतें द्याल तर करतों, असें म्हटलें नाहीं; व काम केलें म्हणून मत दिलें पाहिजे, असें म्हणून सेवेला हिणकस स्वरूप न येऊं देण्याची आम्ही खबरदारी घेतली पाहिजे.

न समाजाचें कांहीं हित केलें आहे कीं नाहीं, त्याचें उत्तर समाजानें ग सेवा पथकामुळें राष्ट्र-सेवा-दलाचा फायदा झाला आहे हें मात्र . समाजांतील सार्वत्रिक निष्क्रियतेचा राष्ट्र-सेवा-दलावरहि परिणाम ाखेरीज राहिला नव्हता. हें मालिन्य कांहीं प्रमाणांत झटकलें गेलें. जाचें अंतरंग अधिक जवळून पाहण्याची संधि लाभली. समाजास कोणते प्रश्न आज भेडसावीत आहेत हें अधिक स्वच्छ रीतीनें पाहावयास मिळालें. जनतेचा पाठिंबा भिन्न भिन्न स्वरूपानें आमच्या कार्यास मिळवण्यांत यश लाभलें. कामाच्या निमित्तानें भोंवतालचे बरेच सैनिक त्यांत यथाकाल व यथाप्रमाण सामील होऊं शकले व अनेक प्रकारच्या कष्टमय जीवनांतून जाण्याची त्यांना संधि लाभली हे अनुभव आम्हांला नवीन उत्साह, प्रेरणा व प्रकाश देवोत.

* * *

हीं वाईट
खेळणें
ली

# अस्पृश्यतानिवारण : विविध प्रयत्न

वैचारिक व व्यावहारिक दृष्ट्या अस्पृश्यता अमान्य करण्याचें धोरण आर्यसमाजीयांनीं पंजाबांत, प्रार्थना समाज आणि ब्राह्म-समाज यांनीं मुंबई-बंगाल्यांत आचरण्यांत पुढाकार घेतला तरी अस्पृश्यतानिवारणाच्या कार्याचे बिनीचे शिलेदार महात्मा फुले हेच होत. त्यांनीं शिवाशीव प्रकरणाच्या बालेकिल्ल्यास पुणें शहरांतच तोफा डागल्या. १८५२ सालाच्या आरंभीं महारा-मांगांच्या मुलांसाठीं महात्मा ज्योतिबा फुले यांनीं पहिली शाळा स्थापना केली. ही शाळा मुंबई इलाख्यांतच नव्हे, तर अखिल भारताच्या इतिहासांत अस्पृश्यांसाठीं एका हिंदूनें उघडलेली पहिली शाळा होय ! पुढें लवकरच त्यांनीं आपल्या घराशेजारीं मुलींची शाळा काढली. या शाळेंत चांभारांच्या मुलींना स्वतः ज्योतिबा व त्यांच्या पत्नी अतिशय कळकळीनें शिकवीत. महारा-मांगांस त्यांनीं आपल्या घराच्या विहिरीवर पाणी भरण्यास परवानगी दिली. या 'अमंगल' कार्यावरून त्यांच्या वडिलांनीं ज्योतिबांना घरांतून बाहेर काढलें ! ज्योतिबांच्या वरील क्रांतिकारी कार्यामुळें त्यांच्या समाजाकडून त्यांना विटंबना व छळहि सहन करावा लागला.

दुर्दैवानें म. फुले यांचे हे प्रयत्न त्या वेळीं एकाकी ठरले व ती चळवळ होऊं शकली नाहीं. म. फुले यांना त्या काळीं समाजांत प्रतिष्ठा प्राप्त होऊं शकली नाहीं व त्यांच्या या कार्यासहि मान्यता लाभली नाहीं. बंगाल्यांत सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं अशाच कार्यास १८६५ सालीं प्रारंभ केला. पण हें गाडें नेटानें पुढें रेटण्याचें श्रेय बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव गायकवाड

ा लाभलें. त्यांनीं १८८३ पासून आपल्या संस्थानांत अस्पृश्यांना
ण्यासाठीं अनेक ठिकाणीं शाळा काढल्या. कितीहि मोठ्या पगाराचें
ष दाखवलें तरी त्यांना कित्येक वर्षें हिंदु शिक्षकच मिळेनात ! प्रथम
ा मुसलमानांकडून हें काम करून घ्यावें लागलें. पुढें त्यांना आर्य-
ाजी शिक्षक मिळूं लागले.

सन १८९१–९२ सालीं बडोदा, अमरेली, पाटणा, नवसारी येथें प्रत्येक ठिकाणीं अस्पृश्य मुलांसाठीं व मुलींसाठीं स्वतंत्र वसतिगृहें त्यांनीं खोललीं. लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेनें गणपति उत्सवाच्या चळवळीस प्रारंभ झाला, तेव्हां गणपतीच्या मिरवणुकींत चांभारांच्या गणपतीस वाव मिळेना, तेव्हां लोकमान्यांनीं चांभारांचा गणपति आपल्या स्वतःच्या गणपतीच्या गाडींत बसवून घेतला ! “ अस्पृश्यता मानली पाहिजे असें प्रत्यक्ष परमेश्वरानें सांगितलें तर मी त्या परमेश्वरास अस्पृश्य मानीन ! ” असे जळजळीत उद्‌गार लो. टिळकांनीं काढलें. एकोणिसाव्या शतकाच्या अखेर पावेतों वैचारिक दृष्ट्या अस्पृश्यतेस थारा नसल्याचें प्रतिपादण्यांत येऊन अस्पृश्योद्धारासाठीं शाळा खोलाव्यात व त्यांना शिक्षण देऊन त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारावी व त्यांना मिळत असलेल्या अपमान-जनक वागणुकीस आळा बसवण्याचा प्रयत्न करावा, असें म्हणण्याइतपत प्रगति होऊं शकली.

सन १९०६ सालीं काँग्रेसनें कलकत्ता येथें चतुःसूत्रीचा ठराव पास करून राजकीय दृष्ट्या चळवळीच्या कार्याची पद्धति निश्चित केली. वंगभंगाच्या निमित्तानें मोठें आंदोलन सुरू झालें. पण या चळवळींत अस्पृश्यता निवारणाच्या कार्यास कोठेंच स्थान नव्हतें. महाराष्ट्रांत आधीं राजकीय कीं सामाजिक; या प्रश्नावर टिळक–आगरकर यांच्यामध्यें वादाचीं रणें माजून या कार्यास प्रत्यक्ष तोंड लागूं शकलेंच नाहीं.

सुख, संपत्ति, ज्ञान, दरबारीं वजन इत्यादि गोष्टी ब्राह्मणांकडे मोठ्या प्रमाणांत गेल्या असल्यानें इतर सर्व वर्ग दिपून गेले होते. याची जणूं प्रतिक्रिया म्हणून म० फुले यांनीं ब्राह्मणेत्तर चळवळीस हात घातला. पण ते मराठा नव्हते म्हणून म्हणा, किंवा अद्यापि अनुकूल काल आला नव्हता म्हणून म्हणा श्री. शाहूमहाराजांनीं ब्राह्मणेतर चळवळ हातीं घेईतोंवर हा

प्रश्न धसास लागला नाहीं. पुढें ब्राह्मणेतर चळवळ फोंफावली, हीं वाईट कार्यपद्धतींत असावी तशी शैक्षणिक दृष्टि व निर्लेपता नसल्यानें वेळणें निवारणाची चळवळ मात्र वाढूं शकली नाहीं.

या कार्यास महाराष्ट्रांत खऱ्या अर्थानें हात घातला श्री. विठ्ठल रा- शिंदे यांनीं. श्री. विठ्ठल रामजी शिंदे हे बी. ए. चा अभ्यास करीत असता- त्यांना मँचेस्टर येथील युनिटेरियन स्कूलमध्यें प्रवेश मिळण्याचा योग लाभला. सन १९०३ मध्यें ते शिक्षण घेऊन परत आले व प्रार्थनासमाजाच्या व ब्राह्मो समाजाच्या प्रचार कार्यास लागले. त्यांनीं इंग्लंडमध्यें भाषाशास्त्र, धर्म, यांचा खोल अभ्यास केला होता. सन १९०६ सालीं त्यांनीं पुण्यास ' डिप्रेस्ड क्लास मिशन 'ची स्थापना करून फार मोठ्या प्रमाणांत शाळा व वसतिगृहें स्थापून अस्पृश्यांना शिक्षण देण्याच्या कार्यास प्रभावीपणें प्रारंभ केला. अस्पृश्यता-निवारणाची मशाल हातीं घेऊन त्याबाबत अहर्निश संघटित-रीत्या व चौफेर कार्य विठ्ठल रामजी शिंदे यांनीं केलें. त्यांना ' कर्मवीर ' म्हणून महाराष्ट्रानें संबोधिलें हें अत्यंत युक्त होय.

गांधीजींनीं १९१५ सालीं सार्वजनिक क्षेत्रांत पदार्पण केलें तें चंपारण्यांत. पण त्यांचें तें प्रासंगिक कार्य होय. आफ्रिकेंतील त्यांच्या सत्याग्रहाचा कस त्यांना चंपारण्यांत लावतां आला व भारतीय क्षितिजावर एक नवीन तारा उदय पावल्याचा भारताला प्रत्यय आला. पण त्यांनीं स्थिर कार्यास प्रारंभ केला अहमदाबाद येथें आश्रम स्थापन करून. ना. गोखले यांनीं स्थापन केलेल्या सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे सदस्य श्री. ठक्करबापा यांनीं महात्माजींकडे अशी विचारणा केली कीं, आपण आपल्या अहमदाबाद आश्रमांत अस्पृश्य कुटुंबास घ्याल का? त्यांनीं होकार दिला तेव्हां अहमदाबादमधील धनिकांनीं आश्रमकार्यास लागणाऱ्या देणग्या नाकारण्याचा नुसता धाकच घातला नाहीं, तर देणग्या प्रत्यक्ष नाकारल्या ! त्याला महात्माजींनीं फार चोख उत्तर दिलें. ' धेडाच्या वस्तींत मी जाऊन राहीन ' असें ते म्हणाले. त्यांनीं ताबडतोब अहमदाबाद आश्रम मोडून कोचरबमध्यें साबरमती नदीकांठीं आश्रम काढला.

सन १९२० सालीं गांधीजींनीं असहकाराची देशव्यापी चळवळ सुरू केली. सरकारी पदव्या, कोर्टें, शाळा इत्यादींवर बहिष्कार; राष्ट्रीय शिक्षण

पणें, या चळवळींतील कार्यक्रमाबरोबरच ‘ जातीय प्रश्न ’ हा कार्यक्रमाचा भाग त्यांनीं मानला.

जातीय प्रश्नाचा अभिप्रेत अर्थ हिंदु-मुस्लिम ऐक्य व अस्पृश्यतानिवारण. अशा रीतीनें १९०६ सालच्या राष्ट्रीय चळवळीच्या आंदोलनांत राहून गेलेली चूक, नागपूर काँग्रेसच्या ठरावानें दुरुस्त झाली. असहकाराच्या चळवळींतच अस्पृश्यतानिवारणाला स्थान मिळाल्यानें त्या कार्याची गुणात्मक व क्षेत्रात्मक वाढ झाली. आतांपर्यंत या कार्यास सामान्यतः ‘ अस्पृश्योद्धार ’ या अर्थानें संबोधण्यांत येई. अस्पृश्य व उद्धार या दोन्ही शब्द-प्रयोगांना गांधीजींनीं रजा दिली !

महाराष्ट्रांत प्रा. माटे यांनीं आपलें कार्य सुरू केलें, तेव्हां ते ‘ अस्पृष्ट ’ हा शब्दप्रयोग करूं लागले. कांहीं जण पूर्वास्पृश्य किंवा मानीव अस्पृश्य असें संबोधीत. या तीनहि शब्दप्रयोगांत अस्पृश्य हा शब्द शिल्लक राहतोच. त्या शब्दाचें नामोच्चरणच नको, ही गांधीजींची कल्पना अधिक उच्च व युक्त होती. त्यांनीं ते कोणी तरी पतित आहेत या समजुतीचें उच्चाटन केलें तें ‘ हरिजन ’ या शब्दप्रयोगानें. तसेंच, उद्धार करण्याच्या प्रयत्नाच्या कल्पनेंत आपण कोणी तरी श्रेष्ठ आहोंत, ही भावना वास करीत असते. त्याऐवजीं गांधीजींनीं सेवा या शब्दाबद्दल आग्रह धरला व तो फार उचित होता. उद्धारांतील परोपकार करण्याच्या कल्पनेऐवजीं सेवा शब्दांत कर्तव्यबुद्धि अभिप्रेत असते. सेवकानें सेवा न करणें म्हणजे आपल्या कर्तव्यास चुकणें होय.

श्री. सयाजी महाराजांनीं ज्याप्रमाणें शाळा काढल्या व हरिजनांसाठीं वसतिगृहें खोललीं त्याप्रमाणें पुष्कळ अस्पृश्य विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप्स देऊन परदेशांतहि पाठवलें. डॉ. आंबेडकर बडोद्यास शिकत असतां त्यांची हुषारी पाहून त्यांना महाराजांनीं विलायतेत बरींच वर्षे ठेवून त्यांची डॉक्टरेट मिळवीपर्यंतची सर्व सोय केली.

आंबेडकर यांना विद्यार्थिदशेंत संस्कृत हा दुसरा विषय घेवून शिकण्याची इच्छा असतांना संस्कृतच्या शिक्षकानें महार म्हणून त्यांना संस्कृत शिकवावयाचें नाकारलें ! पण आंबेडकरांसारख्यास संस्कृत शिकवण्याचें नाकारण्यानें

त्यांच्या हृदयास जखम झाली ती कायमची ! पुढें आंबेडकर होऊन त्यांना सयाजीरावांनीं शिक्षणाधिकारी नेमलें तरीहि स्पृश्य समा त्यांची श्रेष्ठता अमान्य करून त्यांच्या पूर्वीच्या जखमेस आणखी मीठ चोळलें. हिंदू समाज हरिजनांस समानतेनें वागवील, असा विश्वास आंबेडकरांना कसा वाटावा ?

हरिजनांवरील अन्याय दूर करण्याच्या दृष्टीनें कांहीं विशेष अन्याय्य गोष्टींचें निर्मूलन करणें प्राप्त होतें. मंदिरप्रवेश, पाणवठ्याच्या जागा हीं केंद्रस्थानें होतीं. हॉटेल वगैरे सार्वजनिक ठिकाणीं समानतेनें प्रवेश हीहि एक महत्त्वाची बाब होती. १९२४ सालीं त्रावणकोर संस्थानांतील वायकोम या गांवीं असलेल्या मंदिरांत हरिजनांना प्रवेश मिळावा म्हणून मोठी चळवळ सुरू झाली. या मंदिरांत ख्रिस्ती-मुस्लीम यांना देखील सर्रास परवानगी असे, पण हरिजनांना मात्र प्रवेश नव्हता ! पुण्याहून कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे तिकडे सत्याग्रहांत भाग घेण्यासाठीं गेले होते. विनोबाजींना या सत्याग्रहासाठीं गांधीजींनीं मुद्दाम पाठविलें होतें. वायकोमच्या सत्याग्रहाचे प्रतिध्वनि इतरत्र उठणें अपरिहार्य होतें.

महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिकच्या काळाराम मंदिराचा सत्याग्रह या सर्व चळवळींनीं हरिजनांवरील अन्यायास फार मोठ्या प्रमाणांत वाचा फोडली. डॉ. आंबेडकरांचा ह्या चळवळींत भाग होताच.

लाहोरचा संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव व त्यानंतर मीठ सत्याग्रहाची प्रचंड देशव्यापी चळवळ झाली. प्रत्यक्ष जेलमध्यें ८० हजार लोक होते. सुमारें एक कोट लोक प्रत्यक्ष सत्याग्रहांत सामील झाले असावेत. ब्रिटिश लोक या चळवळींमुळें दिङ्मूढ झाले व याचें पर्यवसान गांधी–आयर्विन करारामध्यें झालें. या चळवळींत ज्या अनेक लहानमोठ्या कार्यकर्त्यांनीं भाग घेतला त्यांच्यावर गांधीजींच्या शिकवणीचा परिणाम झाला होता. हे लोक कमीजास्त प्रमाणांत हरिजनसेवेच्या कार्याचें लोण खेड्यापाड्यापर्यंत पोंचवूं शकले होते.

राउंड टेबल कॉन्फरन्सला काँग्रेसनें आपला एकमेव पुढारी म्हणून महात्माजींना पाठवलें, पण तेथें डॉ. मुंजे व विशेषतः डॉ. आंबेडकर

उ... हेहि स्वतंत्रपणें उपस्थित होते. जीनांनीं मुसलमानांसाठीं ...नाणें स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली तशीच मागणी डॉ. ...बेडकरांनींहि केली होती. गांधीजींचा विरोध त्यांनीं जुमानला नाहीं. जीनांच्या स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीबद्दल गांधीजींना कांहींहि करतां येण्यासारखें नव्हतें, पण हरिजनांच्या स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीस त्यांनीं प्राणपणानें विरोध करण्याचें ठरविलें.

राउंड टेबलहून भारतांत परत येतांच सरकारनें गांधीजींना अटक केली, त्यांना येरवडा जेलमध्यें पाठवलें आणि मुसलमान व हरिजन याचे स्वतंत्र मतदार संघ मान्य केल्याचें जाहीर केलें. हा अन्याय्य निवाडा म्हणजे अस्पृश्यांना समाजापासून कायमचे तोडण्याचा डाव होता. हा जातीय निवाडा उधळून लावण्याच्या कामी डॉ. आंबेडकरांनीं साहाय्य करावें म्हणून गांधीजींनीं परोपरीनें प्रयत्न केला, पण तो असफल ठरल्यानें त्यांनीं येरवडा जेलमध्यें प्राणांतिक उपोषण सुरू केलें. गांधीजींनीं उपोषण सोडावें म्हणून अनेक पुढाऱ्यांनीं त्यांना विनंति केली. पण गांधीजी अविचल होते. ते म्हणाले, " माझे प्राण आंबेडकरांच्या हातीं आहेत. हरिजनांवर आतांपर्यंत स्पृश्य समाजानें घोर अन्याय केले आहेत. अस्पृश्यता हा हिंदु धर्माला कलंक आहे. तथापि हिंदु समाजापासून हरिजनांनीं फुटून निघूं नये. "

डॉ. आंबेडकरांना गांधीजींचें म्हणणें पटलें असावें असें म्हणतां येत नाहीं, पण गांधीजींविषयीं आंबेडकरांच्या मनांत थोर आदर वसत होता व एवढ्या थोर गृहस्थाला आपल्यामुळें प्राण अर्पण करण्याची पाळी आली, असें आपल्यावर खापर फुटूं नये म्हणून त्यांनीं गांधीजींच्या म्हणण्यास मान्यता दिली असावी. त्याच वेळीं अस्पृश्यतानिवारणाच्या कार्यावर विशेष भर देण्याचें गांधीजींनीं ठरवलें.

गांधीजींना आपल्या शब्दाची परिपूर्ति करण्याची मोठी जोखीम पार पाडावयाची होती. जेलमधून सुटका होतांच त्यांनीं अखिल भारतीय हरिजन सेवक संघाची स्थापना केली व ताबडतोबीनें कार्यास लागतां यावें म्हणून त्या कार्यासाठीं वीस लाख रुपये निधीचें आवाहन केलें. कर्तबगार भारत-सेवक श्री. ठक्करबाप्पा हे या अखिल भारतीय मंडळाचे सेक्रेटरी झाले.

...६

यथाकाळ प्रांत शाखाहि सुरू झाल्या. महाराष्ट्र हरिजन सेव
जबाबदारी धुळ्याचे श्री. काकासाहेब बरवे वकील यांनीं पत्करली व
निष्ठेनें व तत्परतेनें ती पार पाडण्यास सुरुवात केली.

१९३४ सालीं कॉंग्रेसनें बिनशर्त आपली चळवळ मागें घेतल्यानंतर गांधीजींनीं आपलें आश्रमीय वास्तव्य साबरमतीसारख्या बाजूच्या व शहरी संस्कृतीच्या परिसरांतून दूर सेवाग्राम येथें हलवलें. शेतकऱ्यांशीं व खेड्यांशीं निकटचे संबंध यावेत म्हणून हें भारताचें मध्यवर्ति असें ठिकाण कायमचें वास्तव्य करण्यास त्यांनीं पसंत केलें. तेथून हरिजन कार्याचीं सूत्रें हलूं लागलीं. सरकारनें प्रांतिक स्वायत्ततेचें प्रदान करतांना हरिजनांसाठीं कांहीं राखीव जागा ठेवल्या, राखीव जागांशिवाय कांहीं खुल्या मतदार संघांत हरिजनांना जागा मिळाव्यात असा कॉंग्रेसनें आग्रह राखला. प्रांतिक मंत्रि-मंडळांतहि हरिजनांना जागा देण्याचें कटाक्षानें धोरण आंखण्यांत आलें.

१९४२ सालचा उग्र लढा, इंग्लंडवर आलेलें जागतिक दडपण, सुभाष-बाबूंची आझाद हिंद चळवळ व अखेरीस नाविक दलाचें बंड या सर्व घटनांचा साकल्यानें विचार करून ब्रिटिशांनीं स्वखुशीनें हिंदुस्थान सोडण्याचें कबूल केलें.

स्वातंत्र्य दृष्टिपथांत आलेलें पाहून पूज्य साने गुरुजींनीं अस्पृश्यतानिवारणार्थ केलेलें दिव्य हें अविस्मरणीय म्हणावें लागेल. स्वातंत्र्याचें स्वागत सर्व भेदांचा निरास करून केलें जावें, अशी त्यांची तळमळ होती. स्वातंत्र्याचें स्वागत करण्यांत सर्वांना उत्साह वाटावयाचा तर त्यांना समतेचें आणि समृद्धीचें आश्वासन मिळालें पाहिजे, असें त्यांना वाटलें. पंढरपूरचें विठ्ठल मंदिर ही किल्ली आहे, तें मंदिर उघडलें कीं, आपलीं हृदयकवाडेंहि उघडतील, अशी त्यांची धारणा होती. पंढरपूरचें विठ्ठल मंदिर हरिजनांना खुलें व्हावें, म्हणून त्यांनीं उभ्या महाराष्ट्रावर झंझावाती प्रचार केला. अस्पृश्यता मानण्यांतील अधर्म त्यांनीं लोकांच्या नजरेस आणला. शेवटीं त्यांना उपवास करावा लागलाच. अकरा दिवसांनंतर विठ्ठलमंदिर खुलें झालें. साने गुरुजींच्या ह्या उपवासानिमित्त सामाजिक अभिसरणाचा एक मोठा प्रयोग झाला असें म्हणावें लागेल. राजकीय स्वातंत्र्याचा अर्थ सर्व सामान्य माणसांना समता व समृद्धि यांच्या आश्वासनांतूनच समजणार ह्याची

... या वेळीं तीव्रतेनें झाली. अस्पृश्यता-निवारणाच्या चळवळींतील हें ...क महान पर्व समजलें पाहिजे.

साने गुरुजींचा उपवास ही १९४७ च्या उन्हाळ्यांतील घटना. त्यानंतर थोड्याच अवधींत आपल्याला खंडित स्वातंत्र्य प्राप्त झालें. गांधीजी स्वातंत्र्या-नंतर आपल्या सर्व रचनात्मक कामांची फेररचना करूं इच्छित होते. परंतु तेवढी उसंत त्यांना मिळाली नाहीं. ३० जानेवारी १९४८ रोजीं एका माथेफिरूच्या खुनी हल्ल्याला ते बळी पडले.

डॉ. आंबेडकरांना अस्पृश्यता समूळ नाहींशीं करण्याचें महात्माजींनीं दिलेलें अभिवचन पार पाडल्याचें श्रेय हिंदु समाजानें महात्माजींच्या पदरांत टाकल्यानें जें समाधान त्यांना लाभूं शकलें असतें तें त्यांच्या नशिबीं नव्हतें, असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें !

स्वतंत्र भारताची घटना बनवण्याचें अत्यंत बिकट व जोखमीचें कार्य भारतीय घटना समितीनें डॉ. आंबेडकर यांच्यावर सोंपविण्यांत महान् औचित्य राखलें. नवभारताचे स्मृतिकार डॉ. आंबेडकर झाले व त्यांचा उचित मान राखला. डॉ. आंबेडकरांनीं बनवलेल्या घटनेंत अस्पृश्यतेस कायद्यानें कोठलेंहि स्थान राहूं दिलें नाहीं.

कायद्यानें पुरती अस्पृश्यता नष्ट झाली, पण शास्त्रापेक्षां रूढि अधिक बलवान् म्हणतात तें खरें ! गुलामगिरीस तरी ख्रिस्ती व मुस्लिम धर्मांत कोठें आधार आहे का ? पण ब्रिटनमध्यें वुइलबर फोर्स व अमेरिकेंत अब्राहम लिंकन यांना गुलामगिरीविरोधी केवढी प्रचंड चळवळ करावी लागली ! अरब राष्ट्रांत व विशेषतः मक्केंत तर असला फार मोठा गुलामांचा व्यापार चालतो, असें म्हणतात. बायबलच्या शिकवणींत कोठें वर्णद्वेषांस स्थान आहे का ? पण जिथें अमेरिकेंत सध्यां सामाजिक चळवळींत वर्ण-विद्वेष नष्ट करणें हें फार मोठें कार्य शिल्लक राहिलें आहे, तिथें आफ्रिकेंतील ख्रिस्ती साम्राज्यशाही भागांतील वर्णद्वेषाचा धुमाकूळ काय वर्णावा ? पण वर्णविद्वेषापेक्षांहि अस्पृश्यतेचा प्रकार हा अधिक हिडीस व अमानुष आहे असें म्हणावें लागेल.

अस्पृश्यता-निवारण ही जशी एक भावनात्मक चळवळ आहे तसें तिचें एक महत्त्वाचें अंग आर्थिक आहे. आर्थिक समानताहि प्राप्त झाल्याखेरीज

अस्पृश्यतानिवारण आपल्या देशांत पूर्णपणें यशस्वी होणें अशक्य [redacted]
मात्र आर्थिक प्रश्न सुटल्यानें अस्पृश्यतानिवारणाचें कार्य संपेल हें म्हणणें
वस्तुस्थितीस सोडून ठरेल.

जमिनीच्या मालकी हक्कामुळें ग्रामीण भागांत आर्थिक विषमता पोसली जात असते म्हणून पू. विनोबाजींनीं जी भूदान-ग्रामदानाची चळवळ सुरू केली, त्यांत मिळालेल्या जमिनी प्राधान्येंकरून व पहिला हक्क म्हणून (प्रायॉरिटी राइट) हरिजनांना मिळाव्यात, असें धोरण आंखलें आहे. त्या दृष्टीनें महात्माजींचें अपुरें राहिलेलें कार्य खऱ्या अर्थानें जास्तींत जास्त यथार्थतेनें पू. विनोबाजींनींच चालवलें आहे.

भूदान व ग्रामदान चळवळीचा प्रचार करण्याचा सुयोग एक सतत वर्षभर राष्ट्र सेवा दलाला लाभला. सुमारें २० लोक वर्षभर अखंड पायीं महाराष्ट्रभर बहुतेक सर्व जिल्ह्यांतून फिरत राहिले. त्यांना त्या निमित्तानें खेड्यांची स्थिति अगदीं जवळून निरीक्षणाची संधि लाभली. त्यांत काय आढळलें? हरिजनांचा दैनंदिन योगक्षेम हा अद्यापि बऱ्याच ठिकाणीं स्पृश्यांच्या मेहेरबानीवर बराचसा अवलंबून आहे, यामुळें हरिजनांना ताठ मान करून स्वाभिमानानें जीवित जगणें अद्यापि साध्य झालेलें नाहीं. लोकल बोर्डानें ज्या सार्वजनिक विहिरींवर 'सर्वांच्या उपयोगासाठीं' असें पांढऱ्या-वर काळें करून ठेविलें आहे, त्याचा वस्तुतः कांहीं ठिकाणीं कांहीं सुद्धां उपयोग होत नाहीं, असें आढळलें! तोंड दाबून बुक्क्यांचा मार, या न्यायानें बिचाऱ्या हरिजनांना आपल्याला पाणी मिळत नाहीं हें स्पष्ट सांगण्याची सुद्धां चोरी! पुणें जिल्ह्यांतील एक शाळा गांवच्या मंदिरांत होती. स्पृश्य विद्यार्थी देवळांत बसत व शिक्षक हरिजन होते म्हणून देवळाबाहेरून शिकवत असत! या अन्यायाच्या निवारणार्थ जावें म्हणून योजिलें असतां शिक्षकांचीच तेथून बदली झाल्याचें कळलें!

ही सर्व परिस्थिति डॉ. आंबेडकरांसारख्या विद्वान् व स्वाभिमानी मनुष्यास कशी सहन होणार? 'मी हिंदु म्हणून जन्मलों आहें, पण हिंदू म्हणून मरणार नाहीं हें खास' अशी घोषणा त्यांनीं केली तर नवल काय? धर्मांतराचा विचार किती वर्षें डॉ. आंबेडकरांच्या मनांत घोळत होता. अखेरीस त्यांनीं या विचारास परिस्फुटता दिली व नागपूर येथें फार मोठ्या

... आपल्या अनुयायांना बुद्ध धर्म स्वीकारण्याचा आदेश दिला. ... आंबेडकर व बौद्ध भिक्षु यांच्या समक्ष हजारोंनीं बौद्ध धर्माचा स्वीकार केला व आंबेडकर नवबुद्ध म्हणून निर्वाणास गेले.

सध्यां आपल्या देशांत बऱ्याच सामाजिक सुधारणा कायद्याच्या जोरावर घडवून आणण्याची पद्धति जारी झालेली आहे. त्यामुळें स्वेच्छा प्रयत्नांचें अशा कार्याकडील लक्ष कमी झाल्याचें दिसतें. आपल्या देशांतील भंगीकाम हें अस्पृश्यतेचें विदारक व भयानक स्वरूप आहे ! बरवे कमिटीनें भंगीकाम सुसह्य व्हावें म्हणून ज्या सूचना केल्या आहेत, त्या सूचना बऱ्याच नगरपालिकांनीं ( जेथे फ्लशचे संडास नाहींत तेथें ) खुशाल नजरेआड केल्या आहेत ! अप्पासाहेब पटवर्धन, मराठवाड्यांतील श्री. नागोरीजी यांनीं खेड्यापाड्यांसाठीं संडासयोजना सुचवून भंगीमुक्ति व्हावी म्हणून जे थोर प्रयत्न चालू केले आहेत, त्यांची अंमलबजावणी मुंगीच्या गतीनें होत आहे.

‘ पुनर्जन्म लाभणार असेल तर मला भंग्याच्या पोटीं जन्म दे ’ ही महात्माजींची तीव्र मनीषा ! आज ते जन्मास आले असले तर भंग्याच्या हिडीस अवस्थेंतच त्यांना आपण कामास लावणार आहोंत का ?

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 320.39 वि: ...
क्रमांक 9305 नों: दि: २५/८८

# सँटिआगोची दयामूर्ति

'चिली देशांतील सर्वश्रेष्ठ स्त्री' अशा शब्दांनीं ज्यांचा उल्लेख करण्यांत आला त्यांना त्यांच्या कामगिरीचें निदर्शनात्मक पदक नजर करण्यासाठीं सँटिॲगो या शहरीं एक समारंभ झाला. धार्मिक, राजकीय, वैद्यकीय क्षेत्रांतील नामांकित श्रोत्यांनीं दिवाणखाना गच्च भरून गेला होता.

बाईच्या खांद्यावर हें झगझगित पदक लटकवतांना बाईचा चेहरा विनयी दिसत होता; श्रोत्यांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. दाईचें काम करणाऱ्या या मेरी शूल्टझबाई पन्नाशीच्या घरांत आल्या आहेत, त्यांचे केस पिकूं लागले आहेत. मॅद्रेहिजो (बालक व माता) या रुग्णालयाचें त्यांनीं गेलीं १९ वर्षें अव्याहत संचालन केलें आहे. त्या मूळच्या अमेरिकन प्रेस्बिटेरियन पंथाच्या. त्यांची विशेष उल्लेखनीय कामगिरी म्हणजे त्यांनीं ह्या संगोपन गृहांत आठ हजार मुलांच्या जन्माच्या वेळीं साह्य केलें! त्यांनीं भूतदया दाखविल्यामुळें त्यांचा हा सन्मान झाला. अमेरिकन परराष्ट्र वकिलांनीं जेव्हां त्यांच्याशीं हस्तांदोलन केलें तेव्हां ते म्हणाले : "केवढी थोर कामगिरी तुम्हीं पत्करली याची तुम्हांला कदाचित् आतां यथातथ्य कल्पना आली असेल!"

वरील प्रसंग १९४६ सालचा. त्यानंतरच्या ९ वर्षांत या माता-बालक मंदिरांत चार हजार नवीन मुलांना जन्म लाभला. या ठिकाणीं एका वेळीं फक्त अठरा बाळंतिणींची सोय होती. 'क्ष' किरणांची तजवीज नाहीं मग रेस्पिरेटरची गोष्ट कशाला? त्या रुग्णालयाला जागा तरी कसली? मोडकळीस आलेला एक स्टूडिओ होता. त्याची बाईनींच आपल्या हातांनीं

[illegible] केली होती. वातावरण तरी कसलें ? एका बाजूला खाटिकखाना [illegible]भोंवतीं गलिच्छ वस्ती ! आणि असें असूनसुद्धां एक नमुनेदार [illegible]ाता-बालक मंदिर चालविण्याबद्दल साऱ्या चिलीच्या आरोग्य खात्यानें त्यांचा सन्मान केला. चिली देशांतील बालमृत्यूचें प्रमाण भयानक, जवळजवळ २१ टक्के ! पण माद्रेहिजो माता बालक मंदिरांत ते २ टक्क्यांवर कधींच गेलें नाहीं. १९५३ सालीं तें १$\frac{1}{4}$ टक्काच होतें. चिलींतील गर्भार मातांच्या मृत्यूचें प्रमाण ३ टक्के आहे. पण माद्रेहिजो रुग्णालयांत तें जवळ जवळ शून्यावर आलें आहे. मेरी शूल्टझबाईनीं १२ हजार बाळंतपणें केलीं, त्यांपैकीं फक्त पांचच माता दगावल्या. पण त्या साऱ्यांना हृदयविकार जडला होता ! दक्षिण अमेरिकेंतील इतर सर्व देशांप्रमाणें चिली देशांतहि क्षय व मेनेंजाइटिसचा प्रादुर्भाव मुलांमध्यें फार झाला आहे, परंतु या गांवीं फक्त तीनच वर्षीं त्यांची धाड आली !

डॉ. ग्रीनफील्ड या संशोधक बाईनीं बालचिकित्सेंत आंतर राष्ट्रीय कीर्ति संपादिली आहे. यूरोप व लॅटिन अमेरिकेमध्यें जननाच्या आंकडेवारीचें खूप संशोधन त्यांनीं केलें आहे. त्यांचें असें मत आहे कीं, सरळ व गुंतागुंतीच्या सर्व बाळंतपणांचा विचार केला तरी बऱ्याच प्रसंगीं संमोहनक्रियेची आवश्यकताच असत नाहीं व म्हणून या छोटेखानी रुग्णालयाचा क्रमांक यशस्वी बाळंतपणांच्या दृष्टीनें जगांत पहिला लागेल !

मेरी शूल्टझ यांचा जन्म अमेरिकेंत बाल्टिमोर येथें झाला. त्यांचे वडील जर्मन व माता आयरिश. त्यांचें बालपण नितांत ख्रिस्ती धर्मभक्तीच्या वातावरणांत गेलें. अकालीं आर्थिक बोजा शिरावर पडल्यामुळें त्या तरुणपणीं दिवसा काम करीत व रात्रीं शिकत. त्यांचें वैद्यकीय शिक्षण न्यू जर्सीच्या प्रेस्बिटेरियन इस्पितळांत झालें व न्यूयॉर्कच्या कोलंबिया युनिव्हर्सिटींत त्यांनीं पदवी संपादली. १९२७ सालीं प्रेस्बिटेरियन मिशनच्या नजरेस असें आलें कीं, चिली देशांत बाल व मातांचा अपमृत्यु फार वाढला आहे. सँटिआगो येथें बोर्डानें दोनच वर्षांपूर्वीं गलिच्छ वस्तींत जें माताबालक मंदिर खोललें होतें तिकडे मेरीची रवानगी झाली. मेरीचें वय या वेळीं तिशीच्या आसपास होतें. त्यांनीं जेव्हां आपली निवासाची व रुग्णालयाची जागा पाहिली तेव्हां त्यांच्या छातींत धडकीच भरली !

कत्तलखान्याच्या दुर्गंधींत हें एकाकी रुग्णालय होतें. या स्टु
जागेंत ना गॅस ना इलेक्ट्रिसिटी ! रुग्णालयांत एकूण ६ खुर्च्या; ६ टेब
६ खाटा होत्या. शस्त्रक्रियेची एक छोटीशी पेटी होती. स्टूडिओपासून
रुग्णालयांत चिखलांतून जावें लागे व त्यासाठीं लांकडी बूट वापरावे लागत.

फक्त ५० डॉलर म्हणजे सुमारें १५० रुपयांत हें हॉस्पिटल तिला चालवावें लागत होतें ! एका स्थानिक बिगारणीच्या साहाय्यानें तिला प्रथम पडझड दुरुस्त करून घ्यावी लागली. मासे उकडण्याच्या किटलीचें रूपांतर तिनें स्टरिलायझरमध्यें केलें. त्यांत शस्त्रक्रियेचीं हत्यारें उकळलीं जात. कोळशावर पेटणारी एक लोखंडी भट्टी गंजून पडली होती. ती थोडी दुरुस्त करून तिचा उपयोग कपडे उकळून काढण्यासाठीं करतां आला. इतकी सगळी तयारी केल्यानंतर खरी अडचण उद्भवली ती बाळंतपणासाठीं स्त्रिया रुग्णालयांत येण्याची ! तेथें स्पॅनिश भाषा लोक बोलत. ती थोडी शिकून तिनें घरोघर गर्भार स्त्रियांना भेटून त्यांनीं बाळंतपणासाठीं माता-बालक मंदिरांत यावें, अशी विनवणी करण्यास सुरुवात केली.

रुग्णालयाचें ‘ दिव्य ’ स्वरूप पाहून शेतकऱ्यांना या रुग्णालयाकडे यावेसें वाटत नसे. घरांतील एका साध्या चटईवर आपलें बाळंतपण स्त्रिया उरकून घेत असतांना माता-बालक मंदिरांत कशासाठीं यावें, हेंच त्यांना उमजत नसे ! पण शूल्टझ बाईच्या शब्दांनीं जें काम होऊं शकलें नाहीं तें तिच्या शुश्रूषा तत्परतेनें व मायाळूपणानें हळूहळू साध्य होऊं लागलें.

पहिल्या वर्षीं शूल्टझबाईच्या माद्रेहिजोमध्यें ६८ स्त्रिया दाखल झाल्या. प्रत्येक बाळंतपण बाईनीं जातीनें केलें. कांहीं प्रसंग फार गुंतागुंतीचे असल्यामुळें ती कित्येक वेळां अगदीं गांगरून जाई. पण ईश्वरावर निष्ठा ठेवून ती सगळें रेटून नेऊं लागली व स्त्रिया सुखरूपपणें मुक्त होऊं लागल्या.

जसजशा जास्त स्त्रिया दाखल होऊं लागल्या, त्या प्रमाणांत मदतनिसांची संख्या वाढवावी लागली. पांच डॉलर फी आकारण्यास सुरुवात झाली. आज शूल्टझबाईच्या हाताखालीं ऑब्स्टेट्रिशियन, पेडिॲट्रिशियन, दंततज्ञ, तीन मिडवाइव्हज्, सहा नर्सेस, बायबल शिक्षक व एक होमव्हिजिटर इतकीं माणसें काम करीत आहेत. प्री नेटल-जननपूर्व-चिकित्सेपासून तों जन्मलेल्या बालकाची सहा वर्षें पूर्ण होईतों जोपासना करण्याची कामगिरी शूल्टझबाई

... आहेत. सुमारें ८०० स्त्रिया दरवर्षीं माता-बालक मंदिराचा फायदा ... आहेत व सुमारें ६५० बालकें त्यांच्याकडे दरसाल जन्मत आहेत. सहा वर्षेपर्यंत मुलांचें आरोग्यरक्षण फक्त १४ डॉलरमध्यें होत असतें !

सहा वर्षें मुलांना आपल्या देखरेखीखालीं ठेवण्याची प्रवृत्ति मातांमध्यें उत्पन्न व्हावी म्हणून शूल्टझबाईनीं एक बक्षिस जाहीर केलें होतें. सहा वर्षांनंतर सोन्याच्या अक्षरांत एक प्रमाणपत्र मातांना देऊं केलें. याचा इतका सुपरिणाम घडून आला कीं, अशा तऱ्हेचीं १३०० मुलें माद्रेहिजो रुग्णालयांतल्या या संगोपनपद्धतींत सामील झालीं. चिली देशांतील एका व्यक्तीच्या देखरेखी-खालील बाल संगोपनाचा हा उच्चांक होय ! या मुलांची फक्त शरीरप्रकृतीच सुधारली असें नव्हे तर पुढील वयांत शाळा-कॉलेजांतील अभ्यासांतील शिष्यवृत्त्याहि त्यांनीं पटकावल्या.

शूल्टझबाईंचा दैनंदिन कार्यक्रम सामान्यतः पहांटे चार वाजतां सुरू होतो. पहिल्या फेरींत प्रसूतिपूर्व चिकित्सा, प्रसूतांवर देखरेख; शस्त्रक्रिया, बाल-संगोपन-चिकित्सा, आहारयोजना, हॉस्पिटल इन्स्पेक्शन, हाताखालील नोकरांशीं चर्चा इतक्या, गोष्टी आठ वाजेपर्यंत त्या उरकून टाकतात. ८ ते ११ हे त्यांचे विश्रांतीचे तास, असें त्या म्हणतात. पण या वेळांत आपली हिशेब-पाहणी व सारापत्र व्यवहार आटोपतात. रोजचीं इतकीं कसोशीचीं कामें असलीं तरी शिवाय त्या कांहीं नवे उद्योग अंगीकारितातच. एखादें दोनच पौंड वजनाचें मूल जन्मलें तर त्यावर खास देखरेख ठेवली पाहिजे, असें त्या सांगत व तें काम आपल्या शिरावर घेत. दर तीन तासांनीं त्या बालकास पिऊं घालावें लागे. अशा तऱ्हेचीं अकालीं जन्मलेलीं कित्येक मुलें त्यांना पाळावीं लागत.

चिली देशांत प्रसूति व बाल-संगोपनाच्या कार्याचा प्रारंभ शूल्टझबाईनींच केला. सरकारी वैद्यकीय खात्यानें त्यांचा शिक्षण कार्यासाठीं उपयोग करून घेण्याचें ठरविलें. तेथें एक नर्सिंग स्कूल स्थापिलें व त्याच्या प्रात्यक्षिक शिक्षणासाठीं प्राध्यापक म्हणून त्यांचीच नेमणूक केली. त्या शाळेचा आतां वेगवेगळ्या शाळांच्या रूपानें विस्तार झाला आहे व आंतर राष्ट्रीय अमेरिकन संस्थेकडून एतद्विषयक तंत्रज्ञ व इतर साहाय्य मिळूं लागलें आहे.


चिलीमध्यें स्त्रियांचे संघ त्यांच्या पुरस्कारानें निघाले असून त्यां सुप्रजानन-शास्त्राची शास्त्रीय माहिती व मुलांचा आहार व देखभाल ये विषयींचें शिक्षण देण्याची सोय झाली आहे. स्त्रियांप्रमाणें पुरुषांसाठींहि बाल-संगोपनाचे शिक्षणवर्ग काढले आहेत !

माद्रेहिजो संस्थेच्या कार्यांत त्यांना अगदीं प्रारंभापासून सर्व तऱ्हेच्या हालअपेष्टांतून जावें लागलें आहे. रुग्णालयांतील असलें नसलेलें सर्व फर्निचर, कॉटस् यासुद्धां नाहींसें झालें होतें; पण शूल्टझबाईंचा ईश्वरी आधारावर जबर विश्वास होता व आपल्या हांकेस तो अखेर 'ओ' दिल्याखेरीज राहणार नाहीं असें त्या श्रद्धापूर्वक म्हणत.

सँटिआगो भागांत एकदां भूकंप झाला. एका अपरिचित व्यक्तीनें त्यांना अडीचशें डॉलरचा चेक पाठवला. पण भूकंपाच्या धक्क्याचा दुष्परिणाम माद्रेहिजोवर कांहींच झाला नव्हता, म्हणून त्यांनीं तो चेक त्या व्यक्तीकडे परत पाठवला. मात्र यांनीं असा खुलासा केला कीं, रुग्णालयाला साहित्य-पुरवठ्याची अतिशय जरूर आहे व त्यासाठीं ही मदत मिळाली तर आम्ही आनंदानें स्वीकारूं. शूल्टझबाईंकडे चेक परत आला व तो पांचशें डॉलर्सचा होता !

अशा शैक्षणिक संस्था कार्यास व्यक्तिमाहात्म्य बाधूं न देण्याची खबरदारी घ्यावी लागते. अशा संस्थेंतून सेवकांचे गट तयार करून त्यांच्यावर कार्याची जबाबदारी शक्य तितक्या लवकर सोंपवणें अगत्याचें असतें, ही गोष्ट शूल्टझबाईंनीं साध्य केली आहे. रोझॅलिया सॅल्हेद्रा या बाई शूल्टझबाईंच्या हाताखालीं बरींच वर्षें तयार झाल्या आहेत. गतवर्षींच माद्रेहिजो रुग्णालयाची सारी व्यवस्था नव्या मंडळींच्या सुपूर्द करून शूल्टझबाई अमेरिकेंत परतल्या आहेत. रुग्णालयाच्या तांत्रिक बाबतींत अद्ययावत् माहिती त्या सध्यां संपादन करीत आहेत. त्या पुन्हा कोठें तरी लॅटिन अमेरिकेंत सेवेसाठीं जातील अशी शक्यता आहे.

* * *



# परदेशप्रवास

- रोम
- जिनीव्हा
- म्यूनिक
- बर्लिन
- हेलसिंकी
- लंडन
- इस्राएल

२८ मार्च १९५४ रोजीं 'मराठा प्रिन्सेस' या विमानानें भाऊसाहेबांनीं रोमकडे प्रयाण केलें. त्यानंतर युरोप आणि मध्य आशियामधील कांहीं राष्ट्रांत फिरून त्यांनीं तेथील जीवन जवळून पाहिलें आणि 'साधना' साप्ताहिकांतून २९ पत्रें लिहिलीं. त्या पत्रांतील हा कांहीं निवडक संकलित भाग.

# परदेशप्रवास

## रोम :

रोमच्या आर्ट गॅलरीचें वर्णन काय करावें ? ‘ There is no city in the world like Rome. रोमसारखें शहर जगांत नाहीं, ’ असें गटेनें म्हटलें असल्याचें स्मरतें. मोझेईक आर्ट, रॅफेल व मायकेल अँजेलो यांनीं चित्रकलेंत व शिल्पकलेंत आणलेल्या वास्तववादी स्वरूपाचे बहारीचे नमुने आणि अलीकडल्या काळांतील बर्निनी यांच्या कलाकृति यांनीं रोमची आर्ट गॅलरी नटलेली आहे. मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमच्या चित्रांचा यापुढें काय पाड !

जगांत अन्यत्र कोठें नसेल असें दृश्य एके ठिकाणीं पाहिलें. चार हजार मानवी सांगाडे एकत्र करून त्यांतून भिंतींची सजावट केली आहे ! शंकराच्या रुंडमाळांची आपणास कल्पना आहे, पण हे चित्रकार शंकराचे खरे उपासक म्हटले पाहिजेत. सांगाड्यांच्या वेगवेगळ्या भागांनीं भिंती सजवल्या आहेत. सांगाड्यांचे हे अवशेष आहेत, असें सांगितल्यावांचून कल्पना येणार नाहीं. फ्रेंच राज्यक्रान्तीच्या वेळीं तेथील चित्रकारांनीं रोमचा आश्रय घेतला. त्यांची ही कर्तबगारी असें वाटाड्यानें सांगितलें.

बायरननें चाइल्ड हॅरोल्डमध्यें जागोजाग वर्णन केलेल्या अनेक गोष्टींचें रोममध्यें प्रत्यक्ष दर्शन होतें. जॅनिक्युलमच्या टेकडीवरून सबंध रोम शहराचें दर्शन साकल्यानें होऊं शकतें.

## जिनीव्हा :

इटलींतील सामान्य लोकांच्या प्रवृत्तींत आणि जिनीव्हा येथील लोकांच्या प्रवृत्तींत, विशेषत: परक्यांशीं वागतांना मला फारच फरक आढळून आला.

जिनीव्हाच्या पोस्टांत तिकिटें व्यावयास गेलों. माझीं सात-आठ पत्रें त्यांच्यापुढें ठेवलीं. तीन-चार हिंदुस्थानचीं, एक म्यूनिकचें, एक फ्रान्सचें आणि दोन झ्यूरिकचीं. हीं सारीं तिकिटें त्यांनीं दिलीं व आपणच व्यवस्थितपणें तीं योग्य पत्रांना लावलीं. हिंदुस्थानांतल्या कोणत्याहि पोस्टांत कधींहि मला हा अनुभव आलेला नाहीं. जिनीव्हांत जिकडे जावें तिकडे लहान मोठे सारे नोकर जनतेला मदत करण्याला अत्यंत तत्पर असतात.

जिनीव्हामध्यें I. L. O. (आंतरराष्ट्रीय मजूर संघटना) ची एक प्रचंड इमारत आहे. राष्ट्राराष्ट्रांतील लोकांच्या देणगीमधून इमारतीचे वेगवेगळे भाग बांधून झाले आहेत. कचेरींत सुमारें एक हजार लोक काम करीत असतात. हॉलमधून राष्ट्राराष्ट्रांनीं आपलें वैशिष्ट्य दाखविणारीं चित्रें काढलीं आहेत. जिनीव्हाला यूनोची एक प्रेक्षणीय इमारत आहे. आंतर राष्ट्रीय संघटनांना स्वित्झर्लंडमध्यें विशेष स्थान असावें हें साहजिकच आहे. कारण सबंध युरोपमध्यें रणकुंड पेटलें असतां फक्त स्वित्झर्लंडला तटस्थता राखतां आली होती.

स्वित्झर्लंडमध्यें १५ वर्षेंपर्यंतच्या सर्व मुलांना सक्तीचें मोफत शिक्षण देण्यांत येतें. लहानमोठीं अशीं सात विश्वविद्यालयें आहेत. एवढ्या लहानशा शहरांत जागतिक कीर्तीचे प्राध्यापक आहेत असें ऐकलें. विशेषत: डोळ्यांच्या शस्त्रक्रियेची फारच ख्याति आहे.

जिनीव्हाच्या यूथ मुव्हमेंटच्या सेक्रेटरींना भेटलों. त्या तरुण बाई आहेत. संघटनेच्या त्या क्रियाशील सभासद आहेत. सुटींत मुलांना महिनाभर कँपिंगला घेऊन जातात. कँपचा रोजचा खर्च भागविण्यासाठीं त्यांना लोकांकडून देणग्या मिळवाव्या लागतात. पंधरा वर्षांपुढील मुलां-मुलींना कँपमध्यें अगर सुट्टीच्या दिवशीं एकत्र करण्याची त्यांची कांहींच योजना नाहीं. मग मी म्हणालों, 'ही यूथ मुव्हमेंट कशी काय?' तेव्हां ती म्हणाली, 'आमचे क्रियाशील सभासद आहेत ते तरुण आहेत.' संघटनेच्या चिटणीस दोन

अनुक्रम ३२०९९ वि. ...
क्रमांक ...... नों दि. ......

...शे. या बाई अर्धवेळ सेवक असून त्यांना मासिक मेहनताना २५० ...क मिळतो व सर्व वेळ काम करणाऱ्या दुसऱ्या बाईंना ५०० फ्रँक मिळतात. दरमहा ५ ते १० फ्रँक देणारे ४–५ हजार सभासद त्यांना जिनीव्हामध्यें मिळूं शकतात.

मधु लिमयांनीं स्विस समाजवादी पक्षाच्या चिटणिसांना ओळखीचें पत्र दिलें होतें. त्यांच्याकडून बरीच माहिती मिळाली. स्विस नॅशनल कौन्सिलमध्यें १८० सभासद होते. त्यापैकीं ४९ समाजवादी होते. सरकार रॅडिकल व कॅथॉलिक पक्षाचें होतें. आर्थिक प्रश्नांवर पुष्कळ वेळां समाजवाद्यांना पेझंट पार्टीचा पाठिंबा मिळतो. घटनेप्रमाणें महत्त्वाच्या प्रश्नांवर जनतेचें सार्वमत घ्यावें लागतें. अशा प्रसंगीं समाजवादी पक्षाला ४–५ प्रश्नांवर बहुमत मिळालें होतें.

स्वित्झर्लंडची लोकसंख्या ४२ लाख आहे. स्त्रियांना मतदानाचा हक्क नाहीं. स्त्रियांना मत मिळावें म्हणून पार्लमेंटनें त्रिवार ठराव केला. पण तीनहि वेळां सार्वमतानें हा ठराव फेंटाळून लावला! अर्थात सार्वमतांत स्त्रियांना मतदानाचा अधिकार नव्हता!! साधारतः २१ वर्षांवरील लोक २५ लाख धरले, तर त्यांपैकीं स्त्रिया निम्या असणार म्हणजे मतदार १२ लाख असावेत. त्यांपैकीं सुमारें ८–९ लाख लोकांनीं मतदान केलें असल्यास समाजवादी पक्षाला मिळालेलीं २ लक्ष ६१ हजार मतें तरी होतीं असें म्हटलें पाहिजे. पक्षाचे एकूण ५४ हजार सभासद आहेत. स्त्रियांना मतदानाचा हक्क नाहीं, यासंबंधीं मी बहुतेक लोकांकडे नापसंती व्यक्त केली. मतदानाचा हक्क मिळत नसेल, तर स्त्रीनें आपला नवरा, भाऊ, कुणाशींहि सहकार्य करूं नयें असें मी आग्रहपूर्वक सांगितलें.

स्वित्झर्लंडमध्यें २२ कँटन्सचे (राज्यें) मिळून ४४ सभासद आहेत. ते वरिष्ठ सभागृहांत बसतात. सर्व कायदे दोन्हीं सभागृहांतून पास व्हावे लागतात. इंग्लंडप्रमाणें नाहीं. ट्रेड युनियन्सचे ४ लाख सभासद आहेत. ते बहुशः समाजवादी पक्षाशीं सहकार्य करतात. येथें चर्चच्या मालकीच्या जमिनी खूपच आहेत. या प्रश्नांवर झगडण्यासाठीं पेझंटस् पार्टी मुख्यतः निर्माण झाली आहे. समाजवादी पक्षाच्या सभासदांना दोन तऱ्हेची वर्गणी भरावी लागते: मध्यवर्ती समितीसाठीं दरमहा ४० सेंटस् व स्थानिक

कार्यासाठीं एक फ्रँक. पक्षाच्या ५४ हजार सभासदांपैकीं ४ हजार स्त्रिया आहेत. या स्त्री-सभासदांच्या घरचे पुरुष आणि पुरुष सभासद तरी स्त्रियांना मतदानाचा हक्क द्यावा असें मानतात का म्हणून विचारलें, तर त्यांना हो म्हणतां येईना! ही आश्चर्याची गोष्ट आहे. हे सभासद समाजवादी वातावरण कसें काय निर्माण करणार?

## म्यूनिक :

युनेस्कोच्या यूथ इन्स्टिटयूट या संस्थेची येथें सुमारें सात आठ एकर जमीन आहे. त्यावर एक टुमदार दुमजली इमारत आहे. इन्स्टिटयूटचे संचालक पीटर मोझेर यांनीं कांहीं भाडें न घेतां वर्क कँपला पंधरा दिवसांसाठीं जागा वापरूं दिलेली आहे. यूनेस्कोची Co-ordination Committee for International Voluntary Work Camp या नांवाची एक कमिटी आहे. त्याचे कार्यकारी चिटणीस हॅन्स मुलर हे आपल्या भाषेंत सांगायचे झाल्यास शिबिराधिपति आहेत.

या कँपचें पूर्ण नांव Joint Study Course for Camp Leaders असें आहे. पहिल्याच दिवशीं कँपच्या कामासाठीं बऱ्याच कमिट्यांची निवडणूक झाली. नंतर ओळखीचा कार्यक्रम झाला. ओळख कोणत्या रीतीनें करून द्यावी यासंबंधीं सुमारें अर्धा तास चर्चा चालावी हा प्रकार मला कांहीं समजेचना! मी म्हणालों, 'ज्याची त्यानें ओळख करून द्यावी. संकोच बाळगण्याची आवश्यकता कां वाटावी?' लोकांना ही कल्पना पटली नाहीं. आणि एकमेकांची ओळख करून घेण्यास तीन-चार गट पाडण्यांत आले. हा सारा फार्स कशाला?

सकाळीं सहा वाजतां उठण्याची वेळ आहे. जाग येण्यासाठीं एखादें गाणें म्हणण्यांत यावें ही माझी सूचना मान्य झाली. एका दुपारच्या कार्यक्रमांत मुलांसाठीं भूगोलाचा तास घेण्याची योजना होती. एका शाळेंत सुमारें तीनशें मुलें व पालक जमले होते. आम्ही कोणत्या वेगवेगळ्या देशांतून आलों तें नकाशाद्वारां दाखविलेंच, पण प्रत्येक देशानें आपलें वैशिष्ट्य भाषण, गाणें, अभिनय, नृत्य वगैरे प्रकारांनीं दाखविण्याची योजना होती.

प्रत्येक देशांतील नागरिकानें शक्यतों आपल्या पेहरावांत यावें, अशी अपेक्षां होती. सर्वजण नको म्हणत असतांनासुद्धां मी माझें धोतर बरोबर आणलें होतें, याचें मला फार समाधान वाटलें. धोतर, अर्ध्या बाहीचा शर्ट व खादी टोपी, या पोषाखांत मी उभा राहिलों. एक एक वाक्य उच्चारीत मी भाषण केलें. एक गृहस्थ त्याचें भाषान्तर जर्मनमध्यें सांगत होता. कार्यक्रम संपल्यावर साहजिकच मुलें-मुली आमच्या भोंवतीं गोळा झालीं. बारा-तेरा वर्षांच्या एका मुलीनें मला विचारलें, "तुम्हांला मुलें आहेत का ?" मी नेहमींच्या पद्धतीप्रमाणें म्हांणालों, "मी लग्न केलें नाहीं, मला मुलें नाहींत, पण तुम्हीं सारीं माझीं मुलेंच नव्हेत का ?" असें म्हणतांच कांहीं चेहऱ्यांवर हास्य, आश्चर्य आणि होकार उमटले.

येथें आम्हांस राहावयास सुमारें २५'×२५' खोली आहे. त्यांत चौघे चौघे रहातात. माझ्या खोलींत एक जण जन्मानें रशियन पण आतां स्विडीश, दुसरा जर्मन व तिसरा सध्यां लंडनमध्यें अभ्यास करणारा गोल्ड कोस्टचा विद्यार्थी आहे. पहिल्याचें आयुष्य बरेंच विविध स्वरूपाचें आहे. मध्यंतरी कांहीं काल शिक्षण सोडून त्याला उद्योग-धंदा करावा लागला. आतां कांहीं वेळ विद्यार्जन व कांहीं वेळ द्रव्यार्जन. दुसरा जो जर्मन विद्यार्थी आहे तो खोलींत कधीं नसतोच. ( माझ्या अगदीं उलट. ) त्यानें आतांपर्यंत सात-आठ शिबिरांत भाग घेतला आहे. सकाळीं वेळ सहाची. नास्ता सात वाजतां सुरू होतो म्हणून नाइलाजानें तो आंथरुणांतून पांच मिनिटें अगोदर उठतो. मी पांच वाजतां उठत असल्यानें माझें उठणें बाकीच्यांना तापदायक होतें याचा मला खेद होतो. ज्या दिवशीं बर्फ पडलें, त्या दिवशीं गोल्ड कोस्टच्या मित्रानें साताच्या सुमारास खोलीचा पडदा बाजूस सारून बाहेर पडण्यास सांगितलें. बाहेर पहातों तों काय बर्फ पडलेलें ! चिरोट्यांवर जशी साखर पेरावी ( नरसोपंतांच्या वर्णनाची आठवण झाली ) तशी झाडांच्या तुऱ्यावर साखर पेरल्यासारखी दिसत होती. मी तें दृश्य पाहून बेभान होऊन मोठ्यानें बोललों व निद्रावश झालेल्या आमच्या मित्राचा निद्राभंग झाला, त्याबद्दल त्याची माफी मागितली. इकडे माफी मागणें औपचारिक झालें आहे. आम्ही बर्फांत जाऊन नाचलों. बर्फाचे गोळे करून फेकले.

युनेस्कोच्या श्रमशिबिरांत कांहीं चांगलें विचार ऐकायला मिळाले.

पहिलें उल्लेखनीय व्याख्यान मॅक्स मोसेर यांचें. ते व्यापारी असले तरी तरुणांच्या संघटनांशीं त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. लोकशाहींतील नेतृत्वासंबंधीं ते म्हणाले, " Group thinking may be a slow process, but dictatorship is a high power motorcar without brakes. " ते सामान्य नेत्यासंबंधीं बोलत होते, " लोकशाही वातावरणांत ज्याला नेतृत्व करायचें असतें तो स्वतःच निर्णय घेत नाहीं. निर्णय मिळविण्यास मदत करतों. या पद्धतींत वेळ फार लागत असला तरी ती सर्वंकष हुकूमशाहीहून केव्हांहि श्रेष्ठ आहे. जनतेशीं चांगला संपर्क आल्याशिवाय तिला अगदींच अभिनव गोष्टी शिकवतां येणार नाहींत" असेंहि ते म्हणाले. गांधीजींसारखा द्रष्टा पुरुष आपल्या विशिष्ट तत्त्वज्ञानानें विजेचे धक्के दिल्यासारखे विचार मांडू शकतो हें माझें विधान त्यांनीं मान्य केलें.

दुसरे गृहस्थ प्रो. बंडी. हे हॅंबुर्ग येथें मानसशास्त्राचें शिक्षण देतात. ते ज्यू आहेत. जर्मनींतून ज्यूंचा छळ झाला त्या वेळीं दहा वर्षें ते अमेरिकेंतच होते. " आजचा तरुण हा निष्क्रिय व निराश बनत चालला आहे. झपाट्यानें बदलणाऱ्या या जगांत सर्वत्रच अनिश्चितता आहे. In a small group are problems of the whole world. अशा वेळीं प्रत्येक युवक गटाचा नेता संवेदनशील असला पाहिजे. " असा दृष्टिकोन त्यांनीं मांडला.

तिसरे गृहस्थ पीटर क्रेन्सलर. हे ब्रिस्टोलच्या युनिव्हर्सिटींत शिकवतात. आंतर राष्ट्रीय श्रमशिबिरांत भिन्नवर्णीय व भिन्न संस्कृतीचे लोक येत असल्यामुळें त्यांच्या अन्नविषयक संवयी व इतर गरजा यांचा विचार केला पाहिजे; मागसलेल्या देशांत जाणारे तरुण तंत्रदृष्ट्या कुशल असतील तर त्यांचा अधिक उपयोग होईल...इत्यादि विचार त्यांनीं मांडले. या ठिकाणीं मी अशी पुस्ती जोडली कीं आंतरराष्ट्रीय युवक प्रतिनिधींनीं संस्कृति व भाषिक दृष्ट्या सलगभागांत रहावें.

कॅंपमध्यें अनेक देशांतील लोक आले होते. त्यांच्या संगतींत पंधरा दिवस रहायला मिळाले, हा या कॅंपचा अतिशय मोठा फायदा. कोणामध्येंहि संकुचित दृष्टि आढळली नाहीं. सर्वांमध्यें आंतर राष्ट्रीय दृष्टिकोन प्राप्त करून घेण्याची प्रवृत्ति दिसून आली. रीतिरिवाजांतच कांहीं स्वभावभिन्नता अंतर्भूत

.ता; त्याला इलाज नव्हता. म्यूनिकमधली बडी मंडळी एक दिवस येथें बोलावली होती. त्यापैकीं एक वृत्तपत्रकार थोडे आधींच आले. त्यांनीं माझा तपास करून माझी भेट घेतली. मी द्रव्यार्जन केलेलें नाहीं या गोष्टीचें त्यांना मोठें कौतुक वाटलें. माझ्या मित्रांनीं माझ्या प्रवासासाठीं इतके पैसे जमवावे याचें तर त्यांना फार समाधान वाटलें. माझ्याशीं बोलणें संपण्याच्या सुमारास आमच्या कँपमधील युवतीस ते म्हणाले, " या गृहस्थानें पैसा कधींच मिळविला नाहीं. " तेव्हां तिनें मला विचारलें, " मग तुमचें घर वगैरे कुठें आहे ? " मी म्हटलें, " माझें घर नाहीं. पण माझ्या अनेक मित्रांचीं घरें माझींच आहेत. ' ती ताबडतोब म्हणाली, " मग तुमच्या अनेक घरांत कैरोंतील माझें घर तुमचेंच माना ! " या तिच्या सहृदयतेबद्दल मला फार आनंद झाला. पण अशीहि शंका मनांत येऊन गेली कीं हा कदाचित् संभाषणांतील हजरजबाबीपणा असेल. असा क्षुद्र विचार माझ्या मनांत आल्याबद्दल माझी मलाच लाज वाटली.

## बर्लिन :

आतां मी खूपच उत्तरेस आलों आहे. त्यामुळें येथें पहांटे तीन साडेतीन वाजतांच खिडकींतून प्रकाश येतो. दिसूं लागल्यानंतर झोंपण्याची जन्मांत कधींच संवय नाहीं. त्यामुळें तीन साडेतीन वाजतांच जाग येते. झोंपायची वेळ नेहमींच अकरा साडेअकराची त्यामुळें तीन-चार तासांनंतर झोप नाहीं, अशी अवस्था झाली आहे.

हॅनोव्हरमध्यें एक दिवस मुक्काम करण्याची माझी इच्छा होती. हॅनोव्हर येथें भलेंमोठें औद्योगिक प्रदर्शन भरलें आहे तें पहाण्यास गेलों. पोर्सलेनच्या विभागांत पांच मजले केले होते. तेथील वरच्या मजल्यावरून खालीं पाहिलें, तों चारी बाजूंना मोटारींची दाटीच दाटी ! मी मोटारी मोजण्याचा प्रयत्न केला. त्या पंधरा-वीस हजार तरी असाव्यात असा माझा अंदाज आहे. आज तर १९५४ साल आहे. १९४६ ते ४८ या वर्षांत अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स आणि रशिया यांनीं जर्मनींतून जें जें लुबाडण्यासारखें होतें तें तें सारें नेलें. पण या जर्मन बहाद्दुरांनीं दोन वर्षांत आपलें प्रदर्शन भरवून दाखविण्याची भरीव कामगिरी केली. अमेरिका त्यामुळें थक्क होऊन

गेली असें कळतें. ना मुलूख, ना खंडणी या घोषणेनें अमेरिका पहिल्या महायुद्धांत पडली. पण इंग्लंडनें अमेरिकेला खडे चारले. जर्मनीवर न भूतो न भविष्यति अशी खंडणी लादली. या खंडणीची फेड करण्यास जर्मनीनें इतकें उत्पादन केलें कीं या प्रचंड उत्पादनाचें प्रचंड संकट बड्या राष्ट्रांपुढें खडें झालें. औद्योगिक उत्पादन क्षेत्रांत असें राक्षसी सामर्थ्य ह्या जर्मन लोकांत आहे.

आतांपर्यंत भेटलेल्या जर्मन तरुणांशीं मी राजकारण बोलण्याचें टाळत होतों. जर्मनींतील सध्यांच्या युवकांचे मी तीन विभाग पाडूं शकेन : (१) हिटलरच्या संघटनेंन थोडे तयार झालेले म्हणजे १९४० सालीं सुमारें १५ ते २० वर्षांचे असावेत. यांत पुनः दोन भाग पडतील. हिटलरच्या युवक संघटनेशीं समरस झालेला एक भाग व समरस न झालेला पण नाइलाजानें भाग घेणारा दुसरा. यांपैकीं पहिला गट गेल्या दहा वर्षांतील घडामोडींकडे उदासीनतेनें पहात असेल का, असें मी एका तरुणाला चर्चेच्या वेळीं विचारलें. त्यावर तो म्हणाला, 'Politics spoils character.' (२) १९४५ सालीं जें दहा वर्षांचे होते त्यांचा दुसरा भाग पडेल. (३) १९४५ सालीं ज्यांचें वय पांच ते दहा वर्षांचें होतें त्यांच्यावर आज नव्यानेंच संस्कार होत आहेत.

जर्मनींतील सोशलिस्ट प्रवृत्तीवर कॅथॉलिक धर्माची छाप कां असावी, हाहि प्रश्न मी चर्चिला. बेताबेतानें ह्या धार्मिक विचारांचें दडदण कमी होईल, असा कांहीं तरुणांचा आशावाद आहे. आपल्या मनारूप आणि धोरणारूप तरुणांची विचारसरणी आपण घडवावी असा मुरब्बी मुत्सद्यांचा सदा प्रयत्न असतो. आम्हीं त्यांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत आहोंत, असें कांहीं तरुण मला म्हणाले. राजकीय प्रवृत्तींपासून जर्मन तरुणी अधिक विमुख आहे का ? या प्रश्नाला एका मुलीनें असें उत्तर दिलें कीं, सामान्यतः जर्मन मुलगी अधिक प्रपंचाभिमुख असते ही गोष्ट खरी आहे.

येथील युवक संघटनेंतील कांहीं तरुणांकडे पाहून मला असें वाटतें कीं, कांहीं जणांत निश्चितपणें व्यक्तिमत्त्वाची चांगलीच झांक दिसून येतें. सामान्यपणें मला हें मान्य केलें पाहिजे कीं, जर्मन मनाचें सध्यांच्या परिस्थितींत पृथःक्करण करणें अशक्य आहे. हॅनोव्हर येथें तरुणांच्या

संघटनांसाठीं एक मोठी तीन मजली इमारत आहे. सबंध जर्मनींत अशी इमारत नाहीं. जर्मन युवक संघटनेचा गाभा राजकारण नाहीं. विविध स्वरूपाच्या मनोरंजनांतून तरुणांना संघटित करण्याचा प्रयत्न दिसून येतो. ख्रिश्चन सोशॅलिस्ट, सोशल डेमॉक्रॅट्स, कॅथॉलिक, प्रॉटेस्टंट, इत्यादि युवक संघटनांतून मुलां-मुलींची संख्या समसमान असते. यूथ हॉस्टेल्स याच इमारतींत आहे. सर्व खोल्या तुडुंब भरलेल्या असतात. त्यांचें मोठें कँटिन आहे. तीनचारशें लोक बसूं शकतील एवढा असेंब्ली हॉल व त्याला जोडून स्टेज. हें पाहून मला साहजिक हेवा वाटला.

१ मे ह्या दिवशीं जो प्रचंड मेळावा भरतो तो पहाण्यासाठीं दोन जर्मन मित्रांबरोबर मी गेलों होतों. त्या दोघांजवळ प्रेसपास होतें. आम्हीं खूप पुढें घुसलों. अध्यक्ष ऑटो सव्ह यांनीं आपल्या भाषणांत ' मी सोव्हिएटचा द्वेष करतों ' असें सांगितलें. अनेक संघटना या कामगार-दिनांत सामील आल्या होत्या. कोणावरहि सक्ती नव्हती. नंतर आम्ही बर्लिनच्या पूर्व विभागांत गेलों. पहिलीच मिरवणूक मी जी पाहिली तींत चौदा-पंधरा वर्षांची मुलें-मुलीं भलेमोठे लाल झेंडे घेऊन चाललीं होतीं. जणुं कांहीं प्रेतयात्राच चालली आहे असे दुर्मुखलेले चेहरे. प्रत्येक घरावर झेंडेच झेंडे. ' We hate the West German Govt. ' अशा घोषणा वक्ते देत होते. 'For Unity and Peace' अशा जिकडे तिकडे पताका ! मार्क्स, लेनिन, स्टालिन, मॅलेन्कॉव्ह यांच्या चित्रांची मिरवणूक. फक्त उत्साहाचा तेवढा प्रकर्षानें अभाव.

हिटलरच्या राहात्या घराच्या राखेचा ढिगारा तसाच पडलेला आहे ! अशीं दृश्यें कायम ठेवून सोव्हिएट राज्यकर्ते काय पुण्याई संचित करीत असतील तें त्यांनाच माहीत. इकडील प्रत्येक कामगाराला आपापल्या जथ्याच्या मिरवणुकींत सामील व्हावें लागतें. जबरदस्तीनें मित्रत्व व शांति प्रस्थापित करण्यांचा हा अजब शोध दिसतो ! सोव्हिएट पद्धति हितावह आहे असें त्यांना सिद्ध करायचें असेल, तर पूर्व विभागांतील राज्य-व्यवस्था प्रत्येक बाबतींत पश्चिम विभागापेक्षां अधिक सरस आहे, असें त्यांना दाखवितां आलें पाहिजे. दिसतो तो प्रकार अगदीं उलट. एकहि जर्मन पश्चिम विभागांतून पूर्व विभागांत स्थायिक होण्यासाठीं गेल्याचें

उदाहरण नाहीं. उलट पूर्व भागांतून पश्चिमेकडे अनेक जर्मन लोक असल्यामुळें निर्वासितांचा प्रश्न सोडविणें महा कठीण होऊन बसलें आहे.

## हेलसिंकी :

हेलसिंकी बंदरावर बोट पोंचली. बाहेर पडल्यावर गौटींग कँपमधील मुलगी लिआ मला भेटली. लिआला इंग्रजी चांगलें येत होते. त्यामुळें भाषेची अडचण भासली नाहीं. आम्ही जिच्या घरीं उतरलों होतों तिचें नांव Anja. इकडे J चा उच्चार 'य' असा करतात, म्हणजे तिचें नांव अन्या. अन्या व लिआ यांच्याबरोबर प्रथम ऑलिंपिक स्टेडियम पहायला गेलों. या स्टेडियमला चौवीस मजली उंच टॉवर आहे! इकडील स्टेडियमचा नमुना साधारण ठरल्यासारखा असतो. ऑलिम्पिक गेम्सचा हा स्टेडियम, पण युद्धाच्या खाईत कित्येक वर्षें येथें ऑलिम्पिक गेम्स झाले नाहींत. १९५२ सालीं या स्टेडियममध्यें सामने झाले. टीम–गेम्सपेक्षां वैयक्तिक स्पर्धेंत, पळण्यांत वगैरे फिनिश लोकांनीं आतां पावेतों नांव गाजवलें आहे.

येथील सोशल सायन्स खात्याचा चिटणीसांशीं माझी ओळख झाली. त्यांच्या खोलींत फिन्लंडचा मोठा नकाशा टांगलेला होता. तो ऐतिहासिक नकाशा होता. गेल्या चाळीस पन्नास वर्षांतील राजकीय घडामोडींमुळें फरक झालेल्या सरहद्दी त्या नकाशांत दाखविल्या होता. विशेषतः हेलसिंकीच्या पश्चिमेस अवघ्या वीस मैलांवर २५–३० मैल लांब व १५ मैल रुंदीचा टापू हा 'फॉरेन पॉकेट' आहे व तो अद्यापहि रशियाच्या मालकीचा आहे हें मला माहीत नव्हतें! फॉरेन पॉकेटच्या वेदना काय असतात हें आम्हांला गोमंतकावरून माहीत आहे. त्याचे चटके अजूनहि आम्हांला बसत आहेत.

दुसऱ्या दिवशीं पार्लमेंटांत गेलों. जुन्या सभागृहाचा उपयोग पुस्तकालयासाठीं होत असून अगदीं अद्ययावत् सुधारणांसह पार्लमेंटचें नवें सभागृह बांधलें आहे. फिनिश पार्लमेंटचें सभासद दोनशेंच आहेत. त्यामुळें सभागृह फार मोठें नाहीं. भिंति साऱ्या लिनन कॅन्वासच्या तक्तपोशीच्या आहेत. छत अशा रीतीनें आच्छादिलें आहे कीं प्रतिध्वनि होऊं नये. फिन्लंडमध्यें इंग्लंडप्रमाणें द्विपक्षीय पद्धति नाहीं. पार्लमेंटमध्यें एकूण सहा प्रमुख पक्ष

ाहेत, पण कुठल्याच पक्षाला हुकमी बहुमत नाहीं. एकूण २०० प्रतिनिधीं-र्कीं ३० स्त्रिया आहेत ! फिन्लंडच्या सोळा विभागांतून हे लोक निवडून आले आहेत. २४ लक्ष ८४ हजार लोकांना मतदानाचा अधिकार होता. पैकीं १७ लक्ष ७१ लोकांनीं मतें दिलीं. म्हणजे ७१ टक्के मतदान झालें. पार्लमेंट पाहून आम्ही पायऱ्या उतरत होतों. इतक्यांत एक गृहस्थ भेटले. मी हिंदुस्थानी म्हटल्यावर त्यांना अतिशय समाधान वाटलें. ते मला म्हणाले, " जगांतील कोणत्याहि पार्लमेंटला स्पोर्टस् क्लब जोडलेला नाहीं. पण हा पहा आमचा स्पोर्टस् क्लब ! " योगायोगानें तेथें ऑलिंपिक सामन्यांतील कांहीं चँपियन आले होते त्यांची ओळख झाली.

येथील ' सोशल म्युझियम ' पाहिला. या ठिकाणीं समाजसेवेचीं विविध अंगें पहावयास मिळालीं. प्रथम मी बाल-आरोग्य विभागांत गेलों. फिन्लंड-मधील प्रत्येक बाईला बाळंत होण्यापूर्वीं चार महिन्यांपासून सर्व तऱ्हेची मदत आरोग्य-केंद्रांतून मिळते. तिनें व्यायाम कोणते घ्यावे, बाळंतपणांत उपयोगी पडणाऱ्या वस्तूंची यादी, मुलांचा आहार यासंबंधीं पूर्ण माहिती तिला पुरविण्यांत येते. १६ मिलिमिटर प्रोजेक्टरचा या बाततींत विशेष उपयोग करून घेतात.

फिन्लंडमधील इंटर नॅशनल कॉलेजतर्फे मला दोन आठवडे रहाण्यासाठीं बोलावलें होतें. ही संस्था हेलिसिंकीपासून ४०–५० मैलांवरील व्हिटॅकिव्ही या गांवीं आहे. या संस्थेच्या चालकांवर क्वेकर पंथाचा विशेष पगडा आहे. क्वेकर पंथीयांनीं सुरुवातीसच आर्थिक जुलमाविरुद्ध बंड पुकारलें होतें. विसाव्या शतकांत शांततावादी आणि समाजसुधारक या नात्यानें त्यांचें कार्य मोठ्या प्रमाणांत चालू आहे. ' Light within ' वर त्यांचा जबर विश्वास असल्यामुळें महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्याचा त्यांनीं चांगला प्रयत्न केला आहे. आत्मनिरीक्षणाची कुवत असल्यामुळें त्यांचे कार्य स्थगित, कुजट वा खुरटें राहिलेलें नाहीं.

या संस्थेवर मुख्यतः क्वेकर्स चळवळीचे संस्कार झाले आहेत. क्वेकर्स हे युद्धविरोधी असतात. युरोपमध्यें त्यांनींच मुख्यतः ' वर्क कॅंप 'ची कल्पना प्रसृत केली. मनुष्यामनुष्यांतले संबंध सुधारावे, त्यांतून जागतिक बंधुभाव

निर्माण व्हावा, तरुणांमध्यें नव्या जगाच्या निर्मितीच्या ऊर्मी याव्या अ
संस्थेची इच्छा, धडपड आहे.

तेथूनच जवळ असलेल्या टँपेरी या शहरीं गेलों. टँपेरे शहरास फिन्लंडमधील मँचेस्टर म्हणतात. येथे ४०० कारखाने आहेत, पण फॅक्टरी टाउनची धूसरता नाहीं. हें शहर दोन सरोवरांच्यामध्यें वसलें आहे. हे दोन तलाव एका उंचीचे नाहींत. एक दुसऱ्यापेक्षां सुमारें अडीचशें फूट उंचीवर आहे. यामुळें या शहरांस विशेषच सौंदर्य लाभलें आहे.

येथून अर्ध्याच मैलावर रेडिओ स्टेशन आहे व जवळच एक दुमजली टॉवर बांधला आहे. सुमारें १०० फूट उंच असावा. त्यावर आम्ही लिफ्टनें गेलों. नवाचा सुमार झाला होता. नेमकी सूर्यास्ताची वेळ. द्वारका व कन्याकुमारी येथें हेतुपुरस्सर सूर्यास्ताच्या वेळीं जाऊन पोंचलों होतों. तें दृश्य माझ्या नजरेपुढें आलें. पण आज मी अचानक सूर्यास्ताच्या वेळीं आलों व टँपेरे शहरांतील अत्युच्च जागेवरून जें दृश्य पाहिलें तें कांहीं औरच होतें. त्याचा मला कधींच विसर पडणार नाहीं. मला वर्डस्वर्थच्या ओळी आठवल्या—

"They flash upon the inward eye
which is the bliss of solitude"

टँपेरे हें बेट नाहीं. परंतु जवळजवळ चारहि बाजूंना सरोवरें आहेत. तीं नव्वद मैलांपर्यंत पसरलीं आहेत. दूरदूर टेकड्यांच्या क्षितिजाआड सूर्य अंतर्धान पावत होता. पूर्ण गोल कमी असतांना प्रत्येक क्षणीं त्यांतील छटा बदलत होत्या. क्षितिजाआड स्नात होतां होतां त्यानें पूर्ण बुडी मारली. टेकड्यांच्या अलीकडे दोन्ही बाजूस गर्द झाडी आहे. मधूनच मानवानेर्मित रस्त्यांवरून एखादी मोटर भुर्रकन निघून जाई. तलावांची तर मोठी गंमतच आहे. समुद्राचा किनारा एकच रेषेंत लांबच लांब पसरलेला दिसतो. पण नाना वळणें घेणारी सरोवरांची वक्ररेषा विविधतेंत भर घालीत होती. टॉवरच्या अगदीं जवळचे वृक्ष मोठ्या ऐटीनें आपल्या माना उंचावीत होते.

बकिंगहॅमहून स्टॅफर्ड ऑन अॅव्हॉनला गेलों. या भागांतील निसर्ग-सौंदर्य सर्वश्रेष्ठ मानलें जातें.या वर्णनास शोभेशी शेक्सपिअरच्या स्मारकाची जागा आहे. खराच तेथून पाय निघेना. त्याच्या पुतळ्यामागील हिरवळीवर लोळत पडून त्याच्या कांहीं नाटकांचें पारायण करावें अशी तीव्र इच्छा होती. पण आज शुक्रवार होता. आज रात्रीं लंडनला जाऊन पोंहोंचणें भाग होतें. शनिवारीं दुपारीं एकच्या आंत लंडनमधील सारा व्यवहार बंद होतो. तेथें शेक्सपिअरचीं नाटकें चालू होतीं. साडेसात वाजतां ' ऑथेल्लो ' नाटक होतें. नाटक पाहून निघण्यास रात्रौ गाडी नाहीं म्हणून मी रेल्वेवर खूप चडफडलों. व्यथित अंतःकरणानें स्टॅफोर्ड ऑन अॅव्हान संध्याकाळीं सोडावें लागलें.

इकडे गाडींत सुदैवानें मला चांगली जागा मिळते—एक तर मी इंडियन असल्यामुळें माझ्या शेजारीं शक्यतों फॅशनेबल इंग्लिश बायका आणि पुरुष कशाला येऊन बसतील ? दुसरें म्हणजे नो स्मोकिंग कंपार्टमेंटमध्यें माझा मीच राजा ! गुबगुबीत गाद्यांची दोन बाकें असलेला छोटा कंपार्टमेंट माझ्या वांट्याला आला होता. डब्याबाहेरील दृश्य रमणीय होतें. सर्वत्र हिरवळ पसरली होती. वाचनाच्या मोहावर बाहेरील सौंदर्यानें मात केली होती. मी पहात राहिलों. निसर्गाची शोभा पाहूं लागलों कीं आपण साहजिकच गुणगुणूं लागतों. मी बेताबातानें गाण्याच्या रंगांत आलों. कोणाला ऐकूं जाऊन त्रास होण्याची भीतिच नव्हती, कारण डब्यांत मी एकटाच होतों. थोड्याच वेळांत मोठ्या आवाजांत मनसोक्त गाऊं लागलों. ' दे हातां ' व ' चंद्रिका ही जणूं ' हीं गाणीं सुमारें पंचवीस मिनिटें मीं आळवलीं असतील ! माणसाचें मन दशावधानी व सर्वत्र धावणारें असतें हें खरें, एकीकडे गात असतांनाच मला माझ्या लहानपणींच्या मित्राची आठवण झाली. गंगाधर ओगले ( बंगलोरच्या कारखान्याचे चालक शंकर ओगले यांचे बंधू ) हे माझे वर्गमित्र. त्यांना गाण्याचा फार नाद. गंधर्वांचें नाटक लागलें कीं महिन्या दोन महिन्यांत त्यांचीं सारीं गाणीं तोंडपाठ होत व मग ते मला म्हणून दाखवीत. दोन वर्षांपूर्वी वारले ! परवांच मुंबईस रामभाऊ रुईकर वारले. ते कोल्हापूरला शाळेंत माझ्या-

मागें एक वर्ष होते. बरोबरचीं हीं माणसें आतां जाऊं लागलीं. . .आप
एक दिवस. . .पण मी आज युरोपमध्यें भिरभिर हिंडत आहे !

येथील लोकांच्या कामांतील वक्तशीरपणा अत्यंत वाखाणण्याजोगा आहे. इंग्लिश मनुष्य सामान्यतः अबोल व गंभीर दिसतो. त्यांच्यामध्यें विशेष उत्साह–Exuberance–दिसणार नाहीं. अनोळखी माणसाच्या भेटींत तो आपली मान डाव्या बाजूस किंचित् झुकवील किंवा विशिष्ट प्रकारानें हंसेल; पण गालांवरील सुरकत्यांना धक्का लागणार नाहीं ! मेकॉलेनें विनोदाचें वर्णन करतांना ‘ a slight curl of the upper lip ’ असें लिहिल्याचें आठवतें. तें अगदीं यथार्थतेनें प्रत्ययास येतें.

या मुक्कामांत केंब्रिजला भेट दिली. केंब्रिजच्या कॉलेजपद्धति विलक्षण आहेत. तुम्ही कोणत्या कॉलेजमध्यें आहांत याला विशेष महत्त्व नाहीं. ज्या विषयाचें आपल्याला शिक्षण हवें असेल त्यासंबंधींची मदत दुसऱ्याच एखाद्या कॉलेजमधल्या शिक्षकांकडून मिळेल. कॉलेजची टर्म मोजावयाची ती रात्रींच्या ‘ डिनर्स ’वरून व तुम्ही झोपतां त्यावरून. रात्रीं भटकायला बिलकूल परवानगी मिळत नाहीं. किंग्ज् कॉलेज चॅपेल हें मला लंडनमधील प्रख्यात सेंट पॉल कॅथेड्रलपेक्षांहि अधिक आवडलें. तेथील शान्त वातावरण, गांभीर्य व उदात्तता याचा मनावर परिणाम झाल्याखेरीज रहात नाहीं. पंडितजींचें ट्रिनिटी कॉलेज पाहिलें. येथील आवार इतर कॉलेजच्या आवारापेक्षां अधिक प्रशस्त व प्रशान्त आहे. मुख्य कमानीवर गुलाबाच्या वेलांचा ताटवा कमानीस शोभा आणीत होता. केंब्रिजचें खरें वैभव कॉलेज ‘ बॅक्स ’मध्यें आहे. रम्य प्रशस्त हिरवळ, सुंदर वृक्ष व त्यांची भव्यता, निसर्ग व मानवकृत रम्यता यांचा सुंदर मिलाफ यामुळें शांतिनिकेतनपेक्षांहि हें ठिकाण मला अधिक रम्य व आल्हादकारक वाटलें. देवाजवळ लाडीक मागणी करावयाची तर या ठिकाणचें विद्यार्थीपण मागावें, असें मी म्हणेन. शिराजचें सौंदर्य पाहून कवि हाफिज यानें उद्गार काढलें, “ हाच तो स्वर्ग–हाच तो स्वर्ग ! ” त्याचप्रमाणें केंब्रिज हाच विद्यार्थी-स्वर्ग असें म्हणतां येईल.

तेथील युनियन सोसायटी डिबेट हॉल पाहिला. पार्लमेंट हाउसची ही लहानशी आवृत्ती आहे. प्रवेश करतांनाच Ayes आणि Noes हीं ठळक अक्षरें दिसतात. याच ठिकाणीं पिट्, बर्क, ग्लॅडस्टन वगैरेंनीं आपलें

अनुक्रम 32039 वि: 19
क्रमांक 9365 नों: दि: २५४६


त्व संपादून आणि यशाचा पाया खंबीर केला. केंब्रिजमध्यें फेलो ही स्था अतिशय महत्त्वाची आहे. आमच्या डेक्कन कॉलेजांतील फेलोची कल्पना ही या मानानें अगदीं दरिद्री आहे. केंब्रिजमधील कांहीं विद्वान लोक पंचवीस-तीस वर्षें फेलो म्हणून राहिले आहेत ! सुखानें रहावें व विद्यार्जन करावें हीच अपेक्षा. या फेलोंच्या यादींत जगत्‌विख्यात् न्यूटन, बेकन, मेकॉले, डार्विन, मिल्टन अशा थोर माणसांचीं नांवें समाविष्ट आहेत. केंब्रिज या शब्दाची व्युत्पत्ति Granta Bridge : GranBridge-Cambridge अशी असल्याचें समजलें.

## इस्राएल :

इस्राएलची एकूण लोकसंख्या पंधरा लाख आहे, आठ वर्षांपूर्वीं पांच होती. ही सारी वाढ स्थानिक नाहीं. इस्राएलची स्थापना झाल्यापासून जगांतील ज्यू लोक झपाट्यानें येथें येऊन राहूं लागले आहेत. या पंधरा लाखांपैकीं सुमारें दीड लाख लोक अरब आहेत. कायद्यानें अरबांच्याबाबत दुजाभाव दाखवलेला दिसत नाहीं. सरकारचें धोरण धर्मातीत आहे. पण दुजाभाव असल्याचा वास आल्याखेरीज रहात नाहीं व त्यांत फारसें आश्चर्य नाहीं.

चाळीस वर्षांपूर्वीं तेलअवीव शहराचा मागमूस नव्हता. येथें नुसती वाळू होती. आज तेथील वस्ती साडेतीन लाख आहे. पुण्यापेक्षां हें शहर बरेंच लहान आहे. पण मला वाटतें. पुण्याच्या दसपट येथें मोटरी असाव्या ! शहरांतील बहुतेक इमारती तीन-चार मजली. मुंबईतील फोर्ट भागांतील इमारतींप्रमाणें. शहरांत ट्राम नाहीं. लोकांना आगगाड्यांची आवश्यकता वाटत नाहीं. कारण आजूबाजूस विशेष वस्ती नाहीं.

यारकोन हॉटेल समुद्राकिनाऱ्यापासून अगदींच जवळ. सकाळीं समुद्र-किनाऱ्यावर गेलों. मोठ्या संख्येनें स्त्रीपुरुष समुद्रांत डुंबण्यासाठीं आले होते. प्रथम सारेच कांहीं ना कांहीं व्यायाम घेत होते. स्त्रियाहि व्यायाम घेत होत्या. त्यांत चाळीशीपुढीलच नव्हे तर पन्नाशीपुढील स्त्रियाहि होत्या. या स्त्री-पुरुषांचा एक विशेष व्यायाम-प्रकार आढळला. व्हॉलिबॉलच्या दुप्पट तिप्पट आकाराचा चेंडू ते तऱ्हेतऱ्हेनें दोन्ही हातांनीं फेंकत होते.

या लोकांत वातुळ नसलेले, शारीरिक स्वास्थ्य असलेले लोक अपवादात होते. पण वात कमी करण्यासाठीं किंवा वात असतांनासुद्धां स्वास्थ्य राखण्यासाठीं त्यांनीं चालविलेली धडपड–विशेषतः उतारवयांतील–पाहून कौतुक वाटलें. परंतु असाहि विचार मनांत आल्याखेरीज राहिला नाहीं कीं, वात न सुटावा म्हणून हे लोक प्रथमपासूनच आपल्या आहारावर वगैरे जादा नियंत्रण कां ठेवीत नाहींत !

मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन अँड कल्चरचें एक युवक खातें आहे. त्यांची इंटरनॅशनल वर्क कँप संघटना आहे. त्यांनीं तेलअवीवपासून चाळीस मैलांवर एका लहान गांवीं एक वर्क कँप घेतला होता. कँपमध्यें सुमारें पंचवीस लोक होते. निम्मे लोक इस्राएलमधले त्यांतले कांहीं अरब. बाकीचे इतर देशांतून आलेले.

इस्राएलमध्यें छोट्या छोट्या वसाहती स्थापण्याचा फार मोठा प्रघात आहे. त्याला ते 'Settlement' म्हणतात. आमचा कँप ही अशापैकींच एक वसाहत होती. अगदीं पडीत जमीन लागवडीखालीं आणण्यासाठीं त्यांचा कसोशीनें प्रयत्न चालू आहे. इस्राएलमध्यें अशा लहान मोठ्या ७८ वसाहती आहेत. कँपशेजारील वसाहती त्या मानानें लहान आहेत. ज्या गृहस्थाच्या आवारांत कँप आहे त्यांच्या मालकीची जमीनहि तें पिकाखालीं आणीत आहेत.

काम करतांना व इतर बाबतींत संघवृत्ति बरीच दिसली. काम करण्याची प्रवृत्ति होती. दिवस मोजण्याकडे दृष्टि नव्हती ! बहुतेकांना इंग्रजी येत होतें. दोन दिवस मी हिंदुस्थानांतील खेळांसंबंधीं बोललों. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरसुद्धां गांधींजी दिल्लीला जात तेव्हां त्यांचा मुक्काम कुठें असें, असे मी चर्चेच्या वेळीं एकदां विचारलें. एकानें 'भंगीं कॉलनी' असें उत्तर देतांच मी चकित झालों ! मी त्याचें अभिनंदन केलें. अहिंसेच्या तत्त्वज्ञानासंबंधीं तेथील कार्यकर्त्यांशीं माझी बरीच चर्चा झाली. व्यक्तींतील प्रगतिक्षमतेवर अपार विश्वास ठेवणें अवश्यक आहे हें त्यांना पटवून देणें कठीण जातें. आपल्या प्राणावर घाला घालणाऱ्यांची हत्त्या करणें आवश्यक नाहीं कां, हा त्यांना सदैव भंडावणारा प्रश्न असतो. मी म्हटलें, पुष्कळ वेळां

११४९१

रण्यापेक्षां मरण्यानेंसुद्धां आपल्या ध्येयवादाचा आणि आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार व विजय अधिक होऊं शकतो. हिंसकाची वृत्ति पालटणें शक्य असतें व यासाठींच हृदयपरिवर्तनावर विश्वास ठेवला पाहिजे. वाल्या कोळी वाल्मीकी झाला, हें उदाहरण त्यांना परिणामकारक वाटलें.

एक दिवस मोटरबसनें कँपमधून जेरूसलेमला गेलों. परराष्ट्र खात्याचे डॉ. फिशेल यांना भेटलों. त्यांच्याबरोबरच मी जेरूसलेममध्यें भटकलों. प्रथम आम्ही माउंट झिऑनवर गेलों. याच ठिकाणीं झिओनिझमचा उयय झाला. किंग डेव्हिडची कबर पाहिली. जेरूसलेम शहराचे दोन भाग पडले आहेत. नवीन शहराचा भाग इस्राएलमध्यें; पण जुनें जेरूसलेम जॉर्डनमध्यें आहे. ख्रिस्ताच्या जन्माचें ठिकाण बेथलहेम हेंहि जॉर्डनमध्यें. ख्रिस्ताचा अंत झाला तेंहि ठिकाण जॉर्डनमध्येंच आहे. माऊंट झिऑनवर आम्ही ज्या ठिकाणीं उभे होतो तेथून दगडफेकीच्या अंतरावर जॉर्डनची हद्द होती. पण तिकडे जाण्याची सोयच नव्हती. इतका परस्पर-विद्वेष विकोपाला गेला आहे !

शहराच्या दुसऱ्या टोकाला सुमारें चार मैलांच्या अंतरावर हरझेल यांची दफनभूमि आहे. इस्राएलच्या प्रस्थापनेची मूळ कल्पना कृतींत आणण्यासाठीं हरझेल यांनीं अपार परिश्रम केले. साहजिकच येथील लोकांत त्यांना फार मानाचें स्थान आहे. त्यांच्या दफनभूमीच्या शेजारींच इस्राएलच्या निर्मितीसाठीं जे तरुण वीर धारातीर्थी पडले त्यांचीं स्मारकें आहेत. त्या जागेभोंवतीं विस्तृत बागेची योजना आंखण्यांत आली आहे.

येथून कांहीं वेळ आम्ही पायीं हिंडलों. बेन यहूद यांचें वसतिस्थान पाहिलें. बेन यहूद हे मूळचे रशियन. त्यांनीं यहुदी भाषा तयार करण्याची फार मोठी कामगिरी बजावली आहे. यहुदी भाषा ही नुसती प्रार्थनेची व यहुदी धर्मग्रंथाची एवढीच शिल्लक राहिली होती, पण बेन यहूद यांनीं या मृत भाषेस जिवंत केलें. यहुदी भाषेहून कोणत्याहि भाषेचा वापर करावयाचा नाहीं, असा त्यांनीं कृतनिश्चय केला. नवीन क्रियापदें योजिलीं. व्याकरणदृष्ट्या भाषेस व्यवस्थित स्वरूप देण्यासाठीं एक श्रेष्ठ कमिटी स्थापन झाली आहे.

येथील वाय्. एम्. सी. ए. ची इमारत मोठी आहे. इमारतीच्या टॉवरवर आम्हीं गेलों. सूर्यास्ताची वेळ सन्निध आली होती. शहरांतील महत्त्वाचीं ठिकाणें तेथून चांगलीं दिसतील म्हणून डॉ. फिशेल मला तीं दाखवूं इच्छित होते. मी त्यांना म्हटलें, मला सूर्यास्त न्याहाळूं दे. अलीकडे मी संध्या करीत नाहीं. तरी मनानें कोरडे अर्घ्य दिले. केप कमोरिन, द्वारका आणि फिन्लंडमधील टँपेरे येथें पाहिलेल्या सूर्यास्ताचें स्मरण झालें. सूर्योदय आणि सूर्यास्त या वेळा कांहीं विलक्षणच आहेत. विशेषतः सूर्यास्ताच्या वेळच्या आकाशांतील विविध रंगांच्या छटा अति मनोहारी वाटतात. सूर्य अंतर्धान पावला हें शास्त्रीय सत्य असलें तरी सूर्य बुडाला, विश्रांतीस गेला ही कल्पना अधिक काव्यमय आणि रम्य वाटतें. माझ्या समोर सूर्यास्त होत होता व माझ्यामागें माउंट झिऑन उभा होता. यहुदी, ख्रिस्ती व इस्लामी तीनहि धर्मांचें हें पवित्र स्थान ! ज्या दिवशीं ख्रिस्ताचा अंत झाला त्या दिवशींच्या सूर्यास्तानें कोणत्या दुःखद स्थितींत येशूच्या मित्रपरिवारास लोटलें असेल !

वाय्. एम्. सी. ए. या संस्थेच्या कार्याचा व्याप केवढा मोठा आहे ! मला त्याची कल्पना नव्हती. त्रिखंडांतच नव्हे, तर पंचखंडांतच त्यांच्या शाखांचा विस्तार आहे. एकूण ७८ देशांत मिळून त्यांच्या १८ हजार शाखा आहेत. त्यांचे ५० लाख सभासद आहेत. प्रत्येक ठिकाणची व्यवस्था अगदीं चोख. क्रीडांगण, ग्रंथालय, वाचनालय व तदनुषंगिक कामें प्रत्येक ठिकाणीं चालू आहेत. केवढें हें कर्तृत्व. त्यांची ही कामगिरी गेल्या एकशें दहा वर्षांतील !

इस्राएलमध्यें पाहिलेल्या कांहीं सामुदायिक प्रयत्नासंबंधीं व वसाहती-संबंधीं खास उल्लेख केला पाहिजे. इस्राएलचें बरेंचसें कर्तृत्व त्यांच्या वसाहतींच्या कामगिरींत सामावलेलें आहे. हा सारा देश वालुकामय आहे. जेथें पाणी जास्त तेथें दलदलीनें बुजबुजाट केला. एके काळीं येथें भरपूर मलेरिया होता. त्याचें संपूर्ण उच्चाटन झालें आहे. पांच वर्षांपूर्वी फक्त पांच हजार एकर जमिनीचें इरिगेशन झालें होतें. आज तो आंकडा पंचवीस हजार एकरांवर गेला आहे. त्यांची इरिगेशनची योजना सफल झाली तर, देशाच्या सर्व कोनाकोपऱ्यांत पाणी खेळवतां येईल. देशाच्या

उत्तर विभागांत पाणी खूप आहे. पण त्या पाण्यावर अरब प्रदेशाचाहि हक्क आहे व त्यामुळें वांधे उत्पन्न झाले आहेत. जगाच्या सर्व प्रदेशांतील अनेक ज्यू या ठिकाणीं येऊन रहात असतात. त्यांची रहाण्याची सोय करणें व त्यांच्या करवीं नव्यानें जमीन लागवडीस आणणें हीं दोन्हीं कामें वसाहतीमार्फत केलीं जातात.

वरील सर्व कार्य चार प्रमुख संस्थांमार्फत चालूं आहे. ( १ ) ज्यूइश नॅशनल फंड, ( २ ) यूथ ऑलिया –ही युवक संघटना, ( ३ ) किबूत्स ( वसाहत ) आणि ( ४ ) मजूर संघटना.

वसाहती सामान्यपणें तीन प्रकारच्या आहेत. मी तिन्ही तऱ्हेच्या वसाहती पाहिल्या. किबूत्समध्यें संपूर्ण सामुदायिक शेतीचा अवलंब केलेला असतो. जेरूसलेमपासून दहा मैलांवरील एका वसाहतींत मी गेलों होतों. तेथील लोकांनीं टेकड्यांवरील जमिनींची लागवड केली आहे. टप्प्या-टप्प्यावर साधारणपणें दोन फूट उंचीचे दगडी बांध घालून तेवढ्या भागांतील जमीन प्रथम बुलडोझर व ट्रॅक्टर यांच्या साहाय्यानें त्यांनीं सपाट केली. बाकीचें सारें काम ते नांगरानें व कुदळ-खोऱ्यानें करतात. टेकडीचा जो भाग पक्क्या खडकाचा आहे, तो तसाच राखला आहे व त्यावर पाईनसारख्या वृक्षांचीं रोपें खूप प्रमाणांत लावून तीं जगवलीं आहेत.

या ठिकाणीं सुमारें दीडशें कुटुंबें रहातात. सारें स्त्री-पुरुष उत्साहानें काम करीत असतात. सर्वांचें जेवण एकत्र. चौदा वर्षांच्यापुढील मुलास अगर मुलीस, पुढील शिक्षण घ्यावयाचें नसेल तर किबूत्समध्यें सामील होतां येतें. त्या खालील मुलांकरितां शाळा आहेत. तथापि त्यांनाहि एक दोन तास कामें करण्याची संवय करावी लागते. या साऱ्या कामाच्या रगाड्यांत ज्या मुलाची प्रवृत्ति बौद्धिक विषयाकडे आहे, त्यांचा कोंडमारा होत नाहीं का, असें मी विचारलें तेव्हां त्यांनीं मला त्यांचें पुस्तकालय दाखविलें. त्यांत सुमारें तीस हजार पुस्तकें व मासिकें होतीं. मुलांचें एक स्वमुद्रित मासिकहि होतें. शिवाय तेथें एक थिएटर आहे. एक कॉन्सर्ट हॉल आहे. किबूत्समध्यें वेगवेगळ्या चढाओढी होत असतात. वर्षांतून पंधरा दिवस आजूबाजूस सहल काढण्यास संधि मिळते.

ज्या ठिकाणीं एकहि झाड नव्हतें अगर माणसाची वस्ती नव्हती अशा जागीं गेल्या पंचवीस तीस वर्षांत शंभरांहून अधिक वसाहती निर्माण झाल्या आहेत. सर्व ठिकाणीं त्यांनीं शास्त्रीय पद्धतींचा अवलंब केला आहे हें विशेष. बहुतेक गाई हॉलस्टीन जातीच्या आहेत. एकच वळू आहे. मुख्यत: आर्टिफिशियल इन्सेमिनेशनचा येथें अवलंब करतात. कोंबड्यांमध्यें बारा हजार लेग् हॉर्न्स आहेत. दर वर्षी वीस लाख अंडीं देतात. त्यांपैकीं वीस टक्के त्यांना लागतात. बाकीचीं ऐशीं टक्के विकतात. गाईंची संख्या दोनशें वीस; त्यांपैकीं सरासरी निम्या नेहमीं दूध देत असतात.

अशीं एकूण २१६ किबूत्स आहेत व त्यांत ७० हजार लोक वसाहत करून काम करीत असतात.

दुसऱ्या प्रकारच्या वसाहतीचें नांव मोशॅव्ह—सामान्यत: सहकारी तत्त्वावर चालविलेलें खेडें. या वसाहतींत प्रत्येक कुटुंबास हवी तितकी जमीन करतां येते व पोटभाड्यानेंहि देतां येते. फायदा होईल तो ज्याचा त्याचा स्वत:चा. पण प्रत्येकाला कांहीं महत्त्वाच्या अटी पाळाव्या लागतात. ( १ ) जमिनीची मालकी नॅशनल ज्यूइश फंडाकडे असते. ( २ ) पैदाशीची सारी विक्री को-ऑपरेटिव्हमार्फत करावी लागते. ( ३ ) परस्पर मदतीचें तत्त्व मान्य करावें लागतें. याचा अर्थ असा कीं एखादा शेतकरी आजारी पडला वा कांहीं कारणानें असमर्थ ठरला, तर त्याला इतरांनीं मदत करावी लागते. नुकसान आलें तर इतरांना त्याची भरपाई करावी लागते. हे प्रश्न सोडविण्यासाठीं एक गांव कमिटी असते. तिच्याकडे सर्व शेतकऱ्यांचे हिशोब खडान्‌खडा ठेवलेले असतात. दूरदृष्टीच्या स्वार्थानेंसुद्धां परस्पर सहकार्याचें धोरण स्वीकारावें लागतें. शिवाय अतिस्वार्थी वृत्ति दाखवली तर सर्व लोकांची टीका सहन करावी लागते.

मी एक असेंच मोशॅव्ह पाहिलें. ज्या शेतकऱ्याच्या घरीं गेलों तो येथें गेलीं वीस वर्षें काम करीत आहे. तो प्रथम आला तेव्हां येथें रहायलासुद्धां जागा नव्हती. भोंवताली सारी दलदल, वाळू होती. आज तिथें एक समृद्ध गांव आहे. दीडशें कुटुंबेंसुद्धां नाहींत, पण गांवाची एक प्रचंड कोठी आहे. त्या कोठींत हजारों पोत्यांची थड लागली होती. हिशेब सारे चोख. गांवांत शाळा, हॉस्पिटल,

बालगृह, ट्रॅक्टर सर्व कांहीं होतें. किब्त्समधील सामुदायिक शेतींत व्यक्तिमत्त्वाला वाव नाहीं अशी ज्यांची तक्रार होती तीं सारीं कुटुंबें मोशॅव्हमध्यें सामील झालीं.

किब्त्समध्यें नेतृत्वाची फार आवश्यकता असते, नाहींतर बजबजपुरी माजण्याची भीति असते. केवळ भावनेच्या भांडवलावर, शेतीचा कसलाहि अनुभव नसलेले तरुण प्रथम किब्त्समध्यें सामील झाले. त्यांच्या मार्गदर्शनासाठीं नॅशनल ज्यूइश फंडानें शक्यतो तज्ज्ञ माणसें पुरावण्याची तजवीज केली व बऱ्याच ठिकाणीं लोकांना टोणपे खाऊनच प्रगति करावी लागली. त्यांची शेतकी शिक्षणाची सोय व्हावी म्हणून सरकारनें शेतकी कॉलेज काढलें व तेथें आठवड्यांतून एक दोन दिवस, वर्षांतून एक महिना, सहा महिने असे तऱ्हेतऱ्हेचे शिक्षणक्रम सुरू करून त्यांच्या शिक्षणाची तत्परतेनें योजना केली. मी तें शेतकी कॉलेज पाहिलें. कॉलेजच्या प्रिन्सिपॉलची मुलाखत घेतली. ते चांगलेच बुद्धिमान दिसले. त्यांना तीस चाळीस तज्ज्ञांचें साहाय्य मिळतें. एकशेंऐशीं एकर जमिनीचें आवार त्यांच्या ताब्यांत आहे.

येथील शेतकी शाळांची योजना चांगली आहे. प्राथमिक व दुय्यम शिक्षण आठ वर्षांचें असतें. तें संपादन केल्यानंतर सुमारें चौदाव्या वर्षीं शेतकी शाळेंत जातां येतें. हा शिक्षण क्रम सध्यां तीन वर्षांचा आहे. लवकरच तो चार वर्षांचा होईल. मीं जी शाळा पाहिली त्यांत सुमारें तीनशें विद्यार्थी होते. मुलां-मुलींची संख्या समान. हीं सारीं मुलें शाळेंतच रहातात. पहिल्या अठरा महिन्यांत मुलांना सामान्य शिक्षण मिळतें; पुढील १८ ते ३० महिन्यांत इच्छेनुरूप विशिष्ट शिक्षण घेतां येतें. शिक्षणांतील धोरण अतिशय व्यावहारिक स्वरूपाचें असतें. शिक्षणाचे विभाग गोवर्धन, मेंढया, यंत्र-विभाग, कोंबड्या, भाजीपाला व फळें, सुतारी वगैरे. निम्मा वेळ प्रात्यक्षिक शिक्षण व निम्मा वेळ पुस्तकी शिक्षणासाठीं ठेवण्यांत येतो. पुस्तकी शिक्षणांत इतिहास, बायबल, भाषा, हिब्रू, गणित, पदार्थ-विज्ञान, जीवशास्त्र, रसायनशास्त्र इत्यादि विषयांचा अंतर्भाव करण्यांत आला आहे.

सारे विद्यार्थी वसतिगृहांत रहात असल्यानें त्यांचें तेथील जीवन हा अत्यंत महत्त्वाचा भाग असतो. विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचें शिक्षण मिळावें

म्हणून त्यांच्या अनेक कमिट्या असतात. स्वयंपाकघराची सारी व्यवस्था मुलेंच पहातात. भाडोत्री क्लबची पद्धत नाहीं. शिक्षण घेतलेले विद्यार्थी शेती व्यवसायांत कितपत उपयोगी पडतात, हा माझ्यापुढे एक प्रश्नच होता. पण त्याचें उत्तर अगदींच सोपें होतें. बरेचसे विद्यार्थी किबूत्समधून आलेले असतात व तेथील लोक त्या विद्यार्थ्यांची वाट पहात असतातच.

सध्यां सामान्यतः शिक्षितांची प्रवृत्ति खेड्यांतून शहरांकडे धांव घेण्याची आढळते. ही जर इस्राएलमध्यें बोकाळली तर देशाचे वाटोळेंच होईल. कारण अनेक देशांतून येथें लोक आले आहेत व येत आहेत. सगळेजण जर शहरांत जागा शोधूं लागले तर त्यांना उद्योग तरी कोठून द्यायचा ! देशाचें उत्पन्न अधिक जमीनी लागवडीखालीं आणण्यानेंच वाढणार आहे. म्हणून तरुणांमध्यें शेतीविषयक व ग्रामीण प्रवृत्ति निर्माण करणें हा अतिशय महत्त्वाचा कार्यक्रम आहे. अन्य देशांतून येथें आलेले लोक पूर्वीं शहरी व्यावसायिक होते, त्यांनीं आतां ग्रामीण जीवन पसंत केलें आहे.

येथील मध्यवर्ती कामगार संघटनेला ‘ हिस्ताद्रुत ’ म्हणतात. या संघटनेचें कार्यक्षेत्र फार विस्तृत आहे. ट्रेड युनियन को-ऑपरेटिव्ह, सार्वजनिक उद्योगधंदे, कामगारांचा आजारीपणांतला फंड इत्यादि सर्व संघटनांचा त्यांत समावेश होतो. १५ लक्ष लोकसंख्येपैकीं या संघटनेचे ५ लक्ष लोक सभासद आहेत. म्हणजे वयांत आलेले सारे लोक या संघटनेंत नोंदलेले आहेत. राष्ट्रीय उत्पन्नांत अधिकाधिक हिस्सा, कामधंद्याची शाश्वति, आठ तासांचा दिवस, जीवनाच्या रहाणीमानाप्रमाणें बदलणारी वेतनपद्धति आदि अनेक कामगार कल्याणाच्या बाबी या संघटनेमुळें कामगारांच्या पदरीं पडलेल्या आहेत. इंग्लडनें वैद्यकीय धंद्याचें सामाजीकरण केलें. पण त्यांना त्यांत म्हणण्यासारखें यश आलें नाहीं. पण तीच गोष्ट इस्राएलनें यशस्वीरीत्या साध्य करून दाखविली आहे. सुमारें आठ टक्के लोकवस्तीला औषधोपचाराची योजना हिस्तातच्या आजार-फंडांतून होते.

‘ दावर ’ हें त्यांचें दैनिक वृत्तपत्र आहे. त्याचा खपहि चांगला आहे. त्यांचें कामगार कॉलेजहि आहे. त्यांचें स्वतंत्र प्रसिद्धि व छपाई खातें आहे. सरकारी घरबांधणी हें त्यांचें फार मोठें कार्य आहे. तीस हजार घरें बांधून

त्यांनीं सव्वालक्ष लोकांची रहाण्याची व्यवस्था केली आहे. त्यांची एक मोठी सहकारी पतपेढी आहे.

इस्राएलमधील मोठीं शहरें तीन. हैफा हें बंदर व औद्योगिक केंद्र आहे. जेरूसलेम हें राज्यकारभाराचें केंद्र आहे आणि तेलजवीव हें व्यापारी केंद्र म्हणतां येईल. हैफामधील बहुतेक सर्व कारखाने एकाच भागांत केंद्रित झाले आहेत. हा भाग हैफा बंदरापासून दूर होता. वाहतुकीचें कोणतेंहि चांगलें साधन नव्हतें. पण सरकारनें चांगली अक्कल लढविली. कारखान्यापासून एका मैलाच्या अंतरावर असलेल्या नदीचा प्रवाह त्यांनीं कृत्रिम उपायांनीं बदलवला व नदीला जोडणारा कालवा खोदून नदी समुद्रास जोडून घेतली. सहा हजार टनी जहाज जाऊं शकेल इतकें नदीचें पाणी खोल आहे. हें पाणी कमी होण्याची भीति नाहीं. पण वाढण्याची भीति होती म्हणून वर कृत्रिम तलाव खणून हवें तेवढेंच पाणी इकडे येईल अशी तजवीज केली आहे.

हैफा शहरांतील टेक्निकल कॉलेजची जागा अगदीं अपुरी पडत होती. हल्लीं एक नवी इमारत उंच ठिकाणीं बांधली आहे. जागा अतिशय उंचावर असल्यामुळें वारा जोराचा वाहील त्याचा उपसर्ग विद्यार्थ्यांना पुस्तकें उघडलीं असतांना होऊं नये म्हणून खिडक्या अशा केल्या आहेत कीं, हवा खेळावी, पण जोराचा वारा कांहीं वाहूं नये. अमेरिकेंतील टी. व्ही. ए. धरणाची योजना ज्यांनीं बरीचशी पार पाडली ते इंजिनियर ज्यू होते. ते आतां येथें येऊन रहाणार आहेत. किंबहुना जगांतील नामांकित तज्ज्ञ आणि शास्त्रज्ञ ज्यू इस्राएलची सर्वांगीण उन्नति करण्यासाठीं इकडे येऊन राहूं लागले आहेत. इस्राएलचें भवितव्य उज्ज्वल आहे.

येथील युवक संघटनेस ‘ यूथ ॲलिया ’ असें म्हणतात. ठिकठिकाणच्या, विशेषतः जर्मनींतील तरुणांना बेताबेतानें पॅलेस्टाईनमध्यें आणण्याचा झिऑनिस्ट चळवळीचा विचार होता. हिटलरी अत्याचारांमुळें तो ताबडतोबीनें अंमलांत आला १९३४ सालीं प्रथम एक ४५ मुलां-मुलींचा गट पॅलेस्टाईनमध्यें आला व व्हॅली ऑफ जेझरीलमध्यें त्यांनीं मुक्काम केला आणि तेव्हांपासून आतांपर्यंत वीस वर्षांत एकूण साठ हजार मुलें या संघटनेंत सामील झालीं आहेत. त्यांची विभागणी किबूत्स, मोशॅव्ह व शिक्षणसंस्था यांमध्यें झाली

आहे. इस्त्राएलची स्थापना झाल्यानंतर अरब मुलां-मुलींचा समावेश त्यामध्यें झाला. या मुलांना किबूत्स किंवा इतर ठिकाणीं पाठवतांना भाषा, संस्कार, प्रवृत्ति वगैरे दृष्टीनें त्यांचा एक गट होईल अशी काळजी घेण्यांत येत असे. परंतु युद्धाच्या कोलाहलांत अनेक पोरकीं मुलें पॅलेस्टीनमध्यें आलीं. त्यामुळें या दृष्टीनें पसंती-नापसंतीला वावच राहिला नाहीं. या मुलांवर देखरेख ठेवणारा एक शिक्षकवर्ग तयार झाला. त्याला ‘ मद्रखीम ’ म्हणतात. तो सर्व वेळ सेवक असतो. मुलांवर संस्कार करणें, त्यांना नवीन मूल्यांची शिकवण देणें आणि नव्या जीवनाचे धडे देणें हें कार्य मद्रखीम करीत असतो. तो केवळ शिक्षणतज्ज्ञ नाहीं, तो खराखुरा शिक्षक असतो.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 32039 वि: 12-9-८८
क्रमांक 7304 नों: दि: 2-9-८८
ग्रं. क्र. 99812
REFBK-0011499

राष्ट्र सेवा दल प्रकाशनें

- सैनिक गीतें
- कलापथक गीतें
- नृत्य गीतें
- पुढारी पाहिजे

  लेखक पु. ल. देशपांडे
- कुणाचा कुणाला मेळ नाहीं

  लेखक व्यंकटेश माडगूळकर